# अनुसूचित जाती कल्याण समिती

**(२०१५ - २०१६)**

**(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)**

**सहकार आयुक्तालय, पुणे, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पुणे विभाग व पुणे विद्यापीठ यांच्या सेवेतील अनुसूचित जातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांचेसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांसंबंधीचा....**

# पहिला अहवाल

सत्यमेव जयते

**( हा अहवाल विधानसभेस / विधानपरिषदेस दिनांक १८ डिसेंबर, २०१५ रोजी सादर करण्यात आला.)**


**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**विधान भवन, नागपूर**

डिसेंबर, २०१५

# अनुसूचित जाती कल्याण समिती

**(२०१५ - २०१६)**

**(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)**

**सहकार आयुक्तालय, पुणे, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, रा. प. पुणे विभाग, पुणे विद्यापीठ यांच्या सेवेतील अनुसूचित जातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेषाबाबत**

# पहिला अहवाल

## अनुसूचित जाती कल्याण समिती

## (सन २०१५ -२०१६)

**समिती प्रमुख**

(१) डॉ.सुरेश खाडे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री.लखन मलिक, वि.स.स.

(३) श्री.हरीष पिंपळे, वि.स.स.

(४) डॉ.सुधाकर भालेराव, वि.स.स.

(५) श्री.सुधीर पारवे, वि.स.स.

(६) श्री.रमेश बुंदीले, वि.स.स.

(७) श्री.सुभाष साबणे, वि.स.स.

(८) डॉ.सुजित मिणचेकर, वि.स.स.

(९) प्रा.वर्षा गायकवाड, वि.स.स.

(१०) श्री.नरहरी झिरवाळ, वि.स.स.

(११) श्री.इम्तीयाज जलील सय्यद, वि.स.स.

(१२) श्री.विजय उर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(१३) ॲड. जयदेव गायकवाड, वि.प.स.

(१४) श्री.प्रकाश गजभिये, वि.प.स.

(१५) प्रा.जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.**

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(३) श्री.श्रीकांत शेटे, अवर सचिव.

(४) श्रीमती सिमा तांबे, कक्ष अधिकारी.

---

सन २०१५-२०१६ या वर्षाकरिता मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा व मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी अनुक्रमे दिनांक १ मे, २०१५ व दिनांक २१ मे, २०१५ रोजी अनुसूचित जाती कल्याण समिती नामनिर्देशित केली आहे.

## अनुसूचित जाती कल्याण समिती

## (२०१२-२०१३)

**समिती प्रमुख**

(१) श्री रमेश बागवे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री.आनंदराव गेडाम, वि.स.स.

(३) श्री.रावसाहेब अंतापुरकर, वि.स.स.

(४) डॉ.योगेंद्र भोये, वि.स.स.,

(५) श्री.मिलींद कांबळे, वि.स.स.

(६) श्री.सुरेश धस, वि.स.स.

(७) श्री.शंकरराव गडाख, वि.स.स.,

(८) श्री.विष्णू सवरा, वि.स.स.

(९) श्री.लखंन मलिक, वि.स.स.

(१०) डॉ.सुजित मिनचेकर, वि.स.स.

(११) श्री.ज्ञानराज चौगुले, वि.स.स.

(१२) श्री.सुभाष चव्हाण, वि.प.स.

(१३) श्री.एम.एम. शेख, वि.प.स.

(१४) श्री.राम पंडागळे, वि.प.स.

(१५) श्री नागो गाणार, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.**

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(३) श्री.श्रीकांत शेटे, अवर सचिव.

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| (१) | प्रस्तावना . . . . . . . . | (सात) |
| (२) | सहकार आयुक्तालय, पुणे, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पुणे व पुणे विद्यापीठ, पुणे . . . . | १ |
| (३) | परिशिष्ट " एक " (सहकार आयुक्तालय, पुणे, यांच्याकडून समितीला प्राप्त . . झालेली माहिती) | ७३ |
| (४) | परिशिष्ट " दोन " (समितींच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त) . . . . . . | ८५ |

# प्रस्तावना

मी, अनुसूचित जाती कल्याण समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरुन समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर करीत आहे.

समितीने सहकार आयुक्तालय, पुणे, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, रा.प.पुणे, पुणे विद्यापीठ येथे प्रत्यक्ष भेट देऊन त्यांच्या सेवेतील अनुसूचित जातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना व विशेष घटक योजनांसंदर्भात माहिती जाणून घेण्याचे ठरविले व त्यानुसार उपरोक्त विभागाच्या संदर्भात तयार केलेल्या प्रश्नावलीबाबतची माहिती सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, सहकार व पणन (सहकार) विभाग, गृह (परिवहन) विभाग व सामान्य प्रशासन (मावक) विभागामार्फत मागविण्यात आली.

समितीने उपरोक्त प्रश्नावलीच्या संदर्भात प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे अनुक्रमे दिनांक २२ व २३ ऑगस्ट, २०१२ रोजी सहकार आयुक्तालय, पुणे, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, रा.प.पुणे ,पुणे विद्यापीठ येथे प्रत्यक्ष भेट देऊन तेथील संबधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

समितीस पुरविण्यात आलेली लेखी माहिती व प्रत्यक्ष भेटीच्यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी समितीसमोर दिलेल्या साक्षीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्द्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने समितीने दिनांक ४ व ५ सप्टेंबर, २०१३ रोजी मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष घेतली. प्रत्यक्ष भेटीच्या वेळी व विभागीय साक्षीच्यावेळी मिळालेल्या माहितीचा सर्वकष विचार करून समितीने आपले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केलेल्या आहेत. समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट २ मध्ये दिलेले आहे. समितीने दिनांक --- डिसेंबर, २०१५ रोजी प्रारुप अहवालावर विचार करून तो संमत केला.

मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या साक्षीच्यावेळी, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, सहकार व पणन (सहकार) विभाग, गृह (परिवहन) विभाग व सामान्य प्रशासन (मावक) विभाग यांनी तसेच कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे, व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, रा.प.पुणे विभाग व इतर संबंधित अधिकारी यांनी समितीसमोर उपस्थित राहून समितीला आवश्यक ती माहिती देऊन जे सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांचा आभारी आहे.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : डिसेंबर, २०१५

**डॉ.सुरेश खाडे,**
समिती प्रमुख,
अनुसूचित जाती कल्याण समिती.

# अहवाल

## (अ) सहकार आयुक्तालय, पुणे.

### (१) सहकार आयुक्तालय, पुणे यांच्या अंतर्गत असलेल्या विभागाचे कार्यालयात अनुसूचित जातीच्या उमेदवारांच्या भरती, बढती, आरक्षण व अनुशेषाबाबत.

सहकार आयुक्तालय, पुणे यांच्या अंतर्गत येणाऱ्या विभागामध्ये तांत्रिक/ अतांत्रिक स्वरुपाची वर्ग अ ते ड मधील एकूण किती पदे मंजूर आहेत, त्यापैकी अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी राखीव असलेली किती पदे प्रत्यक्षात भरण्यात आली व अद्याप किती पदे रिक्त आहेत, पदे रिक्त असल्याची कारणे काय आहेत व रिक्त पदे भरण्यासाठी आतापर्यंत कोणते प्रयत्न करण्यात आले आहेत. यासंदर्भात विभाग निहाय माहिती सहकार आयुक्तालय, पुणे यांच्याकडून मागविण्यात आली होती. त्यानुसार सहकार आयुक्तालय, पुणे यांच्याकडून समितीला खालील प्रमाणे लेखी स्वरुपात माहिती प्राप्त झाली. (परिशिष्ट १ पहावे )

सहकार आयुक्तालय, पुणे व त्यांच्या अंतर्गत असलेल्या विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक २२ ऑगस्ट, २०१२ रोजी सहकार आयुक्तालय, पुणे या कार्यालयास भेट देऊन संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली.

आयुक्त, सहकार आयुक्तालय यांनी पुणे येथील सहकार आयुक्तालय व त्यांच्या अंतर्गत असलेल्या कार्यक्षेत्राबाबत प्राथमिक माहिती समितीला दिली. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या अधिपत्याखाली (१) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे, (२) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे, (३) पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व (४) संचालक, वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर अशी चार कार्यालये कार्यरत आहेत. सहकार विभागाच्या नियंत्रणाखाली राज्यातील या आस्थापना येतात. या चारही कार्यालयातील अतांत्रिक पदे भरण्याचा अधिकार सहकार विभागाला आहे. तांत्रिक पदे भरण्याचा अधिकार त्या-त्या विभागाला देण्यात आला आहे. राज्यामध्ये ३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आहेत, ५१७ नागरी बँका आहेत, २१३८४ विविध कार्यकारी सहकारी संस्था आहेत, १५५७५ पतसंस्था आहेत, ८५३३५ सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत, सर्वच गृहनिर्माण संस्था सहकार कायद्यांतर्गत नोंदणी केल्या जात आहेत, त्यामुळे ही संख्या मोठी दिसत आहे. २०२ सहकारी साखर कारखाने

आहेत, १४७४ पणन सहकारी संस्था आहेत, २७१ जिनिंग प्रेसिंग सहकारी संस्था आहेत, ८९७८० इतर सहकारी संस्था आहेत ज्या सहकारी संस्थांचे व्यवहार बरोबर नाहीत किंवा ज्या पतसंस्था कमकुवत झालेल्या आहेत, त्या रद्द केलेल्या आहेत. त्यामुळे पतसंस्थांची संख्या कमी दिसत आहे.

सहकार आयुक्तालयाचे प्रशासन आणि लेखापरिक्षण असे दोन विभाग आहेत. या दोन विभागांमध्ये आस्थापना शाखा आहे. राज्यात प्रशासन विभागाचे ९ आणि लेखा परिक्षण विभागाचे ७ विभाग आहेत. यातील सातवा विभाग नुकताच कोल्हापूर येथे निर्माण केला आहे. कोल्हापूर येथील विभागामध्ये दोन महिन्यापर्यंत पुणे विभागातील कर्मचारीवर्ग पाठविण्यात आला आहे. सामान्य प्रशासन आणि वित्त विभागाने सन २०११ मध्ये आराखड्याला मान्यता दिली आहे. राज्यात सहकार आयुक्तालयांतर्गत ९१८३ कर्मचारी वर्ग आहे. यामध्ये सहकार आयुक्तालय, साखर आयुक्तालय, पणन संचालनालय या तीन कार्यालयांची एकत्र आस्थापना आहे. मंजूर ९१८३ पदांपैकी ७४५८ पदे भरली असून, मंजूर पदानुसार अनुसूचित जातीची आरक्षणानुसार ११९९ पदे भरणे आवश्यक होते. त्यापैकी ९८३ पदे भरली असून, २१६ पदांचा अनुशेष आहे. गेल्या दोन वर्षांत शासन स्तरावरुन गट-क व ड ची पदे भरण्यास स्थगिती होती. परंतु नंतर सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णयानुसार मुभा दिली आहे की, पद भरती करण्याबाबत योग्य समर्थन केल्यास ती पदे भरण्यास परवानगी देण्यात येईल. त्यानुसार सामान्य प्रशासन विभागाकडे प्रस्ताव पाठविला होता. शासनाकडून त्या प्रस्तावावर विचार होऊन, अपंगांचा अनुशेष आणि इतर प्रवर्गातील १०४७ रिक्त पदे भरण्यास माहे ऑक्टोबर-२०११ मध्ये परवानगी मिळाली. त्यानुसार माहे डिसेंबर-२०११ मध्ये जाहिरात दिली होती. सदरहू भरती प्रक्रिया पार पडण्याचे काम एम.के.सी.एल.ला दिले आहे. एम.के.सी.एल.च्या माध्यमातून दिनांक १९ व २० फेब्रुवारी, २०१२ या कालावधीत परिक्षा पार पाडल्या व माहे मार्च-२०१२ पर्यंत सर्व पदे भरली आहेत. या भरती प्रक्रियेतून बराच अनुशेष दूर झाला आहे. नियुक्ती झालेले काही उमेदवार रुजू झाले नाही, काही उमेदवारांनी वरिष्ठ पदावरील परीक्षा देण्यासाठी राजीनामा दिला इ. कारणांमुळेच २१६ पदांचा अनुशेष दिसून येतो.

आयुक्त, सहकार आयुक्तालय यांनी समितीला दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने गट-अ ते गट-ड ची एकूण ४२ पदे तांत्रिक स्वरुपाची आहेत. तांत्रिक पदांमध्ये अनुसूचित

जातीचा किती पदांचा अनुशेष आहे, अशी विचारणा समितीने केली असता आयुक्त, सहकार आयुक्तालय यांनी असे स्पष्ट केले की, ही पदे सहकार आयुक्तालयातील नसून वस्त्रोद्योग संचालनालयातील आहेत. सहकार आयुक्तालयांतर्गत केवळ अतांत्रिक पदे येतात. सदरहू ४२ पदे वस्त्रोद्योग संचालनालयाची असल्यामुळे या पदांवर सहकार आयुक्तालयाचे नियंत्रण नाही. शिवाय त्या पदांची भरती प्रक्रिया सुध्दा सहकार आयुक्तालयामार्फत राबविली जात नाही.

त्यावर समितीने, सहकार आयुक्तालयामध्ये ९१८३ मंजूर पदे आहेत. १३ टक्के आरक्षानुसार अनुसूचित जाती प्रवर्गासाठी ११९९ पदे येतात. यामध्ये सरळसेवेची आणि पदोन्नतीची किती पदे आहेत, अशी विचारणा केली असता. आयुक्त, सहकार आयुक्तालय यांनी अनुसूचित जातीसाठी सरळसेवेची ५९३ आणि पदोन्नतीची ६०६ पदे आहेत, अशी माहिती दिली. समितीने पुढे मंजूर असलेल्या ९१८३ पदांमध्ये १३ टक्के आरक्षणानुसार ११९९ पदे अनुसूचित जाती प्रवर्गातील आहेत. ती सरळसेवेने भरावयास पाहिजे होती. तथापि, सरळसेवा व पदोन्नतीची पदे एकत्रित केली असल्याचे मत व्यक्त केले असता, आयुक्त, सहकार आयुक्तालय यांनी यासंदर्भात असे स्पष्टीकरण केले की, मंजूर आकृतिबंधानुसार ९१८३ पदे असून, गट-अ ची ३२३ पदे मंजूर आहेत. यातील सरळसेवेद्वारे ८२ पदे भरली असून, १३ टक्के आरक्षणानुसार अनुसूचित जाती प्रवर्गासाठी सरळ सेवेची १७ पदे राखीव आहेत. पदोन्नतीची १८७ पदे असून, अनुसूचित जातीसाठी आरक्षणानुसार २७ पदे येतात. अशा प्रकारे गट-अ मध्ये सरळसेवा व पदोन्नतीतून २६९ पदे भरली असून, अनुसूचित जाती प्रवर्गासाठी आरक्षणानुसार ४४ पदे येतात. परंतु प्रत्यक्षात ३८ पदे भरलेली आहेत.

सहकार आयुक्तांनी केलेल्या स्पष्टीकरणासंदर्भात समितीने विचारणा केली की, सहकार आयुक्तालयामध्ये ९१८३ मंजूर पदे आहेत. अनुसूचित जाती प्रवर्गासाठी १३ टक्के आरक्षणानुसार ११९९ पदे येतात. सरळसेवेची आणि पदोन्नतीची पदे एकत्रितरित्या दर्शविलेली आहेत. पदोन्नतीची ६०६ आणि सरळ सेवेची ५९३ पदे एकत्रित नमूद केलेली आहेत. मंजूर पदांपैकी सरळसेवेतून १३ टक्के आरक्षणानुसार ११९९ पदे भरावयास हवी होती. सरळसेवा आणि पदोन्नती अशा प्रकारे दोन टप्प्यांवर आरक्षण स्वतंत्र आहे. त्यामुळे सरळसेवेची आणि पदोन्नतीची पदे स्वतंत्रपणे नमूद करावयास हवी होती. पदोन्नतीचे आरक्षण सरळसेवेमध्ये दर्शविणे म्हणजे एकप्रकारे समितीची दिशाभूल करण्यासारखे आहे.

वास्तविक पहाता सरळसेवेची पदे भरल्यानंतर त्यातून पदोन्नती दिली जाते, असे मत समितीने व्यक्त केले त्यावर आयुक्त, सहकार आयुक्तालय यांनी ९१८३ पदांपैकी ३६४७ पदे सरळसेवेची आहेत. ३६४७ पदांपैकी १३ टक्के आरक्षणानुसार ५९३ पदे येतात. पदोन्नतीची ५५३६ पदे आहेत. भरती प्रक्रिया राबविताना आकृतिबंध मंजूर आहे काय हे बघितले जाते. त्यानुसार ५० टक्के सरळसेवा आणि ५० टक्के पदोन्नतीने पदे भरली जातात. मंजूर आकृतिबंधातील ९१८३ पदांपैकी सर्व पदे भरलेली आहेत असे नाही, असा खुलासा केला असता,समितीला समाधानकारक उत्तर मिळत नसल्यामुळे आयुक्तांनी थोड्या वेळानंतर माहिती संकलित करून उत्तर द्यावे, असे समितीने निर्देश दिले. यासंदर्भात आयुक्त, सहकार आयुक्तालय यांनी सहकार आयुक्त कार्यालयांतर्गत विभागांमध्ये अतांत्रिक स्वरुपाची ९१८३ मंजूर पदे आहेत, त्यापैकी सरळसेवेने भरलेली पदे ३६४७ होती व पदोन्नतीने भरलेली पदे ३८११ होती, अशाप्रकारे एकूण ७४५८ पदे होती. त्यामध्ये १३ टक्क्यांप्रमाणे अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील पदे भरलेली आहेत, असा खुलासा केला त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, ९१८३ पदे सरळसेवेने भरलेली असली पाहिजेत. कारण नोकरीत लागल्यानंतर पदोन्नतीचा प्रश्न येतो. अशाप्रकारे सरळसेवा व पदोन्नतीची पदे दोन्ही एकत्र करता येणार नाहीत. सरळसेवेचा व पदोन्नतीचा आरक्षण रेश्यो वेगवेगळा असतो. सरळसेवेने ९८३ पदे भरलेलीच नाहीत, यासंदर्भात समितीचा आक्षेप आहे. सहकार आयुक्त कार्यालयांतर्गत विभागात एकूण भरलेली पदे ७४५८ आहेत, त्यापैकी ९६९ पदे अनुसूचित जातीची भरली पाहिजे होती. ही सर्व पदे एकत्र केल्यामुळे गोंधळ होत आहे, असे समितीला वाटते. त्यावर आयुक्त, सहकार आयुक्तालय यांनी असे स्पष्ट केले की, संवर्गनिहाय आकृतिबंध मंजूर झाल्यानंतर सेवा प्रवेश नियम केले जातात. त्याप्रमाणे सरळसेवा व पदोन्नती यांच्या पदांची संख्या दिलेली आहे. तद्‌नंतर समितीने अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी राखीव असलेली वर्ग अ ते ड मधील तांत्रिक व अतांत्रिक पदे सरळसेवा भरतीद्वारे व पदोन्नतीद्वारे भरताना शासनाने विहित केलेल्या टक्केवारीचे प्रमाण किती आहे व टक्केवारीनुसार पदे भरण्यात आली आहेत काय, अशी विचारणा केली असता आयुक्त, सहकार आयुक्तालय यांनी अनुसूचित जातीतील उमेदवारांची अ, ब, क, ड या गटांनुसार प्रशासन विभागात गट अ मध्ये अप्पर आयुक्त/अप्पर निबंधक/सह निबंधक या संवर्गातील सर्व पदांना दिनांक २९ जानेवारी, २००४ पासून पदोन्नतीच्या सर्व टप्प्यांना आरक्षण लागू करण्यात आले आहे. त्यानुसार सहकार खात्यातील प्रशासन विभागातील रिक्त

झालेली सर्व पदे शासनाच्या आरक्षणाच्या धोरणानुसार भरण्यात आली असल्याचे समितीच्या निदर्शनास आणले.

गट अ मध्ये अप्पर आयुक्त व विशेष निबंधक/पणन संचालक या संवर्गाची मंजूर पदे दोन असून अनुसूचित जातीच्या एका पदाचा अनुशेष बाकी आहे, याबाबतच्या पदोन्नतीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला असून अंतिम कार्यवाही सुरु आहे, असे समितीस अवगत केले.

समितीने गेल्या ३ वर्षात (सन २००९-२०१० ते सन २०११-१२)(मार्च २०१२ अखेर)वर्षनिहाय सहकार आयुक्त कार्यालयात किती अधिकारी/कर्मचारी यांची पदे भरण्यात आली. त्यापैकी किती उमेदवार अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील आहेत, अशी विचारणा केली असता आयुक्त सहकार आयुक्तालय यांनी,सन २००९-१० मध्ये गट अ व ब ची एकूण ६० पदे भरण्यात आली. त्यापैकी अनुसूचित जातीची ७ पदे होती. सन २०१०-११ मध्ये गट अ व ब ची एकूण २८ पदे भरण्यात आली, त्यापैकी अनुसूचित जातीची ५ पदे होती. सन २०११-१२ मध्ये गट अ व ब ची एकूण ४८ पदे भरण्यात आली. त्यापैकी अनुसूचित जातीची ७ पदे होती.

गट क ची सन २००९-१० मध्ये एकूण २०४ पदे भरण्यात आली, त्यापैकी २६ पदे अनुसूचित जातीची होती. सन २०१०-११ मध्ये एकूण १४० पदे भरण्यात आली, त्यापैकी २१ पदे अनुसूचित जातीची होती. सन २०११-१२ मध्ये एकूण २८४ पदे भरण्यात आली, त्यापैकी ३३ पदे अनुसूचित जातीची होती.

लेखापरिक्षणविभागात सन २००९-१० मध्ये एकूण भरलेली पदे २११ होती, त्यापैकी ३२ पदे अनुसूचित जातीची होती. सन २०१०-११ मध्ये एकूण भरलेली पदे १३१ होती, त्यापैकी १७ पदे अनुसूचित जातीची होती. सन २०११-१२ मध्ये एकूण भरलेली पदे १५३ होती, त्यापैकी २१ पदे अनुसूचित जातीची होती.

प्रशासन गट ड ची सन २००९-१० मध्ये एकूण भरलेली पदे ३७ होती, त्यातील १ पद अनुसूचित जातीचे होते. सन २०१०-११ मध्ये एकूण भरलेली पदे ८ होती. त्यातील १ पद अनुसूचित जातीचे होते. सन २०११-१२ मध्ये एकूण भरलेली पदे १८६ होती, त्यातील ४२ पदे अनुसूचित जातीची होती. लेखापरीक्षण गट ड ची सन २००९-१० मध्ये एकूण भरलेली पदे १९ होती, त्यातील १ पद अनुसूचित जातीचे होते. सन २०१०-११

मध्ये एकूण भरलेली पदे १९ होती, त्यात एकही अनुसूचित जातीचे पद नव्हते. सन २०११-१२ मध्ये एकूण भरलेली पदे ४७ होती, त्यामध्ये १ पद अनुसूचित जातीचे होते.

यामध्ये २१६ पदांचा अनुशेष होता तो गट अ ते ड मधील आहे. त्यामध्ये गट क ची एकूण १८२ पदे रिक्त आहेत. ही पदे रिक्त राहण्याची कारणे म्हणजे पदांच्या सेवा प्रवेश नियमातील तरतूदीनुसार उमेदवार खात्यांतर्गत परीक्षा, जीडीसी ॲण्ड ए परीक्षा, एस.एस.सी परिक्षा, टंकलेखन परीक्षा, संगणक अर्हता व निम्न संवर्गात सेवेची तीन वर्षे पूर्ण या अटी पूर्ण करीत नाहीत. निम्न संवर्गात ३ वर्षांची सेवा हा नियम शिथिल करण्यासाठी शासनाने एक निर्णय जारी केला आहे. परंतू, बाकीच्या इतर अटी शिथिल करण्यात आल्या नसल्यामुळे क गटाची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असून वय वर्षे ४५ च्या आतील सर्व उमेदवार असल्यामुळे त्यांना या अटी लागू असल्याची माहिती समितीला दिली.

समितीने, सहकार आयुक्तालयांतर्गत येणाऱ्या विभागात गेल्या तीन वर्षात(सन २००९-२०१० ते सन २०११-२०१२ मार्च अखेर) अनुसूचित जातीच्या किती कर्मचाऱ्यांना वर्गनिहाय कोणत्या पदांवर पदोन्नत्या देण्यात आल्या आहेत, अशी विचारणा केली असता. आयुक्त, सहकार आयुक्तालय यांनी सन २००९-१० ला गट अ मध्ये ६ पदोन्नत्या दिल्या, गट ब मध्ये २३ पदोन्नत्या दिल्या, अशा गट अ व ब मिळून २९ पदोन्नत्या दिल्या. सन २०१०-११ ला गट अ मध्ये ३ व गट ब मध्ये १ अशा गट अ व ब मिळून ४ पदोन्नत्या दिल्या. सन २०११-२०१२ ला गट अ मध्ये १२ व गट ब मध्ये १६ अशा गट अ व ब मिळून २८ पदोन्नत्या दिल्या. श्री.एस.बी.पाटील यांना अप्पर निबंधक पदावर पदोन्नती दिली, श्री कर्डक व श्री. ए.व्ही.गाडे यांना सह निबंधक पदावर पदोन्नती दिली. श्री. बनसोडे, श्री. जे.जी. कंडारे, श्री. जी.जी.वालदे यांना उप निबंधक पदावर पदोन्नती दिली. श्री. ए.डी.जगताप,श्री. पी.डी.पिंपळे, श्री.मदारे, श्री.आर.एल.त्रिभुवन, श्री.पाटोळे, श्री. बी.एस.जाधव, श्री. पोथारे व श्री. चनकापूर यांना सहायक निबंधक पदावर पदोन्नती दिली.

तसेच श्री. एस.डी. मुन व श्री. एस.बी.उकेश यांना अपर निबंधक (ले.प.) पदावर पदोन्नती दिली. श्री. त्रिमुखे यांना सह निबंधक (ले.प.) पदावर पदोन्नती दिली. नियमाप्रमाणे पदोन्नती दिलेली आहे. विशेष लेखापरिक्षक वर्ग १ या सरळसेवेच्या ५ पदांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मुलाखत झाली होती. वैद्यनाथन समितीने

शिफारस केली, ती राज्य शासनाने मान्य केली. त्या शिफारशीप्रमाणे राज्यातील सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती बँका व विविध कार्यकारी सहकारी संस्था या संस्थांचे लेखापरीक्षण सहकार खात्याच्या लेखापरीक्षकांऐवजी सनदी लेखापाल व प्रमाणित लेखापरीक्षक यांनी करावयाचे आहे. त्यानुसार सहकार खात्याच्या लेखापरीक्षकांची राज्यातील सहकारी बँका यांची लेखापरीक्षणातील पदे कमी करण्यात आली आहेत. त्यामुळे अतिरिक्त कर्मचारीवर्ग झाला आहे. त्यामुळे सन २०१०-२०११ मध्ये एमपीएससीला दिलेली रिक्वॉयरमेंट थांबविण्याबाबत सांगितले असल्याचे स्पष्ट केले.

समितीने, पदोन्नती संदर्भात झालेल्या अन्यायाबाबत आलेल्या तक्रारीनुषंगाने असे स्पष्ट केले की, श्री.अनिल तुपे हे दलित समाजातील असून, ते सहकार विभागामध्ये लघुलेखक पदावर कार्यरत होते. परंतु वैद्यकीय कारणामुळे त्यांना तांत्रिक काम करणे शक्य नसल्यामुळे त्यांचा संवर्ग बदलण्याबाबत रितसर योग्य ती कार्यवाही केल्यानंतर शासनाने संवर्ग बदलण्यास परवानगी दिली. तद्‌नंतर श्री. अनिल तुपे यांचा संवर्ग बदलण्यात आला व त्यांना सहाय्यक निबंधक पदावर पदोन्नती देण्यात आली. त्यांनी जवळजवळ १० वर्षे सहाय्यक निबंधक पदावर काम केले. परंतु नंतर एका अधिकाऱ्याने सूडबुध्दीने त्यांना लघुलेखक पदावर पदावनत केले. श्री. अनिल तुपे यांच्यावर झालेल्या अन्यायाबाबत मंत्री महोदयांनी संबंधित सचिव आणि अधिकाऱ्यांना योग्य ते निदेश दिले. परंतु तरी सुध्दा अधिकारीवर्ग काहीही कार्यवाही करीत नाही. या प्रकरणी आयुक्तांनी चौकशी करुन, समितीला दौरा संपण्यापूर्वी या बाबतची वस्तुस्थितीदर्शक माहिती सादर करावी, त्यावर आयुक्त, सहकार आयुक्तालय यांनी श्री. अनिल तुपे यांचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित आहे, अशी समितीला माहिती दिली.

आयुक्तांनी दिलेल्या वरील माहितीच्या अनुषंगाने समितीने पुढे श्री. अनिल तुपे १९८३ साली निम्नश्रेणी लघुलेखक म्हणून रुजू झाले. कालांतराने त्यांना एक प्रतिमा दोनदा दिसत असल्यामुळे वैद्यकीय कारणास्तव शासन स्तरावर नियम-२६ व २७ अंतर्गत त्यांचा संवर्ग बदलण्यात येऊन ते सहाय्यक निबंधक पदावर रुजू झाले. त्यांनी त्या पदावर १० वर्षे काम केले. परंतु त्यानंतर त्यांच्या अधिकाऱ्यांनी सूडबुध्दीने त्यांना पुन्हा लघुलेखक म्हणून काम करण्यास सांगितले. या संदर्भातील माहिती बैठक संपण्यापूर्वी समितीला देण्यात यावी, असे निर्देश दिले.

अनुसूचित जाती कल्याण समितीने सहकार आयुक्तालय, पुणे येथे दिनांक २२ ऑगस्ट, २०१२ रोजी घेतलेल्या अधिकाऱ्याच्या साक्षीच्या वेळी उपस्थित झालेल्या ठराविक महत्त्वाच्या मुद्दयांबाबत खालील प्रमाणे लेखी माहिती देण्यात आली आहे

सहकार आयुक्तालय, पुणे यांच्या अंतर्गत पुणे येथे असलेल्या कार्यालयातील गट "अ" ते "ड" प्रवर्गात एकूण किती पदे आहेत त्यापैकी किती पदे सरळसेवा भरतीची आहेत?

मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या १३ टक्के कोट्यानूसार सरळसेवेची व पदोन्नतीची किती पदे भरण्यात आली आहेत. तसेच सरळसेवा व पदोन्नतीने भरलेल्या सदर पदांचा आकृतिबंध मंजुर आहे किंवा कसे या सर्व बाबींची खात्री शासनामार्फत करण्यात आली आहे काय?

अभिप्राय:- वरील प्रश्नाच्या अनुषंगाने गट-"अ" व गट "ब" मध्ये राज्यातील सर्व पदांचा समावेश केला असून त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | संवर्ग | एकूण मंजूर पदे | त्यापैकी सरळसेवेची पदे |
|---|---|---|---|
| १ | गट-" अ " (प्रशा + लेप) | ३२३ | १३५ |
| २ | गट-" ब " (प्रशा+ लेप) | ६३६ | ३१८ |
| | एकूण अ + ब . . | १५९ | ४५३ |

सहकार आयुक्तालय, पुणे येथे असलेल्या कार्यालयातील गट- “क” व गट- “ड” संवर्गातील पदांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | संवर्ग | एकूण मंजुर पदे | त्यापैकी सरळसेवेची पदे |
|---|---|---|---|
| १ | गट- “ क ” | | |
| | उच्च श्रेणी लघुलेखक | १६ | ८ |
| | निम्नश्रेणी लघुलेखक | १६ | ८ |
| | कार्यालय अधिक्षक | ३० | - |
| | मुख्य लिपीक | ४७ | - |
| | वरिष्ठ लिपीक | ११२ | २८ |
| | कनिष्ठ लिपीक | ७३ | ५५ |
| | लघुटंकलेखक | २ | २ |
| | वाहनचालक | १७ | १७ |
| | एकूण . . | ३१३ | ११८ |
| २ | गट- “ ड ” | | |
| | नाईक, झेरॉक्स, रोनिओ ऑपरेटर | १९ | - |
| | शिपाई | ७२ | ७२ |
| | एकूण | ९१ | ७२ |
| | एकूण क+ड | ४०४ | १९० |

शासन निर्णय सहकार पणन व वस्त्रोद्योग क्रमांक राजस-१००८/प्र.क्र.५३८/५-स दिनांक ५ मे, २०११ रोजी सहकार खात्याच्या सुधारीत आकृतीबंध मंजूर झालेला असून (परिशिष्ट-अ नूसार) संवर्ग निहाय मंजूर पदांवर सेवाप्रवेश नियमातील सरळसेवा व पदोन्नतीचे प्रमाण विचारात घेऊन खालीलप्रमाणे १३% आरक्षणानूसार मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | संवर्ग | अनुसूचित जाती प्रवर्गासाठी १३% नुसार मंजूर पदे | | त्यापैकी भरलेली पदे | |
|---|---|---|---|---|---|
| | | सरळसेवा | पदोन्नती | सरळसेवा | पदोन्नती |
| १ | गट- " अ " (प्रशा + लेप) | १८ | २४ | १३* | २४ |
| २ | गट- " ब " (प्रशा + लेप) | ४१ | ४१ | २६* | ४१ |
| ३ | गट- क | | | | |
| | उच्च श्रणी लघुलेखक | १ | १ | १ | १ |
| | निम्नश्रेणी लघुलेखक | १ | १ | १ | - |
| | कार्यालय अधिक्षक | - | ४ | - | ४ |
| | मुख्य लिपीक | - | ६ | - | ६ |
| | वरिष्ठ लिपीक | ३ | ११ | ३ | २* |
| | कनिष्ठ लिपीक | ७ | २ | ४* | - |
| | लघुटंकलेखक | १ | - | १ | - |
| | वाहनचालक | २ | - | २ | - |
| | एकूण . . | १५ २५ | १२ | १३ | |
| ४ | गट-" ड " | | | | |
| | शिपाई | ९ | - | ६* | - |
| | एकूण . . | ९ | - | ९ | - |

* टिप :-

- गट- अ:- गट-अ मध्ये ६ पदांचा अनुशेषापैकी प्रशासन कक्षाकडील पदोन्नती कोट्यातील १ पद व लेखापरीक्षण कक्षाकडील सरळसेवा कोट्यातील ५ पदे अशा एकूण ६ पदांचा अनुशेष आहे. पदोन्नतीने १पद भरण्यात आलेले आहे. लेखापरिक्षण

कक्षाकडील सरळसेवा कोट्यातील ५ पदांसाठी मागणीपत्र शासनास पाठविण्यात आलेले आहे.

- गट-ब:- १५ पदांच्या अनुशेषांपैकी ४ पदे प्रशासन कक्षाकडील तर ११ पदे लेखापरीक्षण कक्षाकडील आहे. प्रशासन कक्षाकडील सरळसेवेच्या ४ पदांसाठी सन २०१२ मध्ये ३ पदांचे तर सन २०१३ मध्ये १ पदाचे मागणीपत्र शासनास पाठविण्यात आलेले आहे.

सन२०१२ मध्ये ९ अधिकारी उपनिबंधक संवर्गात तदर्थ पदोन्नत झालेले आहेत मात्र त्यांचे बिंदू रिक्त पदांमध्ये विचारात घेण्यात आलेले नाहीत परंतु सहाय्यक निबंधक संवर्गातील पदे मात्र प्रत्यक्षात रिक्त आहेत.

- वैद्यनाथन समितीने केलेल्या शिफारशी केंद्र शासनाने स्विकृत केलेल्या आहेत. त्या शिफारशी अंमलात आल्यानंतर राज्यातील सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती बँका व विविध कार्यकारी सहकारी संस्था, या संस्थाचे लेखापरिक्षण सहकार खात्याच्या लेखापरिक्षकांऐवजी सनदी लेखापाल व प्रमाणित लेखापरिक्षण यांनी करावयाचे आहे. त्यामुळे लेखापरिक्षण कक्षाकडील कामकाज कमी झाल्याने विशेष लेखापरिक्षक संवर्गाचे मागणीपत्र शासनाने दिनांक ३१/७/२०१२ नुसार मागे घेतले आहे. सबब विशेष लेखापरिक्षक, वर्ग-२ संवर्गातील ११ पदे भरण्यात आलेली नाहीत.

- गट- क व गट- ड साठी सन २०१२-२०१३ मध्ये सरळसेवा भरती प्रक्रिया MKCL मार्फत राबविण्यात आली होती. सदर भरती प्रक्रिया राबविल्या नंतर काही पदांसाठी MKCL कडून पात्र उमेदवार उपलब्ध झाले नाहीत. तसेच जे कर्मचारी रुजू झाले त्यापैकी काही कर्मचाऱ्यांनी राजीनामा दिल्याने सरळसेवेची पदे रिक्त दिसतात.

- गट-क व गट-ड मधील कर्मचाऱ्यांना सन २०११-१२ पर्यंत रिक्त पदांचा विचार करुन पदोन्नती देता येत नाही. त्यामुळे पदोन्नती कोट्यातील पदे रिक्त दिसतात.

समितीला लेखी स्वरुपात पुरविण्यात आलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने अधिक माहिती जाणून घेण्याकरिता दिनांक ४ सप्टेंबर, २०१३ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

**विभागीय सचिवांची साक्ष:-**

साक्षीच्यावेळी समितीने, सहकार आयुक्तालय, पुणे यांच्या अंतर्गत पुणे येथे असलेल्या कार्यालयातील गट "अ" ते गट "ड" प्रवर्गात एकूण किती पदे आहेत, त्यापैकी किती पदे सरळसेवा भरतीची आहेत तसेच सरळसेवा व पदोन्नतीची पदे कशाप्रकारे निश्चित केली जातात याबाबतची माहिती विचारली असता, विभागीय प्रतिनिधी यांनी पदांचा आकृतीबंध राज्य शासन दर ३ वर्षांनी निश्चित करते. सहकार विभागात एकंदर ९१८३ पदे आहेत. त्यापैकी "अ" प्रवर्गातील ३२३, "ब" प्रवर्गातील ६३६, "क" प्रवर्गातील ६६८३ व "ड" प्रवर्गातील १५८१ पदे आहेत. एकूण मंजूर पदांपैकी आरक्षणाचा विचार केल्यास "अ" प्रवर्गातील ४४ पदे, "ब" प्रवर्गातील ८५ पदे, "क" प्रवर्गातील ८७२ पदे भरली पाहिजे होती. प्रत्यक्षात "अ" प्रवर्गातील ४४ पदांपैकी ३८ पदे भरलेली आहेत. "ब" प्रवर्गातील ८५ पदां पैकी ७१ पदे भरलेली आहेत, "क" प्रवर्गातील ८७२ पदांपैकी ६९० पदे भरलेली आहेत. सहकार विभागात प्रशासन व ऑडिट असे दोन विभाग आहेत. "अ" प्रवर्गात ६ पदे रिक्त आहेत. त्यातील ५ पदे ऑडिट व १ पद प्रशासन विभागातील आहे असे सांगितले. तसेच पुढे असे स्पष्ट केले की, सहकारी संस्थांचे ऑडिटिंग पूर्वी शासकीय ऑडिटर्स करायचे. या शासकीय ऑडिटर्सची संख्या जवळपास ३ हजार इतकी आहे. तथापि, ९७ व्या घटना दुरुस्तीनंतर राज्य शासनाने सहकार कायद्यात दुरुस्ती केलेली आहे. त्यामध्ये सहकारी संस्थांनी प्रमाणित लेखापरीक्षकांच्या पॅनेलमधील लेखापरीक्षकांकडून ऑडिट करून घ्यावे अशी तरतूद आहे. त्यावर समितीने ३ हजार शासकीय ऑडिटर्स आहेत. या कायद्यामुळे त्यांचे भवितव्य काय असणार आहे कायदा झाल्यानंतर खाजगी ऑडिटर्सना काम दिले जाणार आहे. त्यावर समितीने शासकीय ऑडिटर्सचे काम या खाजगी ऑडिटर्सना देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे काय, अशी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधी यांनी खाजगी ऑडिटर्सनी काम केले नाही तर या शासकीय ऑडिटर्सकडून ते काम करून घेता येईल व असे झाले तर त्यांना कामही मिळू शकेल. या पैकी किती जणांना प्रशासन विभागात सामावून घेता येईल याबाबतचा आढावा सुरु आहे. मार्केटिंग फेडरेशनचे १७२ ऑडिटर्स, डीसीसी बँकांचे प्रत्येकी ३० ते ४० ऑडिटर्स, एमएससी बँकचे ७० अधिकारी तसेच सहकारी साखर कारखाने येथील कर्मचाऱ्यांना एकत्रित करून त्यांचा प्रशासन विभागात समावेश करण्याबाबत विचार सुरु आहे.

उपरोक्त माहिती संदर्भात समितीने असे मत व्यक्त केले की, दिनांक १५ फेब्रुवारी, २०1३ रोजीच्या ९७ व्या घटना दुरूस्तीनुसार राज्य शासनाने सहकार कायद्यात सुधारणा करून जवळपास ३ ते ४ महिने झाले असून अद्यापही शाखेकडून विचारविनिमय करीत आहात असे सांगणे हे योग्य नाही. ऑडिटर्स संघटनेचा याला विरोध असेल तर तोपर्यंत नियुक्ती करणार नाही का, तसेच कायद्यानुसार नवीन नोकरभरतीवर बंदी असली तरी, ती बंदी शिथिल करून मागासवर्गीयांच्या जागा भरल्याच पाहिजेत असे शासनाचे धोरण आहे, असे असताना आपल्या विभागात त्याप्रमाणे कार्यवाहीझाल्याचे दिसून येत नाही, त्यावर विभागीय प्रतिनिधी यांनी असे स्पष्ट केले की, गेल्या १-२ वर्षांपासून नवीन नियुक्ती केलेली नाही. एमपीएससीकडे पदांची डिमांड करण्यात आली होती व त्या अनुषंगाने लेखी परीक्षा झाली होती. परंतु, ९७ व्या घटना दुरूस्ती झाल्यानंतर एमपीएससीकडे पाठविलेली विनंती मागे घेण्यात आलेली आहे. ऑडिट विभागातील भरती थांबविलेली आहे. इतर ठिकाणचा अनुशेष भरण्याची प्रक्रिया सुरुआहे व प्रशासन विभागात काही पदाची नोकरभरती सुरुआहे. त्यावर समितीने प्रशासन व ऑडिट हे आपल्या विभागाचे दोन भाग आहेत. तसेच, ऑडिटचे काम प्रायव्हेट ऑडिटर्सना देणार असल्यामुळे त्यामुळे ऑडिटरची पदे भरलेली नाहीत असे देखील सांगितले. परंतु, आरक्षणाची पदे तरी भरली पाहिजे होती, अशी पृच्छा केली असता विभागीय प्रतिनिधी यांनी ऑडिट विभागाचे काम या आधीच खाजगी ऑडिटर्सना दिले आहे. त्यामुळे आता प्रत्यक्षात कामच नाही. सध्या असलेले अधिकारी प्रत्यक्षात सुपरव्हिजनचे काम करीत आहेत. त्यांचे पगाराबाबतच्या ज्या अडचणी आहेत, त्याबाबत विशेष बाब म्हणून वित्त विभागाकडून मान्यता घेऊन त्यांचा पगार दिला जातो. याबाबत आयुक्तांनी एक अहवाल सादर केला होता. परंतु, त्यांना सुस्पष्ट रिपोर्ट देण्यास सांगण्यात आले आहे. याबाबत येत्या काही दिवसांत मा.मंत्री महोदयांसमवेत चर्चा करण्यात येईल, असे समितीला आश्वासित केले.

समितीने याबाबतीत असे निर्देश दिले की, आरक्षणाच्या रिक्त जागा भरल्या पाहिजेत याबाबत शासनाचे धोरण आहे. मागासवर्गीयांना न्याय मिळण्याच्या दृष्टीने नोकरभरतीवरील बंदी शिथिल करून पदे भरण्याचा दृष्टीकोन मध्यंतरी घेण्यात आला होता. परंतु, या प्रकरणात असे झालेले दिसत नाही. आपण याबाबत मा.मंत्री महोदयांना सांगितले पाहिजे. याबाबत समितीला देखील कळविले पाहिजे जेणेकरुन समिती याबाबत शिफारस

करु शकेल. त्यावर विभागीय प्रतिनिधी यांनी काम नाही याकरिता या सर्व पोस्ट सरेंडर कराव्यात अशी नोट मुव्ह केलेली आहे. पॉलिसी डिसिजन झाल्यानंतर त्या अनुषंगाने काम होईल. परंतु, विद्यमान अधिकाऱ्यांच्या असोसिएशनचा यातील काही गोष्टींना विरोध आहे. यामध्ये इतर पर्याय शोधण्याचा, यातील जास्तीत जास्त लोकांना प्रशासन विभागात सामावून घेण्याचा विभागाचा प्रयत्न सुरुआहे. परंतु, ९७ व्या घटना दुरुस्तीनंतर अगदी स्पष्टपणे ही पदे सरेंडर करावी असे स्पष्टपणे सांगण्यात आले असल्याचा खुलासा करुन ऑडिटर्स हे शासकीय सेवेत असल्याने त्यांना सर्व्हिस प्रोटेक्शन आहे. परंतु, त्यांचे असे म्हणणे आहे की, ऑडिटिंग करणे हे ऑडिटर्सचे काम असताना विभागाच्या बाहेर काम करण्यास जाणे योग्य नाही. यासंदर्भात सहकार कायद्यात झालेल्या दुरुस्तीच्या अनुषंगाने त्याची अंमलबजावणी करुन कार्यवाही करण्यासाठी मा.मंत्री महोदयांसोबत चर्चा सुरु असल्याचे सांगितले. त्यावर समितीने यासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी पुढे असे विचारले की, ९७ व्या घटना दुरूस्तीनंतर खाजगी ऑडिटर्सकडून ऑडिट करण्याचा निर्णय घेतलेला आहे. परंतु, जर त्यांनी वेळेवर ऑडिट केले नाही, तर त्यांच्यावर काय कारवाई केली जाणार आहे त्यावर विभागीय प्रतिनिधीयांनी सहकारकायद्यातील ८१ सेक्शनवर विधिमंडळात बऱ्यापैकी चर्चा झालेली आहे. त्यानुसार ऑडिटकरिता ४ महिन्यांची मुदत दिलेली आहे. आर्थिक वर्ष संपल्यांनतर ४ महिन्यांत ऑडिटचे काम पूर्ण करुन दोन महिन्यांत जनरल बॉडीचे अप्रुव्हल घेतले पाहिजे अशी कायद्यात तरतूद करण्यात आली आहे. वेळेवर ऑडिट करुन घेणे किंवा जनरल बॉडीचे अप्रुव्हल घेणे यापैकी एका बाबीची पूर्तता केली नसेल तरी देखील बोर्डावर कारवाई करावी असा निर्णय झाला असल्याची माहिती समितीला दिली.

समितीने अनुसूचित जातीकरिता गट “अ” मधील अपर आयुक्त व विशेष निबंधक/पणन संचालक संवर्गातील पदोन्नती संदर्भात पाठविलेल्या प्रस्तावावर निर्णय घेण्यात आला आहे काय तसेच आयुक्त, सहकार आयुक्तालय यांनी असे स्पष्ट केले की, यासंबंधी निर्णय घेतला आहे. श्री.एस.बी.पाटील यांना पदोन्नती देण्यात आली होती. ते रुजू देखील झाले होते. श्री.पाटील हे तीन महिन्यांपूर्वीच उक्त पदावरुन सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यामुळे सध्या हे पद रिक्त असून सदर पद भरण्यासंबंधीचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. त्यावर समितीने श्री.अनिल तुपे, लघुलेखक, सहकार विभाग

यांना वैद्यकीय कारणास्तव तांत्रिक पदावरुन सहायक निबंधक म्हणून मंजुरी देण्यात आली होती. त्यानंतर त्यांनी १० वर्षे सहायक निबंधक पदावर काम केले असता त्यांना पुन्हा लघुलेखक पदावर पदावनत करण्याची कारणे काय आहेत, श्री.तुपे यांच्या शासनस्तरावर प्रलंबित असलेल्या प्रस्तावावर निर्णय झाला आहे काय, सद्य:स्थितीत श्री.तुपे कोणत्या पदावर कार्यरत आहेत अशी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधी यांनी श्री.तुपे यांची सहकार खात्यामध्ये सन १९८३ मध्ये निम्नश्रेणी लघुलेखक या पदावर नियुक्ती झाली होती. श्री.तुपे यांना सन १९९८ मध्ये स्वीय सहायक संवर्गात पदोन्नती देण्यात आली व सहायक निबंधक, सहकारी संस्था या संवर्गात रिक्त झालेल्या पदावर बदली करण्यात आली. सदर प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आला. श्री.तुपे यांची सहायक निबंधक या पदावर नियुक्ती करावयाची असल्यामुळे व या पदावर नेमणूक करण्याचे अधिकार शासनाला असल्यामुळे सदर प्रस्ताव शासन स्तरावर पाठविण्यात आला व लोकसेवा आयोगाची मान्यता घ्यावी लागेल यासह एकूण तीन अटी टाकण्यात आल्या. या प्रस्तावाचा अभ्यास करुन श्री.तुपे यांना पदावनत करण्यात यावे अशा प्रकारचा आदेश शासन स्तरावर काढण्यात आला. त्यानंतर श्री.तुपे हे मॅटमध्ये गेले व त्यांनी मूळ अर्जासंबंधी देण्यात आलेल्या निकालाविरुध्द उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली असून मॅटच्या निर्णयाला उच्च न्यायालयाने स्टे दिलेला आहे अशी समितीला माहिती दिली असता समितीने यामध्ये एक टप्पा आपण सोडून दिलेला आहे. श्री.तुपे यांना दिनांक ७ नोव्हेंबर, १९८३ रोजी निम्नश्रेणी लघुलेखक या पदावर नियुक्ती देण्यात आली होती. त्यानंतर दिनांक २१ जानेवारी, १९९१ रोजी उच्चश्रेणी लघुलेखक या पदावर पदोन्नती देण्यात आली व दिनांक २४ नोव्हेंबर, १९९८ रोजी स्वीय सहायक संवर्गात पदोन्नती देऊन सहायक निबंधक, सहकारी संस्था या संवर्गात बदली करण्यात आली. त्यानंतर त्यांना पदावनत करण्यात आले आहे. त्यांना उच्चश्रेणी लघुलेखक या पदावर पदावनत न करता त्यांच्या मूळ म्हणजे निम्नश्रेणी लघुलेखक या पदावर पदावनत केले आहे. ते कसे काय केले आहे या संदर्भात समितीला खुलासा करण्यास सांगितले. त्यावर विभागीय प्रतिनिधी यांनी श्री.तुपे यांनी लघुलेखन गतीचे शासकीय वाणिज्य परीक्षा प्रमाणपत्र सादर केले होते. त्याची चौकशी करण्यात आली. त्यात श्री.तुपे यांनी सादर केलेले शासकीय वाणिज्य परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र बनावट असल्याचे आढळले. त्यामुळे त्यांची चौकशी करण्यात आली व सदर प्रमाणपत्र बनावट असल्याचे सिध्द झाले. या चौकशीत श्री.तुपे यांनी सांगितले की, सदर प्रमाणपत्र मी दिलेले नाही

म्हणून त्यांना दोषमुक्त करण्यात आलेले आहे. त्यामुळे शासनाने त्यांना निम्नश्रेणी लघुलेखक या पदावर पदावनत केले आहे. उच्च श्रेणी लघुलेखनासाठी १२० शब्द प्रति मिनिट परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे, असे स्पष्ट केले असता या संदर्भात समितीने अशी विचारणा केली की, श्री.तुपे यांनी हे प्रमाणपत्र दिले नाही तर मग कोणी दिले व कोणाचे प्रमाणपत्र आहे याची चौकशी झाली पाहिजे. श्री.तुपे यांचे परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र कोणी स्वीकारले आहे, श्री.तुपे यांची पदोन्नतीची फाईल ज्याने कोणी सादर केली आहे त्यांच्यावर देखील कारवाई केली पाहिजे असे समितीचे मत आहे. त्यावर विभागीय प्रतिनिधी यांनी श्री.तुपे यांची फाईल मा.मुख्यमंत्र्यांकडे गेली होती. त्यावेळी ज्या अधिका-याने पदोन्नती दिलेली आहे त्याच्यावर जबाबदारी निश्चित करावी असे आदेश देण्यात आले. त्या अनुसार संबंधित अधिका-यावर जबाबदारी निश्चित करुन विभागीय चौकशी सुरुकरण्यात आली आहे. श्री.यशोदे, अपर आयुक्त हे विभागीय चौकशी करीत आहे. संबंधित अधिकारी हे दोन महिन्यांपूर्वीच सेवानिवृत्त झाले आहेत असे समितीला स्पष्ट केले. समितीने या सर्व गोष्टींवर आक्षेप घेऊन अशी पृच्छा केली की, श्री.तुपे यांना प्रमोशन कसे काय दिले आहे व त्यांनी प्रमोशन कसे काय स्वीकारले आहे? त्यावर विभागीय प्रतिनिधी यांनी श्री.तुपे यांनी उच्च श्रेणी लघुलेखनासाठी आवश्यक असलेली १२० शब्द प्रति मिनिट परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यामुळे त्यांना प्रमोशन देण्यात आले. तथापि, सदर प्रमाणपत्र बनावट असल्याचे आढळून आले व सदर प्रमाणपत्र मी दिलेले नाही असे त्यांनी स्पष्ट केले असल्याचे समितीला सांगितले. या सर्व गोष्टींचा विचार करून समितीने श्री.तुपे यांना त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारावर प्रमोशन दिलेले असणार. यात फार मोठे रॅकेट आहे. श्री.तुपे यांचा अर्ज कुठल्या अधिका-याने स्वीकारला आहे, याची चौकशी झाली पाहिजे. हे प्रमाणपत्र नक्की कोणाचे आहे याची देखील चौकशी केली पाहिजे. यासाठी आपण सक्षम अधिकारी नियुक्त करावा. कारण हे फार गंभीर प्रकरण आहे. बनावट प्रमाणपत्राच्या आधारावर श्री.तुपे यांनी दोन पदोन्नतीचा फायदा घेतला आहे. असे असताना श्री.तुपे यांना क्लिन चीट दिलेली आहे असे समितीचे मत आहे. पदोन्नतीचा लाभ घेऊन मी काही केले नाही असे म्हणणे योग्य नाही याबाबत समितीने तीव्र आक्षेप नोंदविला असून याबाबत कारवाई करण्याची आवश्यकता असल्याचे समितीने सांगितले. त्यावर विभागीय प्रतिनिधी यांनी त्यावेळची फाईल काढून आयुक्तांना चौकशी करण्यास सांगितले जाईल तसेच, यासंबंधी चौकशी अधिकारी नियुक्त केला जाईल असे समितीला आश्वासित केले.

**अभिप्राय व शिफारशी:-**

१) सहकार आयुक्तालय, या कार्यालयांतर्गत गट "अ" मधील अप्पर आयुक्त व विशेष निबंधक/पणन संचालक या संवर्गातील अनुसूचित जातीच्या एका पदाचा अनुशेष बाकी असून त्याबाबतच्या पदोन्नतीच्या प्रस्तावावर सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली असल्यास त्या अनुषंगाने **अनुसूचित जातीच्या उमेदवारास पदोन्नती देण्याबाबत शासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी व त्याबाबतची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

२) सहकार आयुक्तालय कार्यालयात २१६ पदांचा अनुशेष विविध कारणामुळे निर्माण झाल्याचे कार्यालयाने निदर्शनास आणले आहे.**सदर कार्यालयात कार्यरत असलेल्या अनुसूचित जातीच्या कर्मचाऱ्यांना योग्य ते प्रशिक्षण देऊन त्यांना त्या त्या संवर्गात योग्य त्या पदावर पदोन्नती वा नियुक्ती देण्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व त्याबाबतची माहिती समितीला तीन महिन्यात अवगत करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

३) सहकार आयुक्तालय कार्यालयातील लेखापरीक्षण विभागातील लेखापरीक्षणाचे काम खासगी लेखापरीक्षकांना देण्यात येणार असल्यामुळे लेखापरीक्षण विभागातील अधिकारी प्रत्यक्षात पर्यवेक्षणाचे काम करीत आहेत.लेखापरीक्षण करणे हे त्यांचे काम असताना ते विभागाच्या बाहेर काम करीत आहेत. **त्यामुळे याप्रकरणी सदर कार्यालयातील लेखापरीक्षकांना लेखापरीक्षणाचेच काम देण्यासंदर्भात शासनस्तरावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी व त्याबाबतची माहिती समितीला पाठविण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

४) सहकार आयुक्तालय कार्यालयातील श्री. अनिल तुपे निम्नश्रेणी लघुलेखक यांनी सादर केलेल्या प्रमाणपत्रासंदर्भात तपासणी करण्यात आली असल्यास व सदर न्यायप्रविष्ट प्रकरणाचा निकाल पुर्ण झाला असल्यास याप्रकरणी श्री.तुपे यांच्यावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच **यापुढे उमेदवारांची सर्व प्रमाणपत्रांची योग्यरित्या तपासणी करुन त्यांची नेमणूक वा त्यांना पदोन्नती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे याबाबतची माहिती समितीला तीन महिन्यात सादर करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

## २) जात वैधता प्रमाणपत्र :

सहकार आयुक्त कार्यालय व या कार्यालया अंतर्गत येत असलेल्या विभागातील अनुसूचित जातीच्या गट-अ ते गट-ड या सेवेत असलेल्या अधिकारी/कर्मचारी वर्गाची जात पडताळणी केली आहे काय, असल्यास केव्हा, या संदर्भातील माहिती जाणून घेण्यासाठी पाठविण्यात आलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने सहकार आयुक्तालयाकडून प्राप्त झालेली माहिती पुढील प्रमाणे आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शा.नि.क्र.सीबीसी १०/२००४/प्र.क्र.५७०/मावक-५ दिनांक १६ मे, २००७ अन्वये अनुसूचित जाती संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. शासकीय कार्यालयामधील गट-अ ते गट-ड संवर्गातील पदांवर सरळसेवेने अथवा पदोन्नतीने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या जात पडताळणी संबंधी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार अधिकारी/कर्मचाऱ्यांची जात पडताळणी करुन वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय नियुक्त्या अथवा पदोन्नती दिली जात नाही.

या कार्यालयाचे जा.क्र.आस्था/का.अ/जातपडवर्ग-वर्ग२/०४, दिनांक ६ जुलै, ०४ व अ.शा.प्र.क्र. दिनांक १० ऑक्टोबर, २००५ तसेच या कार्यालयाचे जा.क्र.आस्था/का.अ/जातपडवर्ग१-वर्ग २/०६ दिनांक ३० ऑक्टोबर, २००६ अन्वये सर्व संबंधीत कार्यालय/विभाग कार्यालय यांना जातपडताळणी करण्यासंदर्भात सविस्तर सूचना दिलेल्या आहेत.

शासनाने शासन निर्णय दिनांक १२ डिसेंबर, २०११ अन्वये सेवेत नवीन नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यासाठी नियुक्ती नंतर ६ महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची सवलत दिलेली आहे.

सहकार खात्यातील गट-अ ते गट-ड संवर्गातील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांची जात पडताळणी करुन घेण्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे. या कार्यालयामधील तसेच क्षेत्रिय आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या जात पडताळणी करण्यासाठी त्या त्या विभागातील जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रस्ताव पाठविण्याबाबत विभागीय कार्यालयांना वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत. पदोन्नतीस पात्र असलेल्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र असल्यासच त्या कर्मचाऱ्यास पदोन्नती देण्यात येते.

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने सहकार आयुक्त कार्यालयातंर्गत येणाऱ्या विविध विभागातील अधिकारी/कर्मचारी यांच्या जात पडताळणी संदर्भात माहिती जाणून घेण्यासाठी दिनांक २२ ऑगस्ट, २०१२ रोजी सहकार आयुक्तालय, पुणे येथील कार्यालयास भेट देऊन संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली.

सदर साक्षीच्या वेळी समितीने जात वैधता प्रमाणपत्र किती जणांनी दिले व किती जणांनी दिले नव्हते, अशी विचारणा केली असता सहाय्यक आयुक्त, मागासवर्ग कक्ष यांनी एकूण मागासवर्गीय कर्मचाऱ्यांची संख्या ४८६ होती, त्या सर्वांचे जातीचे प्रमाणपत्र होते आणि त्यामधील फक्त ५३ कर्मचाऱ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र होते. बाकीच्या कर्मचाऱ्यांकडे जात वैधता प्रमाणपत्र नव्हते, असे स्पष्ट केले. त्यावर समितीने,सहाय्यक आयुक्त यांनी असे तपासणीच्या वेळी अभिप्राय दिले असून कर्मचारी सन १९९५ पूर्वीचे असतील तर त्यांच्या संदर्भात सविस्तर माहिती देण्यात यावी, असे निर्देश दिले. तसेच यासंदर्भात आयुक्त, सहकार आयुक्तालय यांनी पुढे अधिक खुलासा केला की, माहे, एप्रिल, २०१२ मध्ये नेमणूक झालेल्या २६ अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या जात पडताळणीचे प्रस्ताव जात पडताळणी समितीकडे पाठविलेले आहेत. सदरची २६ प्रकरणे जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत. त्यांची सहा महिन्यांची मुदत पुढील महिन्यात संपणार आहे.

समितीस प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे श्री.पी.जी.विधातेकर, कनिष्ठ लिपिक यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेले आहे. याबाबत सद्य:स्थिती काय आहे, श्री. विधातेकर सेवेत केव्हा व कोणत्या पदावर रुजू झाले, याचा समितीला खुलासा करण्याबाबत सांगितले असता आयुक्त, सहकार आयुक्तालय यांनी श्री.विधातेकर यांचे जात प्रमाणपत्र जात पडताळणी समितीने दिनांक २७ डिसेंबर, २०११ रोजी अवैध ठरविले. त्या विरोधात श्री. विधातेकर यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली. उच्च न्यायालयाने श्री.विधातेकर यांना पुन्हा जात पडताळणी समितीसमोर जाऊन, जात प्रमाणपत्राची तपासणी करुन घेण्याचे आदेश दिले. त्यामुळे हे प्रकरण प्रलंबित आहे. सद्य:स्थितीत श्री. विधातेकर निलंबित असल्याचा खुलासा केला. यासंदर्भात समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतर

जात पडताळणी समितीच्या ऑर्डरमध्येच नमूद केलेले असते की, संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्यास १५ दिवसांच्या आत सेवेतून काढून टाकावे. परंतु श्री.विधातेकर यांचे प्रकरण जात पडताळणी समितीने अवैध ठरविल्यानंतर त्यांना बडतर्फ न करता केवळ निलंबित करण्यामागील कारण काय आहे, अशी विचारणा केली असता. आयुक्त, सहकार आयुक्तालय यांनी असे स्पष्ट केले की, सह निबंधक, औरंगाबाद यांनी श्री.विधातेकर यांच्या संदर्भात दिलेले आदेश असे होते. विभागीय चौकशी करण्यात यावी आणि आरोप सिध्द झाल्यास त्यांना शासकीय सेवेतून बडतर्फ करावे. याचाच अर्थ सह निबंधक, औरंगाबाद यांनी आरोप सिध्द होईपर्यंत श्री.विधातेकर यांना निलंबित केले असून ते माला जंगम जातीचे आहेत, अशी माहिती दिली. श्री. विधातेकर यांनी नोकरीवर लागण्यासाठी बनावट जात प्रमाणपत्र सादर केले आहे. एकप्रकारे शासकीय सेवा मिळविण्यासाठी त्यांनी गैरप्रकार केला आहे. याप्रकरणी त्यांना निलंबित करण्याचे काहीच कारण नव्हते. या प्रकरणी एका अधिकाऱ्याच्या चुकीच्या ऑर्डरमुळे शासनाची आर्थिक हानी झालेली आहे. कारण निलंबित करणे ही शिक्षा नसून एकप्रकारे त्या व्यक्तीला न्यायालयात दाद मागण्यासाठी दिलेली संधी आहे. हा व्यवहार संगनमताने केलेला आहे. म्हणून सह निबंधक, औरंगाबाद यांना कडक शिक्षा केली पाहिजे. जेणेकडून भविष्यात अशा प्रकारचे वर्तन अन्य दुसरे अधिकारी करणार नाहीत. ही बाब लक्षात घेता सहकार आयुक्तांनी या प्रकरणी अहवाल तयार करुन तो शासनाकडे पाठवावा, अशी समितीने सूचना केली तसेच सहकार आयुक्तांनी याप्रकरणी योग्य ती कारवाई करुन समितीला अहवाल सादर करावा.

त्यावर आयुक्त, सहकार आयुक्तालय यांनी याबाबत सहमती दर्शवून सह निबंधक, औरंगाबाद यांनी या प्रकरणी निलंबित करण्याची ऑर्डर न देता बडतर्फ करण्याची ऑर्डर द्यावयास हवी होती. सह निबंधक, औरंगाबाद हे वर्ग-१ चे अधिकारी असल्यामुळे समितीने सुचविल्यानुसार त्यांच्यावर कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येईल. असे समितीस आश्वासित केले.

**अभिप्राय व शिफारशी :**

१) श्री. पी. जी. विधातेकर, कनिष्ठ लिपिक यांनी सेवेत लागताना सादर केलले जात प्रमाणपत्र जात पडताळणी समितीने दिनांक २७ डिसेंबर, २०११ रोजी अवैध ठरविले. श्री. विधातेकर यांनी शासकीय सेवा मिळविण्यासाठी **बनावट जात प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत रुजू झाल्याचा गैर प्रकार केला असतानादेखील त्यांना १५ दिवंसाच्या आत सेवेतून बडतर्फ करण्याची आवश्यकता असताना त्यांना निलंबित करण्यात येवुन एक प्रकारे त्यांना अधिक संधी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.**

**या प्रकरणी जे संबंधित अधिकारी आहेत त्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावाअशी समितीची शिफारस आहे.**

२) सहकार आयुक्त कार्यालय व या कार्यालयाअंतर्गत स्थापन केलेल्या मागासवर्ग कक्षामार्फत अशी माहिती देण्यात आली की एकूण ४८६ मागासवर्गीय कर्मचाऱ्यांपैकी ५३ कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र दिले आहे.माहे एप्रिल, २०१२ मध्ये नेमणूक झालेल्या २६ अधिकारी / कर्मचारी यांची जात पडताळणीचे प्रस्ताव जात पडताळणी समितीकडे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आणले.

सहकार आयुक्त कार्यालय व त्या अंतर्गत येणाऱ्या कार्यालयातील पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती संबंधित पदावर होण्याच्या दृष्टीने **मागासवर्गीय कर्मचाऱ्यापैकी ज्या कर्मचाऱ्यांची जात प्रमाणपत्राची पडताळणी झालेली नाही त्या कर्मचाऱ्यांचे जात प्रमाणपत्र शक्य तितक्या लवकर पडताळणीसाठी पाठविण्यात यावेत व याबाबत शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

**(ब) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, रा.प.पुणे विभाग,पुणे.**

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पुणे विभाग यांच्या विभागीय कार्यालयातील अनुसूचित जातीच्या अधिकारी/कर्मचारी यांच्या भरती, बढती, आरक्षण व अनुशेषाबाबत...**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, रा.प.पुणे विभाग, यांच्या विभागीय कार्यालयातील अनुसूचित जातीचे अधिकारी/कर्मचारी यांच्या भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी कार्यान्वित केलेल्या योजनांबाबतची माहिती मिळविण्यासाठी समितीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामध्ये वर्ग ०१ ते ०४ च्या संवर्गातील तांत्रिक / अतांत्रिक / वाहक / चालक इत्यादींची एकूण किती पदे मंजूर आहेत त्यापैकी मार्च, २०१२ अखेर पर्यंत प्रत्यक्षात वर्ग निहाय किती पदे भरण्यात आली आहेत तसेच, उक्त मंजूर पदांपैकी वर्गनिहाय तांत्रिक/ अंतात्रिक / वाहक/चालक यांची प्रत्येकी किती पदे अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आली आहेत. उक्त राखीव पदांपैकी प्रत्यक्षात किती पदे भरण्यात आली आहेत. रिक्त पदे भरण्याबाबत आतापर्यंत कोण-कोणते प्रयत्न करण्यात आले आहेत या संदर्भातील मुद्यांबाबत मागविलेल्या माहितीच्या अनुषंगाने पुणे येथील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पुणे विभागीय कार्यालयाकडून प्राप्त झालेली माहिती पुढील प्रमाणे आहे.

पुणे येथील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामधील वर्ग-१, वर्ग-२ व वर्ग-३ राज्यस्तरीय पदांची भरती/बढती इत्यादी बाबतची कार्यवाही रा.प. मध्यवर्ती कार्यालय, मुंबई यांचे मार्फत केली जाते. रा.प. पुणे विभागामध्ये वर्ग-३ घटक संवर्ग व वर्ग-४ मधील तांत्रिक/अंतात्रिक / चालक/वाहक इत्यादींची एकूण मंजूर पदे व त्यापैकी मार्च, २०१२ अखेर प्रत्यक्षात भरलेली पदे त्याचप्रमाणे अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी राखीव पदे, भरलेली पदे व रिक्त पदांबाबतची माहिती खालील परिशिष्टात नमूद पुढिल आहे.

## परिशिष्ट

| अ.क्र. | पदाचे नांव | एकूण मंजूर पदे | | | एकूण भरलेली पदे | | | अनुसूचित जातीसाठी राखीव पदे | | | अनुसूचित जातीची भरलेली पदे | | | अनुसूचित जातीची रिक्त पदे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सरळ सेवा | खात्या मार्फत | एकूण | सरळ सेवा | खात्या मार्फत | एकूण | सरळ सेवा | खात्या मार्फत | एकूण | सरळ सेवा | खात्या मार्फत | एकूण | सरळ सेवा | खात्या मार्फत | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) | (१७) |
| **वर्ग -३ (घटक संवर्ग) तांत्रिक पदे.** | | | | | | | | | | | | | | | | |
| (१) | प्रमुख कारागीर | १२ | ३७ | ४९ | ९ | २९ | ३८ | २ | ५ | ७ | २ | ३ | ५ | ० | २ | २ |
| (२) | कारागीर 'क' | ८२ | २४७ | ३२९ | ५३ | १५४ | २०७ | ११ | ३२ | ४३ | ७ | २० | २७ | ४ | १२ | १६ |
| (३) | सहा. कारागीर | -- | ३०१ | ३०१ | -- | २३५ | २३५ | -- | ३९ | ३९ | -- | २० | २० | ० | १९ | १९ |
| | **एकूण . .** | **९४** | **५८५** | **६७९** | **६२** | **४१८** | **४८०** | **१३** | **७६** | **८९** | **९** | **४३** | **५२** | **४** | **३३** | **३७** |
| **वर्ग -३ (घटक संवर्ग) तांत्रिक पदे.** | | | | | | | | | | | | | | | | |
| (१) | सहा. भांडारपाल | १ | ३ | ४ | १ | १ | २ | -- | १ | १ | -- | १ | १ | -- | --- | --- |
| (२) | समयपाल | २ | -- | २ | १ | -- | १ | १ | -- | १ | -- | --- | --- | १ | --- | १ |
| (३) | दुय्यम अभियंता | १ | -- | १ | २ | -- | २ | -- | -- | -- | २ | --- | २ | --- | -- | --- |
| (४) | आरेखक | --- | --- | -- | १ | --- | १ | --- | --- | -- | --- | --- | -- | --- | -- | --- |
| (५) | कनिष्ठ संगणित्र चालक | --- | ६ | ६ | --- | १ | १ | -- | १ | १ | -- | १ | १ | --- | -- | --- |
| (६) | वरिष्ठ रोखपाल | १ | १ | २ | --- | --- | --- | -- | -- | --- | -- | -- | -- | -- | -- | --- |
| (७) | लघु टंकलेखक | १ | -- | १ | १ | -- | १ | -- | -- | -- | -- | --- | -- | -- | -- | -- |

## परिशिष्ट---चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) | (१७) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (८) | कनिष्ठ सहाय्यक | १५ | ४६ | ६१ | ९ | ३० | ३९ | २ | ६ | ८ | २ | ३ | ५ | -- | ३ | ३ |
| (९) | विजतंत्री (स्थापत्य) | ३ | -- | ३ | १ | -- | १ | १ | -- | १ | -- | -- | -- | १ | --- | १ |
| (१०) | सहा.वाह.निरिक्षक | ९ | २६ | ३५ | ६ | १९ | २५ | १ | ३ | ४ | १ | ३ | ४ | -- | -- | --- |
| (११) | मिश्रक | १ | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | --- | -- | -- | -- | -- | --- |
| (१२) | अनुरेखक | १ | --- | १ | १ | -- | १ | २ | -- | २ | -- | -- | --- | -- | -- | -- |
| (१३) | लिपीक टंकलेखक | १५ | -- | १५ | १४ | -- | १४ | २ | -- | २ | ५ | -- | ५ | -- | -- | -- |
| (१४) | कनिष्ठ लिपीक | २७६ | -- | २७६ | २३१ | -- | २३१ | ३६ | -- | ३६ | ३२ | -- | ३२ | ४ | -- | ४ |
| (१५) | कामगार कल्याण निर्देशिका | १ | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (१६) | दूरध्वनी चालक | १ | -- | १ | १ | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (१७) | इमारत निरिक्षक | ३ | -- | ३ | १ | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (१८) | वाहतूक नियंत्रक | ४८ | १४३ | १९१ | ६० | १०६ | १६६ | ७ | १९ | २६ | ४ | ११ | १५ | ३ | ८ | ११ |
| (१९) | चालक | २१७७ | -- | २१७७ | २००१ | -- | २००१ | २८३ | -- | २८३ | २९१ | -- | २९१ | -- | -- | -- |
| (२०) | नळ कारागीर | १ | -- | १ | १ | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (२१) | गवंडी | १ | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (२२) | रंगारी | १ | -- | १ | १ | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (२३) | सुतार | १ | -- | १ | १ | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (२४) | प्रमुख द्वारपाल | २ | -- | २ | १ | -- | १ | १ | -- | १ | २ | -- | २ | -- | -- | -- |
| (२५) | वाहक | २१०८ | -- | २१०८ | १९९५ | -- | १९९५ | २७४ | -- | २७४ | २३७ | -- | २३७ | ३७ | -- | ३७ |
| | **एकूण ..** | **४६७०** | **२२५** | **४८९५** | **४३३०** | **१५७** | **४४८७** | **६०८** | **२८** | **६३६** | **५७६** | **१९** | **५९५** | **४६** | **११** | **५७** |

## परिशिष्ट---चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) | (१७) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **वर्ग -४ तांत्रिक पदे.** | | | | | | | | | | | | | | | | |
| (१) | सहाय्यक | ४४८ | -- | ४४८ | ३४२ | -- | ३४२ | ५८ | -- | ५८ | ४८ | -- | ४८ | १० | -- | १० |
| **वर्ग -४ अतांत्रिक पदे.** | | | | | | | | | | | | | | | | |
| (१) | द्वारपाल | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ | -- | -- | -- | -- | १ | १ |
| (२) | खानसामा अति.परिसर | ४ | -- | ४ | २ | -- | २ | १ | -- | १ | -- | -- | -- | १ | -- | १ |
| (३) | नाईक | -- | -- | -- | १ | १ | २ | -- | १ | १ | -- | १ | १ | -- | -- | --- |
| (४) | मजदूर | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (५) | सफाईगार | २० | -- | २० | २० | -- | २० | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (६) | शिपाई | २२ | -- | २२ | २१ | -- | २१ | ३ | -- | ३ | ५ | -- | ५ | -- | -- | -- |
| (७) | सु.रक्षक | १११ | -- | १११ | २९ | -- | २९ | १४ | -- | १४ | ७ | -- | ७ | ७ | -- | ७ |
| (८) | खलाशी | १ | -- | १ | १ | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (९) | परिचर/इशाराकार | ३ | -- | ३ | ३ | -- | ३ | १ | -- | १ | १ | -- | १ | -- | -- | -- |
| (१०) | स्वच्छक | ५७ | -- | ५७ | ५७ | -- | ५७ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | एकूण . . | २२६ | -- | २२६ | १४२ | १ | १४३ | २० | २ | २२ | १६ | १ | १७ | ८ | १ | ९ |

**वर्ग -३ (घटक संवर्ग) तांत्रिक/अतांत्रिक पदे.**

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) तांत्रिक पदे | ९४ | ५८५ | ६७९ | ६२ | ४१८ | ४८० | १३ | ७६ | ८९ | ९ | ४३ | ५२ | ४ | ३३ | ३७ |
| (२) अतांत्रिक पदे | ४६७० | २२५ | ४८९५ | ४३३० | १५७ | ४४८७ | ६०८ | २८ | ६३६ | ५७६ | १९ | ५९५ | ४६ | ११ | ५७ |
| एकूण . . | ४७६४ | ८१० | ५५७४ | ४३९२ | ५७५ | ४९६७ | ६२१ | १०४ | ७२५ | ५८५ | ६२ | ६४७ | ५० | ४४ | ९४ |
| (१) तांत्रिक पदे | ४४८ | -- | ४४८ | ३४२ | -- | ३४२ | ५८ | -- | ५८ | ४८ | -- | ४८ | १० | -- | १० |
| (२) अतांत्रिक पदे | २२६ | -- | २२६ | १४२ | १ | १४३ | २० | २ | २२ | १६ | १ | १७ | ८ | १ | ९ |
| एकूण . . | ६७४ | -- | ६७४ | ४८४ | १ | ४८५ | ७८ | २ | ८० | ६४ | १ | ६५ | १८ | १ | १९ |

वर्ग-३ (घटक संवर्ग) व वर्ग-४ पदातील अनुसूचित जातीच्या रिक्त जागा सेवानिवृत्ती, राजीनामा, स्वेच्छानिवृत्ती व नैसर्गिक आपत्ती यामुळे रिक्त दिसून येतात. आता चालनीय पदामध्ये म्हणजे चालक, वाहक, सहाय्यक, व लिपीक टंकलेखक इत्यादी पदांमध्ये ६३९ पदांची मागासवर्गीयांच्या अनुशेषासह सर्व साधारण भरतीची कार्यवाही सुरू आहे.

खात्यामार्फत बढतीसाठी अतांत्रिक प्रवर्गातील घेण्यात येणाऱ्या वाहतूक नियंत्रक या पदाचे बढतीसाठी या कार्यालयाचे परिपत्रक क्र.जाक्र/राप/विनिपु/प्रशा/खाबप/३५८२, दिनांक २६-०५-२०१२ तसेच वरिष्ठ लिपीक या पदाचे बढतीसाठी या कार्यालयाचे परिपत्रक क्र.जाक्र/राप/विनिपु/प्रशा/खाबप/३५८३, दिनांक २६-०५-२०१२ रोजी प्रसारित करण्यात आलेले असून परिक्षेची कार्यवाही अंतिम टप्प्यात आलेली आहे.

तांत्रिक पदातील प्रमुख कारागीर या पदात ०२ जागा सेवा निवृत्ती व प्रभारक पदाचे बढतीमुळे रिक्त झालेल्या आहेत परिक्षेची कार्यवाही सुरू आहे कारागीर "क" या पदासाठी खात्यामार्फत बढती परिक्षा घेण्यात आलेल्या होत्या. परंतु सदर पदात पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्याने जागा रिक्त दिसून येतात.

तांत्रिक पदातील सहाय्यक कारागीर पदात १९ जागा रिक्त असल्याने सदरच्या रिक्त जागा भरण्यासाठी खात्यामार्फत बढती परिक्षेचे परिपत्रक प्रसारित करण्यात आलेले होते सदर पदामध्ये ०४ उत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना या कार्यालयाचे पत्र क्रराप/विनिपु/आस्था/ ८१२, दिनांक ३१-०७-२०१२ नुसार बढती देण्यात आली असून पुरेसे कर्मचारी उपलब्ध न झाल्याने सदर पदामध्ये १५ जागा रिक्त दिसतात. पदोन्नतीमधील रिक्त पदे वेळोवेळी खात्यामार्फत बढतीची लेखी परिक्षा/व्यवसाय चाचणी घेऊन भरण्यात येतात, सदरची कार्यवाही ही नेहमी चालू असते.

समितीला महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पुणे यांच्या विभागीय कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक २३ ऑगस्ट, २०१२ रोजी त्याठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली.

सदर साक्षीच्या वेळी समितीने म.रा.मा.प. महामंडळामध्ये वर्ग १ ते ४ मध्ये तांत्रिक/अतांत्रिक, वाहक/चालक इ. एकूण किती पदे मंजूर आहेत. त्यापैकी मार्च, २०१२ अखेर पर्यत प्रत्यक्षात वर्ग निहाय किती पदे भरण्यात आली. उक्त मंजूर पदांपैकी तांत्रिक/अंतात्रिक, वाहक/चालक यांची प्रत्येकी किती पदे अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी

राखीव ठेवण्यात आली आहेत. उक्त राखीव पदांपैकी प्रत्यक्षात किती पदे रिक्त आहेत, रिक्त पदे भरण्याबाबत कोणकोणते प्रयत्न करण्यात आले आहेत अशी विचारणा केली असता प्रादेशिक व्यवस्थापक म.रा.मा.प. महामंडळ पुणे यांनी, वर्ग १, २ व ३ च्या राज्यस्तरीय पदांची भरती/बढती बाबतची कार्यवाही राज्य मार्ग परिवहन मध्यवर्ती कार्यालय, मुंबई मार्फत केली जाते. या वर्गातील पदांचे रोस्टर मध्यवर्ती कार्यालयाकडून मेंटेन केले जाते. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यातील वर्ग-१ व २ च्या पदांची वर्गवारी या कार्यालयात नसते. वर्ग-३ मध्ये जे घटक संवर्ग आहेत त्यांची सविस्तर माहिती समितीला दिली असल्याचे सांगितले. त्यावर समितीने, विभाग नियंत्रकाच्या अखत्यारित पुणे विभागातील जे जिल्हे येतात त्यामध्ये वर्ग-१ व २ ची किती पदे आहेत अशी विचारणा केल्यावर प्रादेशिक व्यवस्थापक यांनी वर्ग-१ ची ३ पदे आहेत. परंतु या बाबतची सर्व कार्यपध्दती मध्यवर्ती कार्यालय, मुंबईकडून केली जाते, अशी माहिती दिली. त्यावर समितीने असे स्पष्ट केले की, वास्तविक पाहता मध्यवर्ती कार्यालयाच्या अखत्यारित कार्यालय आहे. समितीने जी प्रश्नावली पाठविली होती त्या अनुषंगाने मध्यवर्ती कार्यालयाकडून माहिती का मागविली नाही समितीने जी प्रश्नावली पाठविली आहे ती केवळ पुण्यासाठी नव्हे तर संपूर्ण राज्य मार्ग परिवहन महामंडळासाठी आहे. अशा प्रकारचे समितीला उत्तर येणे अभिप्रेत नाही. त्यावर प्रादेशिक व्यवस्थापक यांनी समितीला जी माहिती सादर करावयास हवी होती ती सादर करण्यात न आल्याबद्दल दिलगिरी व्यक्त करुन समितीला आवश्यक असलेली माहिती दोन दिवसांत मध्यवर्ती कार्यालयाकडून मागवून समितीला सादर करण्यात येईल, असे आश्वासित केले.

राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पुणे विभागीय कार्यालयाने वर्ग-३ (घटक संवर्ग) मध्ये तांत्रिक आणि अतांत्रिक पदे नमूद केली आहेत. या पदांमध्ये सरळसेवा भरतीचे आणि पदोन्नतीचे प्रमाण किती अशी समितीने विचारणा केली असता प्रादेशिक व्यवस्थापक यांनी, महामंडळामध्ये सरळसेवेने भरावयाची २५ टक्के पदे असून, उर्वरित ७५ टक्के पदे पदोन्नती भरण्यात येतात. चालक, वाहक, सहायक ही पदे १०० टक्के सरळसेवेने भरली जातात. वर्ग-३ (घटक संवर्ग) च्या तांत्रिक पदांमध्ये प्रमुख कारागीर, कारागीर “क” सहायक कारागीर ही पदे येतात अशी माहिती दिली. सदर माहितीच्या संदर्भात समितीने वर्ग-३ (घटक संवर्ग) मधील मंजूर पदांपैकी सरळसेवेने भरावयाच्या ९४ जागा आणि पदोन्नतीने भरावयाच्या ५८५ जागा भरल्या आहेत काय, अशी पृच्छा केली असता

प्रादेशिक व्यवस्थापक यांनी असे स्पष्ट केले की, एकूण मंजूर पदांपैकी सरळ सेवेची ६२ आणि पदोन्नतीची ४१८ पदे भरण्यात आली आहेत. २५ टक्के सरळ सेवेद्वारे व उर्वरित ७५ टक्के पदोन्नतीने भरण्यात येतात.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, पुणे विभागामध्ये ६७९ पदे मंजूर आहेत, भरलेली पदे ४८० आहेत, ८९ पदे अनुसूचित जातीसाठी राखीव असून त्यांची भरलेली एकूण पदे ५२ आहेत. म्हणजे अनुसूचित जातीची ३७ पदे रिक्त आहेत. सदर पदे केंव्हापासून रिक्त आहेत. यासंदर्भात प्रादेशिक व्यवस्थापक यांनी, सन २००९ मध्ये जाहिरात दिली असल्याचे सांगितले असता समितीला दिलेल्या माहितीनुसार सन २००९ पासून आतापर्यंत अनुसूचित जातीची ही पदे रिक्त असल्याचे स्पष्ट झाल्याने या जागा भरण्यासाठी कोणते प्रयत्न केले आहेत तसेच ज्या एकूण जागा आहेत, त्यामध्ये वर्ग ३ च्या विभागामार्फत भरावयाच्या जागा जास्त शिल्लक आहेत. विभागात असलेल्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती न देण्याची कारणे काय आहेत, अनुसूचित जातीच्या जागा एवढ्या वर्षापासून रिक्त असणे योग्य नाही. प्रमुख कारागीर या संवर्गाच्या सरळसेवेने भरावयाची १२, खात्यामार्फत भरावयाची ३७ अशी एकूण ४९ पदे मंजूर आहेत. एकूण भरलेल्या पदांमध्ये सरळसेवेची ९ पदे आहेत, खात्यामार्फत २९ पदे आहेत, अशी एकूण ३८ पदे आहेत. त्यामुळे या रिक्त पदातील प्रमुख कारागीर या संवर्गाची पात्रता काय आहे अशी विचारणा केली असता प्रादेशिक व्यवस्थापक यांनी अशी माहिती दिली की, प्रमुख कारागीर या संवर्गासाठी उमेदवार मोटार मॅकेनिक व्हेईकल आयटीआय उत्तीर्ण असला पाहिजे, संबंधित व्यवसायातील १० वर्षांचा कामाचा अनुभव पाहिजे, अवजड वाहन चालविण्याचा मुदतीतील परवाना असावा, कारागीर “क” या पदाची व्यवसाय चाचणी उत्तीर्ण होण्याची क्षमता हवी, वय १८ वर्षांपेक्षा कमी व ४५ वर्षांपेक्षा जास्त नसावे, असे नियम व अटी आहेत. सरळसेवेमध्ये २ व खात्यामार्फत ३ अशी ५ अनुसूचित जातीची पदे भरलेली आहेत. सरळसेवेमध्ये अनुसूचित जातीची शून्य पदे रिक्त आहेत.

सरळसेवा प्रमुख कारागीर या पदासाठी २ जागा रिक्त होत्या, त्यातील १ पद अनुसूचित जातीसाठी व १ पद खुल्यावर्गासाठी होते. त्या जागा भरण्यासाठी सन २००९ मध्ये जाहिरात काढली होती. सदर पदांसाठी अनुसूचित जातीसाठी ३ अर्ज प्राप्त झाले होते,छाननीत तिन्ही अर्ज पात्र झाल्याने त्यांना लेखी परीक्षेसाठी पात्र ठरविण्यात आले. लेखी परीक्षेमध्ये तीनपैकी एक उमेदवार उत्तीर्ण झाला. त्या उमेदवारास व्यवसाय

चाचणीसाठी पाठविण्यात आले. परंतु सदर उमेदवार व्यवसाय चाचणीस गैरहजर राहिल्याने एक जागा रिक्त राहिली. परंतू श्री. देवानंद परशुराम वाघमारे हे परभणी विभागातून प्रमुख कारागीर पदी बदलून आल्याने सदरची जागा भरण्यात आली आहे. त्यामुळे सरळसेवा भरतीमध्ये प्रमुख कारागीर पदात अनुसूचित जातीचा अनुशेष निरंक आहे.

पदोन्नतीमध्ये प्रमुख कारागीर या संवर्गासाठी अनुसूचित जातीसाठी एकूण ३ पदे रिक्त होती. आता २ पदे रिक्त राहिली आहेत. श्री.पी.बी. अडसुळ याची प्रभारकपदी दिनांक १८-०९-२०१० रोजी बढती व श्री. आर.एस्. माने हे दिनांक ३१-०५-२०११ रोजी सेवानिवृत्त झाल्याने सदरच्या दोन जागा रिक्त झाल्या आहेत. सदरच्या जागा भरण्यासाठी खात्यामार्फत बढतीच्या परिक्षेचे आयोजन माहे सप्टेंबर, २०१२ मध्ये करण्यात येत आहे.

सदर पदाच्या पदोन्नतीसाठी काही नियम व अटी आहेत. कारागीर "कछ" या पदात सलग ३ वर्षे सेवा आवश्यक आहे, अवजड वाहन चालविण्याचा मुदतीतील परवाना असला पाहिजे, मागील पाच वर्षातील गोपनीय अहवालाची प्रतवारी व सदर प्रतवारीमध्ये ५० टक्के गुण आवश्यक आहेत, व्यवसाय चाचणीमध्ये ६० गुण मिळवून उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. सदरची पदे भरण्यासाठी वर नमूद केलेल्या अटीनुसार खात्यामार्फत बढती परीक्षेचे परिपत्रक लवकरच जाहीर करण्यात येत असून इच्छुक कारागीर "क "पदातील कर्मचाऱ्यांकडून अर्ज मागविण्यात येऊन वर नमूद केल्याप्रमाणे अटी पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना ज्येष्ठतेनुसार १:४ प्रमाणात व्यवसाय चाचणीसाठी बोलविण्यात येईल.

कारागीर "क " या संवर्गातील अनुसूचित जातीसाठी सरळसेवेची ११ पदे व खात्यामार्फतची ३२ पदे राखीव होती, अशाप्रकारे एकूण ४३ पदे राखीव होती. त्यानुसार सरळसेवेची ४ व खात्यामार्फत १२ अशी १६ पदे रिक्त आहेत.

सरळसेवा कारागीर "क " या पदासाठी ११ जागा रिक्त होत्या. त्यापैकी एक जागा अनुसूचित जातीसाठी राखीव होती. ती भरण्यासाठी जाहिरात देण्यात आली होती. सदर पदासाठी अनुसूचित जातीसाठी ३ अर्ज प्राप्त झाले,छाननीत तिन्ही अर्ज पात्र झाल्याने त्यांना लेखी परिक्षेसाठी पात्र ठरविण्यात आले. लेखी परीक्षेमध्ये तीनपैकी एक उमेदवार उत्तीर्ण झाला. त्या उमेदवारास व्यवसाय चाचणीसाठी पाठविण्यात आले. परंतु, सदर उमेदवार व्यवसाय चाचणीस गैरहजर राहिल्याने एक जागा रिक्त राहिली. त्याचबरोबर, श्री. जी.पी. कांबळे, कारागीर घ्कङ यांचे सन २०१० मध्ये निधन झाले.

श्री.एस.एन.कांबळे, कारागीर "क " हे गैरहजेरी कारणास्तव सन २०१० मध्ये बडतर्फ झाले. तसेच श्री.व्ही.के शेमाडे, कारागीर "क " हे सोलापूर विभागात बदलून गेल्याने ४ जागा रिक्त झाल्या. महामंडळामध्ये चालनासाठी लागणारे चालक, वाहक, सहायक, लिपिक या पदात भरती करण्याचे धोरण असल्याने सदर पदात भरती करण्याची कार्यवाही चालू आहे. इतर पदाची भरती करण्याचे आदेश प्राप्त होताच सदरची रिक्त पदे ताबडतोब भरण्याची कार्यवाही करण्यात येईल, असे समितीला अवगत केले. त्यावर समितीने, माहितीच्या अनुंषगाने कारागीर "क " मध्ये अनुसूचित जातीची खात्यामार्फत भरावयाची १२ पदे रिक्त असल्याचे दिसत आहेत. याबाबत समितीला खुलासा करण्यास सांगितले असता प्रादेशिक व्यवस्थापक यांना सदरच्या रिक्त जागा भरण्यासाठी खात्यामार्फत सन २००९ च्या परिपत्रकानुसार कारागीर "क" बढती परीक्षेच्या ९८ जागा जाहीर करण्यात आल्या, त्यापैकी १२ जागा अनुसूचित जातीसाठी राखीव होत्या. सदर १२ जागांसाठी सहायक कारागीर पदातील कर्मचाऱ्यांनी अर्ज केल्यानंतर अर्जाची छाननी करून ७ कर्मचारी पात्र झाले, त्यापैकी व्यवसाय चाचणीमध्ये ५ कर्मचारी उत्तीर्ण झाले व ७ जागा रिक्त राहिल्या. त्या रिक्त जागा भरून काढण्यासाठी सन २०११ च्या परिपत्रकानुसार कारागीर घ्कङ पदासाठी ७० जागा जाहीर करण्यात आल्या, त्यापैकी ७ जागा अनुसूचित जातीसाठी राखीव होत्या व सदर ७ जागांसाठी सहायक कारागीर पदातील एकाही कर्मचाऱ्याने अर्ज सादर न केल्याने ७ जागा रिक्त राहिल्या. त्यानंतर सेवानिवृत्ती व बढतीमुळे आणखी ५ जागा रिक्त झाल्या, अशा एकूण १२ जागा रिक्त झाल्या. सदर जागा भरून काढण्यासाठी सन २०११ च्या परिपत्रकानुसार जाहीर करून त्यामध्ये कारागीर घ्कङ पदात एकूण ४७ जागा बढती परीक्षेसाठी जाहीर करण्यात आल्या होत्या. ४७ पैकी १२ जागा अनुसूचित जातीसाठी राखीव दर्शविण्यात आलेल्या होत्या. इच्छुक उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात आले होते. सदर बढती परीक्षेसाठी सहायक कारागीर पदातील एका उमेदवाराकडून अर्ज सादर केला होता. सदर कर्मचाऱ्यांचा अर्ज छाननी अंती पात्र ठरल्याने त्याची व्यवसाय चाचणी घेण्यात येऊन तो व्यवसाय चाचणीत उत्तीर्ण झाला. आता ११ जागा रिक्त राहिल्या आहेत. सदरच्या रिक्त जागा भरण्यासाठी खात्यामार्फत बढती परीक्षेचे आयोजन सप्टेंबर, २०१२ मध्ये करण्यात येत आहे. कारागीर "क" या पदासाठी सहायक कारागीर या पदात सलग ३ वर्षे सेवा आवश्यक असते, अवजड वाहन चालविण्याच्या मुदतीतील परवाना आवश्यक असतो, पाच वर्षांतील गोपनीय अहवालाची प्रतवारी व सदर प्रतवारीमध्ये ४० टक्के गुण आवश्यक असतात. तसेच, व्यवसाय चाचणीमध्ये ६० गुण मिळवून उत्तीर्ण होणे आवश्यक असते. बढतीने इतर ठिकाणी बदली होईल असे वाटत असल्यामुळे बढतीसाठी अर्ज करण्याचे प्रमाण कमी आहे, असे समितीला सांगितले.

नोकरीला लागल्यानंतर बदली, सेवानिवृत्ती अशा गोष्टी होतच असतात. तथापि, कर्मचाऱ्याला अर्ज केल्यानंतर पदोन्नती देणे हे योग्य नसून पदोन्नती मिळणे हा शासनाचा नियम आहे, समितीने असे स्पष्ट केले असता प्रादेशिक व्यवस्थापक यांनी रिक्त जागांच्या संदर्भात नोटीफिकेशन काढतो. पदासाठी इच्छुक कर्मचाऱ्यांकडून अर्ज मागविण्यात येऊन अटी पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या ज्येष्ठतेनुसार १:४ प्रमाणात व्यवसाय चाचणीसाठी बोलविण्यात येत असल्याचा खुलासा केला. त्यावर समितीने ही प्रक्रीया चुकीची आहे. पदोन्नतीच्या संदर्भात कुठेही अर्ज मागविले जात नाहीत. सेवाज्येष्ठतेनुसार संबंधितांना पदोन्नती दिली जाते. पदोन्नती समितीची बैठक घेऊन पदोन्नती संदर्भात अभिप्राय देऊन त्या विभागातून नावे मागविली जातात. १० जागा असतील तर १५ जणांचे प्रस्ताव तयार केले जातात. सेवाज्येष्ठता यादी तयार करण्यात येते आणि सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नती दिली जाते. संबंधिताने पदोन्नती नाकारली असेल तरच नियुक्ती देत नाहीत. पदोन्नतीसाठी कर्मचाऱ्याने अर्ज करणे ही चुकीची पध्दत आहे. एखाद्या कर्मचाऱ्याने अर्ज केला आणि तो अर्ज दुसऱ्याने गायब केला तर तो कर्मचारी पदोन्नतीपासून वंचित राहू शकतो. पदोन्नती ही कायदेशीर प्रक्रिया आहे. पदोन्नतीसाठी अर्ज न करता पदोन्नती मिळाली पाहिजे, असे समितीचे स्पष्ट मत आहे.

काही पदे ही पदोन्नतीचीच असतात. तेथे बाहेरुन सरळसेवेने पदे भरता येत नाहीत. संबंधित कर्मचाऱ्यांच्या गोपनीय अहवालाप्रमाणे व सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नती देणे बंधनकारक असते. पदोन्नतीसाठी अर्ज करण्याची पध्दत कायदेशीर बाबीमध्ये न बसणारी आहे. कर्मचाऱ्याला पदोन्नती मिळणे हा त्याचा घटनादत्त अधिकार आहे. पदोन्नती स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार त्या संबंधित कर्मचाऱ्याचा असतो.

पदोन्नतीसाठी अर्ज करावयास लावणे याचा अर्थ पदोन्नतीचा अधिकार नाकारणे असा होतो. ही पध्दत अत्यंत चुकीची आहे. पदोन्नती देण्यासंदर्भात राज्य शासनाचे नियम आहेत आणि ते नियम महामंडळाला सुध्दा लागू आहेत आणि तरीही महामंडळ आपल्या मर्जीनुसार कार्य करील तर ते योग्य नाही. एखाद्या कर्मचाऱ्याचा पदोन्नती मिळण्यासंदर्भातील अर्ज पुढे पाठविला नाही तर तो पदोन्नतीपासून वंचित राहू शकतो. या संदर्भातील काही परिपत्रक असल्यास शासकीय कार्यालये, निमशासकीय कार्यालये, शासनाकडून अनुदान घेणाऱ्या संस्था या ठिकाणी सेवाजेष्ठतेनुसारच पदोन्नती देण्याची पध्दत आहे, असे समितीने मत व्यक्त केले असता प्रादेशिक व्यवस्थापक यांनी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामध्ये प्रत्येक पदांसंदर्भात विलिंगनेस विचारण्याबाबतची पध्दत आहे. इच्छुक कर्मचाऱ्याकडून अर्ज मागवून अटी पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना ज्येष्ठतेनुसार १:४ प्रमाणात व्यवसाय चाचणीसाठी बोलविण्यात येते. त्यामध्ये जे उत्तीर्ण होतील, त्यांची नियुक्ती रिक्त पदांवर

केली जात असल्याची माहिती दिली. त्यावर समितीने असे स्पष्ट केले की, हा सर्व प्रकार चुकीचा असून हे कोणत्या कायद्यानुसार करीत आहात, याची माहिती समितीला द्यावी. सदर विषयासंदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेणे गरजेचे आहे.

पुणे प्रदेश प्रादेशिक व्यवस्थापक यांनी मध्यवर्ती कार्यालयाच्या परिपत्रकानुसार सर्व जिल्ह्यांत याच पद्धतीनुसार पदोन्नतीची भरती प्रक्रिया राबविली जात असल्याचे समितीला सांगितले. मध्यवर्ती कार्यालयाचे परिपत्रक प्रत्यक्षात बघितल्यानंतर ते बदलण्यासाठी समितीच्या माध्यमातून शिफारस करण्यात येईल, असे स्पष्ट करुन समितीने पुढे यासंदर्भात असे मत व्यक्त केले की, सहायक कारागीर या संवर्गातील पदे सरळ सेवेने का भरले जात नाहीत. तसेच सहायक कारागीर पदासाठी हेल्परकडून अर्ज मागविण्यात येतात काय, मुळात हे तरुण बेसिक पदावर काम करणारे असतात. ते सहायक कारागीर पदावरील पदोन्नतीसाठी नकार देणार नाहीत. सर्व विभागांमध्ये रिक्त असलेल्या पदांच्या बाबतीत आढावा घेतला जातो. पदोन्नती देताना संबंधित कर्मचाऱ्यांची सेवा व कामगिरी या आधारावर सेवाज्येष्ठता यादी तयार केली जाते. त्या यादीनुसार पदोन्नती दिली जाते. पदोन्नतीची प्रक्रिया राबविताना संबंधित अधिकाऱ्यांकडून संमती पत्र घेण्याची काहीच आवश्यकता नाही. त्यावर प्रादेशिक व्यवस्थापक यांनी सहायक कारागीर हे पद सरळ सेवेने भरावयाचे नसून, ते पद १०० टक्के पदोन्नतीने भरावयाचे आहे, अशी माहिती दिली.

समितीने वर्ग-४ मध्ये किती तांत्रिक पदे मंजूर आहेत, त्यापैकी किती भरली व किती पदांवर अनुसूचित जातीचे उमेदवार घेतले अशी विचारणा केली असता प्रादेशिक व्यवस्थापक पुणे यांनी, तांत्रिक पदातील वर्ग-४ चे सहायक हे पद सरळ सेवेतून भरण्यात येते. वर्ग-४ मध्ये सहायकांची ४४८ पदे मंजूर असून ३४२ पदे भरलेली आहेत. यामध्ये अनुसूचित जाती प्रवर्गासाठी ५८ पदे राखीव आहेत. ५८ पदांपैकी ४८ पदे भरली असून, २००९ पासून १० पदांचा अनुशेष आहे असे सांगितले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन २००९ पासून वर्ग ४ च्या १० पदांचा अनुशेष राहण्याची कारणे काय व सदर रिक्त असलेली १० पदे भरण्यासाठी मध्यवर्ती कार्यालयाकडे मागणीपत्र पाठविले होते काय, त्यावर प्रादेशिक व्यवस्थापक यांनी मध्यवर्ती कार्यालयाकडून या पदांची जाहिरात काढण्यात येते. जाहिरात काढण्याचे अधिकार क्षेत्रीय कार्यालयांना नाहीत. सरळ सेवेची सर्व पदे भरण्यासाठी मध्यवर्ती कार्यालयाकडून परवानगी मिळाल्यानंतर जाहिरात काढली जायची. परंतु आता जाहिरात काढण्याचे अधिकार मध्यवर्ती कार्यालयाला आहेत. सदरची रिक्त पदे भरण्यासाठी मध्यवर्ती

कार्यालयाकडे दर तीन महिन्यांनी मागणी पत्र पाठविण्यात येते. पूर्वी घटक संवर्ग पदांच्या जाहिराती विभाग नियंत्रक स्तरावर काढल्या जात होत्या. परंतु आता ही भरती प्रक्रिया मध्यवर्ती कार्यालयाने स्वत:कडे घेतली आहे. त्यानुसार एम.के.सी.एल.च्या माध्यमातून नेटवरुन अर्ज मागविण्यात येतात. कोणत्या उमेदवाराला कोणत्या जिल्ह्यात नियुक्ती हवी आहे हे मध्यवर्ती कार्यालयाकडून बघितले जाते. स्वेच्छानिवृत्ती, सेवानिवृत्ती, पदोन्नती इ.कारणांमुळे पदे रिक्त होतात परंतु रिक्त झालेली पदे भरण्याची प्रक्रिया निरंतर सुरू असते, अशी माहिती समितीला दिली असता समितीने या प्रकरणी मध्यवर्ती कार्यालय, मुंबई यांची साक्ष लावणे योग्य होईल असे मत व्यक्त केले.

समितीने, सदर रिक्त असलेली पदे भरली जात नसल्यामुळे कामकाजावर परिणाम होतो असे मध्यवर्ती कार्यालयाला कळविले आहे काय, अशी विचारणा केली असता प्रादेशिक व्यवस्थापक यांनी भरती प्रक्रिया ही बाब मध्यवर्ती कार्यालयाने स्वत:कडे घेतली आहे. त्यामुळे भरती प्रक्रियेमध्ये विलंब हा मध्यवर्ती कार्यालयाकडून होतो असे स्पष्ट केले. त्यावर समितीने शासनाच्या सूचनांव्यतिरिक्त राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वेगळ्या सूचना आहेत या बाबत महामंडळाच्या संचालक मंडळाने आपल्याला सूचना दिल्या आहेत काय, असल्यास, त्या सूचना जाहिरातीमध्ये नमूद केल्या आहेत काय ? तसेच राज्यभरात वर्ग-१, २, व ३ या पदांची भरती, बढती इ. बाबतची कार्यवाही मध्यवर्ती कार्यालयामार्फत केली जाते. सहायक हे पद वर्ग-४ मधील तांत्रिक पद आहे, हे पद क्षेत्रीय कार्यालयाने भरण्याबाबतची कार्यवाही का केली नाही, अशी विचारणा केली असता प्रादेशिक व्यवस्थापक यांनी क्षेत्रीय स्तरावरील रिक्त पदे भरण्याची परवानगी मिळाल्याचे परिपत्रक मध्यवर्ती कार्यालयाकडून येत होते. त्यानुसार आतापर्यत विभाग नियंत्रक त्यांच्या अधिकारात जाहिरात प्रसिध्द करायचे. परंतु आता मध्यवर्ती कार्यालयाने जाहिरात काढण्याचे अधिकार स्वत:कडे घेतले आहेत.

वर्ग-१, २ व ३ ही स्टेट कॅडर पदे भरण्याचे अधिकार पूर्णत: मध्यवर्ती कार्यालयाला आहेत. वर्ग-३ व वर्ग-४ च्या घटक संवर्गाची जाहिरात मध्यवर्ती कार्यालयाकडून काढली जाते. घटक संवर्गाची पदे स्थानिक स्तरावरील असल्यामुळे पूर्वी या ठिकाणावरुýन भरती व्हायची, असे समितीस अवगत केले असता याबाबतीत समितीच्या असे निदर्शनास आले की, जाहिरात वगळता भरती प्रक्रियेपासून नियुक्ती पत्र देण्यापर्यंतची सर्व प्रोसेस क्षेत्रिय कार्यालयाच्या माध्यमातून होते. तसेच कार्यालयामध्ये तांत्रिक व अतांत्रिक ६२४८ पदे आहेत. त्यातील अनुसूचित जातीसाठी ७१२ पदे राखीव असून, ११३ पदे रिक्त आहेत. ज्या जागा रिक्त आहेत त्या भरण्यासाठी आपण काय प्रयत्न केले आहेत, अशी विचारणा केली असता प्रादेशिक व्यवस्थापक यांनी पुणे विभागात चालकांची २००० पदे रिक्त असल्याची

माहिती दिली. समितीने पुढे महामंडळामध्ये इतक्या मोठया प्रमाणावर पदे रिक्त असताना महामंडळाचे काम कसे चालते, महामंडळामध्ये मोठया प्रमाणावर जागा रिक्त असल्याप्रकरणी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, प्रधान सचिव, परिवहन विभाग व समाजकल्याण आयुक्त यांची साक्ष घेण्यात येईल, असे सूचित केले.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पुणे येथे अनुसुचित जाती समितीच्या दिनांक २३ ऑगस्ट २०१२ रोजी घेण्यात आलेल्या बैठकीत उपस्थित झालेले मुददे व समितीला आश्वासित केलेल्या मुददयांचा अनुषंगाने केलेली कार्यवाही जाणुन घेण्यासाठी खालील मुददयाची माहीती मागविण्यात आली होती. त्या मुददयास अनुसरुन समितीला प्राप्त झालेली माहीती पुढील प्रमाणे आहे.

(१) प्रमुख कारागीर, कारागीर क पदाच्या रिक्त जागांवर पदोन्नतीकरीता सहाय्यक कारागीर यांची निवड करण्यासंदर्भातील कार्यपध्दती किंवा पदोन्नती देताना पुणे विभागामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे काय,

उत्तर- रा.प.महामंडळात वर्ग-३ घटकसंवर्ग कर्मचाऱ्यांना पदोन्नती देताना खात्यामार्फत बढती परिक्षा/व्यवसाय चाचणी आयोजित करण्यात येते. खात्यामार्फत बढती संबंधीत पदाच्या रिक्त जागा व आरक्षण विचारात घेऊन ज्येष्ठतेनुसार १:४ या प्रमाणात कर्मचाऱ्यांना खात्यामार्फत बढती/परिक्षेसाठी/ व्यवसाय चाचणीसाठी पात्र ठरविण्यात येते व सदर लेखी परिक्षेत/व्यवसाय चाचणीत उत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना खात्यामार्फत संबधीत पदाच्या रिक्त जागा व आरक्षण विचारात घेऊन त्यांना ज्येष्ठतेनुसार खात्यामार्फत बढती देण्यात येते.

(२) सन २००९ पासून १० सहाय्यकांची पदे रिक्त असून पुणे विभागामार्फत मध्यवर्ती कार्यालयास कळविण्यात आल्यानंतरही अद्यापपर्यंत सदर पदे भरण्यात आलेली नसणे याची कारणे काय आहेत व यास कोण जबाबदार आहे,

उत्तर- सन २००९ मध्ये सहाय्यक पदाच्या रिक्त जागा भरण्यासाठी वृत्तपत्रात जाहिरात देऊन प्रयत्न करण्यात आले होते. त्यानुसार सहाय्यक पदात ०७ उमेदवार उपलब्ध झाले त्यापैकी ४ उमेदवार हजर झालेले नाहीत. त्यामुळे, सहाय्यक पदात अनुसूचित जातीच्या ९ रिक्त जागांचा समावेश करुन सदर जागा भरण्यासाठी दिनांक ७ ऑगस्ट, २०१२ रोजी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली असून, सदर पदाची लेखी परिक्षा दिनांक १४ ऑक्टोबर, २०१२ रोजी एम.के.सी.एल. पुणे

या संस्थेमार्फत घेण्यात आलेली असून भरतीची कार्यवाही पुर्ण झाली आहे. त्यामध्ये सहाय्यक पदात अनुसूचित जातीचे ९ उमेदवार उपलब्ध झाले असून त्यापैकी ३ उमेदवार अपात्र ठरले आहेत. उर्वरित ०५ उमेदवारांना जुलै, २०१३ अखेर नेमणूका देण्यात आल्या असून एका उमेदवाराचे सेवापूर्व प्रशिक्षण सुरु आहे. सेवापूर्व प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर सदर उमेदवारास नेमणूक देण्यात येईल.

३) वाहन चालकांची सुमारे २००० पदे रिक्त असल्याची बाब समिती समोर आली सदर रिक्त पदापैकी किती पदे अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव आहेत व ती कोणत्या कालावधीपासून रिक्त आहेत ही बाब शासनाच्या निदर्शनास आणण्यात आली होती काय, असल्यास सदर पदे भरण्यास शासनस्तरावरुन विलंब होण्याची कारणे काय आहेत, नसल्यास सदर वस्तूस्थिती शासनाच्या निदर्शनास न आणणाऱ्यांवर संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली.

उत्तर- रा.प.महामंडळामध्ये चालक पदाच्या ७९४८ रिक्त जागा आहेत सदर रिक्त जागांपैकी पुणे विभागात चालक पदाच्या ३५६ रिक्त जागा असून त्यापैकी ३१ पदे अनुसूचित जातीसाठी राखीव आहेत. सदर पदे भरण्याची कार्यवाही पुर्ण झाली असून त्यामध्ये २२ उमेदवार उपलब्ध झाले असून त्यापैकी १९ उमेदवारांना माहे जून, २०१३ अखेर नेमणूका देण्यात आल्या आहेत.यामध्ये ३ उमेदवार हजर झाले नाहीत.

**विभागीय सचिवांची साक्ष:**

अनुसूचित जाती कल्याण समितीने मागासवर्गीयांच्या संदर्भात माहिती जाणून घेण्यासाठी पुणे येथील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अंतर्गत असलेले प्रादेशिक विभाग पुणे येथे दिनांक २३ ऑगस्ट, २०१२ रोजी भेट देऊन अधिकाऱ्यांची साक्ष घेतली होती. साक्षीच्या वेळी उपरोक्त झालेले मुद्दयांच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ प्रादेशिक विभाग, पुणे यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने दिनांक ५ सप्टेंबर, २०१३ रोजी संबंधित विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

साक्षीच्या वेळी समितीला प्रथमत: विभागीय सचिव यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे राज्यात एकूण १ लाख ३ हजार ७३९ कर्मचारी कार्यरत आहेत. यापैकी ८६ हजार २२ पदे भरलेली आहेत. अनुसूचित जातीची १२ हजार ४८० पदे असून त्यापैकी १० हजार ३६० पदे भरलेली आहेत. २ हजार १२० पदे रिक्त आहेत. अजून ७ हजार २२४ पदे भरावयाची आहेत.

पुणे विभागात एकूण १२ डेपो आहेत आणि २ वर्कशॉप आहेत. यामध्ये ४ हजार ७७३ रिक्त पदांपैकी ४ हजार ३५२ इतकी पदे भरलेली आहे. ४२१ पदे रिक्त आहेत. यामध्ये अनुसूचित जातीची ६२१ पदे आहेत. यापैकी ५८१ पदे भरलेली असून ४० पदे रिक्त आहेत. संपूर्ण राज्यात प्रमोशन कोट्यात २० हजार ३६७ पदे आहेत.

वर्तमानपत्रामध्ये जाहिरात दिली होती. परंतु जाहिरातीतील नमूद केलेल्या एकूण पदांपैकी केवळ सातच पदे भरली गेली आहेत. त्यापैकी केवळ ४ उमेदवार हजर झाले आहेत. पुणे प्रदेशाच्या अखत्यारित पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर असे पाच जिल्हे येतात. त्यामध्ये वर्ग-१ ची १५ पदे व वर्ग-२ ची ११२ पदे असल्याची समितीला माहिती दिली.

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पुणे यांच्या विभाग नियंत्रकाच्या अखत्यारित येणाऱ्या पुणे विभागातील जिल्ह्यातील वर्ग-१ व वर्ग-२ च्या पदांची माहिती देण्याबाबत समितीला आश्वासित करण्यात आले आहे. अद्यापहि माहिती न देण्याची कारणे काय आहेत. असे विचारले असता व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी समितीला दिलेल्या माहितीसमवेत आरक्षणनिहाय पदसंख्यांचा तक्ता सादर केलेला आहे, असे सांगितले यावर समितीला पुरविण्यात आलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने अशी विचारणा केली की, एकूण मंजूर पदे २८१ इतके असून त्यात मागासवर्गीयाची राखीव पदे ३१ असून त्यापैकी ०४ पदे इतर मागासवर्गीय या प्रवर्गातून भरण्यात आलेली आहेत.

व्यवस्थापकीय संचालक म.रा.मा.प. महामंडळ यांनी असे स्पष्ट केले की, संपूर्ण महामंडळामध्ये एकूण मंजूर पदांचे आरक्षण निश्चित करुन कॅटेगरी वाईज राज्यात सर्वत्र ती पदे कार्यरत आहेत. त्यापैकी काही रिक्त असतील किंवा अनुशेष असेल, अशी परिस्थिती आहे. समितीसमोर संपूर्ण महामंडळाची राज्याच्या दृष्टीकोनातून माहिती सादर करीत आहोत. संपूर्ण महामंडळामध्ये एससी या पदाचे किती आरक्षण आहे, तसेच, आरक्षणापैकी किती पदे रिक्त आहेत, किती पदे भरलेली आहेत. राज्यभरातील निरनिराळ्या एमएसआरडीसीच्या कार्यालयातील एकूण मंजूर पदे व आरक्षित पदे भरणे व पदोन्नती ही सर्व प्रक्रिया सेंट्रलाईज्ड पध्दतीने ऑपरेट केली जाते. प्रमोशनने किती पदे भरली जाणार आहेत. सरळ सेवेमार्फत किती पदे भरली जाणार आहेत.

तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन पुणे विभागामध्ये वर्ग-१ ची ३ पदे व वर्ग-२ ची २८ पदे, अशी एकूण ३१ पदे आहेत. सदर पदावर कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांची हुद्दा व नावनिशी यादी समितीने आश्वासित केलेल्या कार्यवाहीच्या माहितीसोबत गृह विभागामार्फत समितीला सादर करण्यात आलेली आहे.

समितीला दिलेल्या सदरच्या माहितीवरुन यासंदर्भात जर समितीला प्रश्ननिहाय माहिती सादर केली तर समितीच्या अहवालामध्ये मुद्देसुद शिफारशी सादर करता येतील. सरसकट एकत्रितरित्या माहितीमधून निरनिराळ्या कॅटेगरीवाईज त्याचे विभाजन सहजरित्या करता येत नाही, असे मत समितीने मांडले असता त्यावर व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी राज्य मार्ग परिवहन मंडळात वर्ग-३ घटक संवर्ग कर्मचाऱ्यांना पदोन्नती देतांना खात्यामार्फत बढती परिक्षा/ व्यवसाय चाचणी आयोजित करण्यात येते. खात्यामार्फत बढतीसाठी संबंधित पदाच्या रिक्त जागा व आरक्षण विचारात घेऊन झालेल्या ज्येष्ठतेनुसार १:४ या प्रमाणात कर्मचाऱ्यांना खात्यामार्फत बढती परीक्षेसाठी व्यवसाय चाचणीत उत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना खात्यामार्फत संबंधित पदाच्या रिक्त जागा व आरक्षण विचारात घेऊन त्यांना जेष्ठतेनुसार खात्यामार्फत बढती देण्यात येते.

वर्ग-१ व वर्ग-२ पदावरील अधिकाऱ्यांची खात्यामार्फत बढती करण्यासाठी महामंडळाने पदोन्नती समितीचे गठन केलेले आहे. सदर पदोन्नती समितीमध्ये महाराष्ट्र शासन नियुक्त उप सचिव दर्जाच्या मागासवर्गीय अधिकाऱ्यांचा प्रतिनिधी म्हणून समावेश करण्यात आलेला आहे, असे समितीला सांगितले असता समितीने पुढे एसटी प्रवर्गातील वर्ग-१ अधिकाऱ्यांची किती पदे राखीव आहेत, अशी विचारणा केली असता त्यावर व्यवस्थापकीय संचालक यांनी महामंडळातील एकूण मंजूर पदांपैकी आरक्षणाची पदे त्यापैकी वर्ग-१ ची पदे सरळसेवा भरती व पदोन्नती या दोहो मार्गांनी किती भरती करावयाची याची निश्चिती करणे आवश्यक असते. एससीची क्लास वनची १४५ मंजूर पदे आहेत. त्यापैकी ८५ पदे भरलेली आहेत. ५१ पदे रिक्त आहेत. एससीचे मंजूर पदे १२५ इतकी आहेत. श्रेणी-१ च्या ५२ पदांपैकी ०६ पदे जाहिरात देऊन भरली होती. त्यापैकी ०४ उमेदवार हजर झाले नाहीत. सर्वप्रथम वर्ग-१ च्या १४३ पदांपैकी ८५ पदे ही एसटीची होती. त्यांनतर त्यापैकी ५८ पदे एससीची निश्चित करण्यात आली होती. त्यानंतर १३.५ टक्क्यांच्या नियमाप्रमाणे ५८ पदांवरील एससीचे आरक्षण काढून संपूर्ण ८५ पदे ही एससीची करण्यात आली. पुणे येथील महामंडळांच्या एकूण आरक्षित पदांपैकी रिक्त असलेली पदे भरण्यासंदर्भात डीपीसी कमिटीचे अध्यक्ष चेअरमन साहेब यांच्याशी बोलणे झालेले आहे. त्यानंतर एका महिन्याच्या आत हा बॅकलॉग भरण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येणार आहे.

वर्ग-२ ची एकूण मंजूर पदे ३१२ असून भरलेली पदे २३१ आहेत. रिक्त पदे ८१ इतकी आहेत. यामध्ये एकूण मंजूर १९ पदांचा बॅकलॉग आहे. त्यापैकी एससीची ४२ पदे मंजूर असून त्यापैकी ३५ पदे भरलेली आहेत. ७ पदे रिक्त आहेत. यामध्ये तीन पदांचा अनुशेष आहे. एसटी या प्रवर्गाकरिता यापैकी एकूण २३ मंजूर पदे आहेत. त्यापैकी १४ पदे भरलेली आहेत. ०९ पदे रिक्त असून ०७

पदांचा अनुशेष आहे. रिक्त पदे भरण्यासाठी एमपीएससीकडे प्रस्ताव दिला जात नाही. सदर पदे भरण्यासाठी जाहिरात दिली जाते. जाहिरात दिल्यानंतर छाननी करण्यासाठी ३ महिन्यांचा कालावधी आवश्यक असतो. सदर कालावधीत पदे भरण्यात येतील. असे समितीला सांगितले त्यावर समितीने यासदंर्भात सहमती दर्शवून ३ महिन्यांच्या कालावधीत सदर रिक्त असलेली पदे भरावीत असे निर्देश दिले.

समितीने, पुढे वर्ग-२ मधील किती पदे पदोन्नतीने भरण्यात आली. त्यात अनुसूचित जातीसाठी किती पदे आरक्षित होती, त्यापैकी किती पदे भरली आहेत व किती पदे रिक्त आहेत, अशी विचारणा केली त्यासंदर्भात राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे प्रतिनिधी यांनी वर्ग-२ ची पदोन्नतीची एकूण मंजूर पदे ४७३ आहेत. त्यापैकी ३०० पदे भरलेली आहेत आणि १७३ पदे रिक्त आहेत. मंजूर पदांपैकी अनुसूचित जातीसाठी ६३ पदे आरक्षित आहेत. ६३ पदांपैकी ४१ पदे भरलेली आहेत व २२ पदे रिक्त आहेत. भरलेल्या पदांमध्ये आरक्षणाच्या टक्केवारीनुसार ४० पदे भरावयाची होती. परंतू ४१ पदे भरलेली आहेत. अशा प्रकारे “आरक्षणाची १०० टक्के पदे भरलेली आहेत ” असे समितीस अवगत केले असता समितीने त्यास सहमती दर्शवून पुढे अशी विचारणा केली की, वर्ग-३ मधील किती पदे मंजूर आहेत त्यापैकी किती पदे भरण्यात आली. त्यात अनुसूचित जातीसाठी किती पदे आरक्षित होती, त्यापैकी किती पदे भरली आहेत व किती पदे रिक्त आहेत. त्यावर राज्य परिवहन महामंडळाचे प्रतिनिधी यांनी गट-क ची पदोन्नतीची एकूण मंजूर पदे ८८,८८५ आहेत. त्यापैकी ७६,०२५ पदे भरलेली आहेत, १२,८६० पदे रिक्त आहेत. मंजूर पदांपैकी अनुसूचित जातीसाठी १०,७८४ पदे आरक्षित आहेत. १०,७८४ पदांपैकी ९०१० पदे भरलेली आहेत व १७७४ पदे रिक्त आहेत. भरलेल्या पदांमध्ये आरक्षणाच्या टक्केवारीनुसार ९,२३८ पदे भरावयाची होती त्यापैकी ६२२ पदांचा अनुशेष आहे, अशी माहिती समितीला दिली. या प्रश्नोत्तराच्या अनुषंगाने व्यवस्थापकीय संचालक म.रा.मा.प. महामंडळ यांनी पुढे समितीला असे स्पष्ट केले की, १०० टक्के कर्मचारी मिळू शकत नाहीत. अनुसूचित जातीच्या संवर्गातील अनुशेष भरण्यासाठी एका महिन्याच्या कालावधीत जाहिरात काढणार आहोत. एसटी महामंडळात चालकांची पदे भरण्यासाठी वारंवार जाहिराती देऊनही आवश्यक तेवढे उमेदवार मिळू शकत नाहीत. उदाहरण सांगावयाचे झाल्यास एसटी महामंडळाला कोकण विभागासाठी ३ हजार वाहन चालकांची आवश्यकता आहे. परंतु जाहिरात दिल्यानंतर फक्त ६४२ वाहनचालक मिळू शकले उर्वरित पदासाठी उमेदवार मिळू शकले नाहीत. याऊलट वाहकांची पदे आवश्यकतेनूसार मिळू शकतात. या उलट सहायकांची पदे आवश्यकतेनुसार मिळू शकत नाही. सहायक हे तांत्रिक पद आहे त्यासाठी आयटीआय उत्तीर्ण असणे आवश्यक असते. महामंडळाकडे जे

विभागीय वर्कशॉप आहेत. त्या ठिकाणी तांत्रिक कर्मचाऱ्यांची आवश्यकता असते. परंतु, बऱ्याच वेळा तांत्रिक कर्मचारी उपलब्ध होऊ शकत नाहीत. त्यामुळे पदे रिक्त राहतात. याचे मुख्य कारण असे आहे की, एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांचे वेतन खाजगी क्षेत्रातील तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या तुलनेने कमी आहे. शासनाने एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या वेतनासंबंधी माहे एप्रिल, २०१२ पर्यंत करार केला होता. त्यानंतर पुन्हा माहे एप्रिल, २०१६ पर्यंत ४ वर्षांचा करार केला आहे. या कराराच्या माध्यमातून शासनाने एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांना किमान रोजगार देण्याचा प्रयत्न केला. जेणेकरुन जास्तीत जास्त कर्मचारी मिळू शकतील. एसटी महामंडळात १ लाखापेक्षा जास्त कर्मचारी आहेत. या करारामुळे दरवर्षी ५०० कोटी रुपयांचा बोजा पडतो. सदरच्या माहितीबाबत अप्पर मुख्य सचिव यांनी असा खुलासा केला की, दिनांक ३१ मार्च, २०१४ पर्यंत अनुशेष भरुन काढण्याची परवानगी दिलेली आहे. या संदर्भात मागील महिन्यात शासनाने निर्णय काढलेला आहे. त्यानुसार कार्यवाही करावी. तसेच रिक्त पदांची जाहिरात देताना वेतनश्रेणी सुधारित होणार असल्याबाबतचा उल्लेख केल्यास जास्तीत जास्त उमेदवार अर्ज करतील व महामंडळास आवश्यक तेवढे कर्मचारी मिळू शकतील. यास व्यवस्थापकीय संचालक म.रा.मा.प. महामंडळ यांनी सहमती दर्शविली.

समितीने प्रमुख कारागीर, कारागीर तसेच वर्ग-३ च्या रिक्त जागांवरील पदोन्नतीसाठी सहायक कारागीर यांच्याकडून अर्ज मागविण्यात आल्यानंतर त्यांनी निवड करण्यासाठी कोणती कार्यपध्दती वापरली जाते, पदोन्नती देताना संबंधितांना कोणकोणत्या मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. त्यासंबंधी पुणे विभागामार्फत कार्यवाही करण्यात आली आहे का, नसल्यास त्यासाठी कोण जबाबदार आहे अशी विचारणा केली त्यावर व्यवस्थापकीय संचालक, म.रा.मा.प.महामंडळ यांनी एसटी महामंडळातील भरती संदर्भात वर्ग-१ आणि वर्ग-२ मधील पदे भरण्यासाठी डीपीसीच्या अध्यक्षांची परवानगी मिळणे आवश्यक असते. परंतु वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती देत असताना खात्यामार्फत बढती परीक्षा/व्यवसायिक चाचणी घेतली जाते. त्यात एका पदासाठी चार उमेदवार अशा प्रकारे १:४ या रेश्योप्रमाणे उमेदवारद उपलब्ध होणे आवश्यक असते. परंतु असे होत नाही. अशा परिस्थितीत १० पदांसाठी ४० उमेदवार आवश्यक असताना फक्त १० उमेदवार आले होते. त्यामुळे याबाबत महामंडळ दिनांक २० सप्टेंबर ते २६ सप्टेंबर, २०१३ या कालावधीत आरक्षित अनुशेषांच्या पदांचा आढावा घेणार असून अप्पर मुख्य सचिव यांनी सांगितल्याप्रमाणे कर्मचाऱ्यांची भरती करण्यासाठी कार्यवाही केली जाईल असे समितीला आश्वासित केले.

समितीने पुढे सन २०१२-२०१३ मध्ये कोणत्या तारखेला व्यावसायिक चाचणी घेण्यात आली अशी विचारणा केली असता व्यवस्थापकीय संचालक, म.रा.मा.प. महामंडळ यांनी सन २०१२-२०१३ मध्ये वरिष्ठ लिपिक या पदासाठी दिनांक ७ ऑक्टोबर,२०१२ रोजी व्यावसायिक चाचणी परीक्षा घेण्यात आली होती. सदर परीक्षेसाठी ३७ उमेदवार उपस्थित होते. त्यापैकी १८ उमेदवार परीक्षेत उत्तीर्ण झाले होते. १८ उमेदवारांपैकी ३ उमेदवार अनुसूचित जातीच्या संवर्गातील आहेत. ३ उमेदवारांपैकी २ उमेदवारांना नेमणूक दिली आहे. परंतु उर्वरित उमेदवाराने शासनाच्या जीआरनुसार अद्याप जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही, अशी माहिती दिली. त्यावर समितीने सहायकांची जाहिरात दिलेल्या पदांची संख्या १०० असून सहायकांची एकूण मंजूर पदे किती आहेत. त्यापैकी अनुसूचित जातीच्या संवर्गासाठी किती पदे आरक्षित आहेत अशी विचारणा केली असता, व्यवस्थापकीय संचालक, म.रा.मा.प. महामंडळ यांनी सहायकांची एकूण ४४८ पदे मंजूर आहेत, त्यापैकी २९५ पदे भरलेली आहेत व १५३ पदे रिक्त आहेत. मंजूर पदांपैकी अनुसूचित जातीसाठी ५८ पदे आरक्षित आहेत. ५८ पदांपैकी ४५ पदे भरलेली आहेत व २२ पदे रिक्त आहेत. भरलेल्या पदांमध्ये आरक्षणाच्या टक्केवारीनुसार ३८ पदे भरावयाची होती. परंतु ४५ पदे भरलेली आहेत. सहायकांची १०० टक्के आरक्षित पदे भरलेली आहेत. कोणताही अनुशेष शिल्लक नाही, असे स्पष्ट केले.

समितीने वाहन चालकांची २ हजार पदे रिक्त आहेत, रिक्त पदांपैकी किती पदे अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव आहेत व ती केव्हापासून रिक्त आहेत, सदर बाब शासनाच्या निदर्शनास आणून दिली होती का, असल्यास शासन स्तरावरुन विलंब होण्याची कारणे काय आहेत, नसल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली अशी विचारणा केली, त्यावर व्यवस्थापकीय संचालक, म.रा.मा.प. महामंडळ यांनी अशी माहिती दिली की पुणे विभागासाठी चालकांची २१७७ पदे मंजूर होती, त्यापैकी २०१५ पदे भरलेली आहेत आणि १६२ पदे रिक्त आहेत. भरलेल्या पदांमध्ये आरक्षणाच्या टक्केवारीनुसार अनुसूचित जातीच्या संवर्गातील चालकांची २८३ पदे भरावयाची होती. २९३ पदे भरलेली आहेत. १०० टक्के अनुशेष भरलेला आहे. पुणे विभागात अनुसूचित जातीच्या संवर्गात चालक पदांसाठी ३१ पदे राखीव आहेत. एमकेसीएलने लेखी परीक्षा घेतली होती, त्यात २२ उमेदवार उत्तीर्ण झाले होते. ९ उमेदवार मिळू शकले नाहीत. २२ उमेदवारांना नेमणुका दिल्यानंतर त्यापैकी १९ उमेदवार कामावर रुजू झाले व उर्वरित ३ उमेदवार कामावर रुजू झाले नाहीत. तसेच रिक्त पदे भरण्यासंदर्भात एक महिन्याच्या आत जाहिरात देऊन रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल, असे समितीला आश्वासित केले.

**अभिप्राय व शिफारशी:**

महाराष्ट्र राज्यमार्ग परिवहन महामंडळाच्या कारागीर “क ” या संदर्भातील सहाय्यक कारागीर या पदाच्या रिक्त जागांच्या संदर्भात इच्छूक कर्मचाऱ्याकडून अर्ज मागविण्यात येऊन अटी पुर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्याच्या जेष्ठतेनुसार १-४ प्रमाणात व्यवसाय चाचणीसाठी बोलवण्यात येत असल्याने ही प्रक्रीया चुकीची असून अशा पद्धतीने कुठेही अर्ज मागविले जात नाहीत. सदर पदासाठी संबंधीत कर्मचाऱ्याच्या गोपनीय अहवालप्रमाणे व सेवा जेष्ठतेनुसार पदोन्नती देणे बंधनकारक असल्याने पदोन्नतीसाठी अर्ज करण्याची पध्दत कायदेशीर बाबीमध्ये बसणारी नसल्याने मंडळाच्या पध्दतीबाबत समिती नाराजी व्यक्त करीत आहे.

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात उक्त पदावर कर्मचाऱ्यांना बढती देताना त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारचे अर्ज न घेता सेवाजेष्ठतेनुसार संबधीत कर्मचाऱ्याच्या गोपनीय अहवालाप्रमाणे पदोन्नती देण्याबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात अवगत करण्यात यांवी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पुणे याच्या अंतर्गत असलेल्या विभागीय कार्यालयात अनुसूचित जातीची रिक्त असलेली पदे भरण्याबाबतची प्रकिया तातडीने सुरू करण्यात यावी व सदर अनुशेष भरण्याबाबत शासनाने तातडीने आवश्यक ती कार्यवाही करुन अनुशेष भरुन काढावा व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

**२) मागासवर्गीयांच्या राखीव पदावर सरळसेवा व पदोन्नतीने भरतीबाबत**

समितीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पुणे यांचे कार्यालयातील मागासवर्गीयांच्या राखीव पदावर सरळ सेवा व पदोन्नतीने भरतीबाबत सरळसेवा अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी राखीव असलेली व पदोन्नतीने भरावयाची रिक्त पदे भरण्यासाठी मंडळात निवड समिती गठीत करण्यात आली आहे काय, असल्यास सदर समितीमध्ये कोण-कोणत्या अधिकाऱ्यांचा सदस्य म्हणून समावेश आहे. मागासवर्गीय अधिकाऱ्यांचा या समितीत सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे काय? या संदर्भातील मुद्दयांची माहिती मागविली होती. त्यानुसार महामंडळाकडून प्राप्त झालेली माहिती पुढीलप्रमाणे आहे.

महामंडळाच्या निवड मंडळात घटक संवर्गाची वर्ग ०३ व वर्ग ०४ मधील तांत्रिक / अतांत्रिक उमेदवारांची निवड करणेसाठी खालीलप्रमाणे निवड समितीचे गठण केलेले आहे.

**रा.प.उपनिवड समिती**

| | | |
|---|---|---|
| (१) | अध्यक्ष- | उपाध्यक्ष व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचे प्रतिनिधी |
| (२) | सदस्य- | प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे प्रतिनिधी |
| (३) | सदस्य- | समाज कल्याण विभाग यांचे प्रतिनिधी |
| (४) | सदस्य- | आदिवासी विकास विभाग यांचे प्रतिनिधी |
| (५) | सचिव- | संबंधित विभागाचे विभाग नियंत्रक |

**पदोन्नती -**

राज्य परिवहन महामंडळामध्ये ०३ (घटक संवर्ग) व वर्ग-०४ पदातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यासंदर्भात निवड समिती गठीत करण्यात येत नाही. रा.प.महामंडळात वर्ग-०३ (घटक संवर्ग) वर्ग ०४ कर्मचाऱ्यांना पदोन्नती देताना खात्यामार्फत बढती परिक्षा/व्यवसाय चाचणी आयोजित करण्यात येतात खात्यामार्फत बढतीच्या संबंधीत पदाच्या रिक्त जागा व आरक्षण विचारात घेऊन जेष्ठतेनुसार १:४ या प्रमाणात कर्मचाऱ्यांना खात्यामार्फत बढती परिक्षेसाठी/व्यवसाय चाचणीसाठी पात्र ठरविण्यात येते व सदर लेखे परिक्षेत/व्यवसाय चाचणीत उत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना खात्यामार्फत संबंधीत पदाच्या रिक्त जागा व आरक्षण विचारात घेऊन जेष्ठतेनुसार खात्यामार्फत बढती देण्यात येते.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पुणे यांच्या विभागीय कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने अधिक माहिती जाणून घेण्यासाठी दिनांक २३ ऑगस्ट, २०१२ रोजी पुणे येथील महामंडळाच्या विभागीय कार्यालयास भेट देऊन तेथील संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने पदोन्नतीच्या संदर्भातील समिती गठीत केली आहे का व पदोन्नती समितीमध्ये मागासवर्गीय प्रतिनिधीचा समावेश केला आहे काय अशी विचारणा केली असता खात्यांमार्फत पदोन्नती समिती नसून पदोन्नतीच्या जागा भरण्यासंदर्भातील निवड समितीमध्ये मागासवर्गीय प्रतिनिधीचा समावेश नसतो, अशी माहिती प्रादेशिक व्यवस्थापक यांनी दिली. त्यावर समितीने पदोन्नतीच्या जागा भरण्यासंदर्भातील निवड समितीमध्ये देखील मागासवर्गीय प्रतिनिधी असला पाहिजे, असे राज्य शासनाचे निदेश आहेत. महामंडळाकडे तसे नसल्यास, सदर निवड

समितीमध्ये मागासवर्गीय प्रतिनिधी असावा, अशी समितीची शिफारस आहे. शासनाचे कोणतेच निदेश पाळलेले नाहीत. विभागीय पदोन्नती समितीमध्ये मागासवर्गीय प्रतिनिधी असला पाहिजे, असे शासनाने बंधन घालून दिले आहे. जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे. महामंडळ शासनाच्या अंतर्गत आहे की नाही, पदोन्नतीसंदर्भातील समिती गठीत का केली नाही, या संदर्भात मध्यवर्ती कार्यालयासमवेत पत्रव्यवहार का केला नाही, महामंडळाची विभागीय पदोन्नती समिती नाही किंवा समितीवर मागासवर्गीय प्रतिनिधी घेण्याची गरज नसणे तसेच पदोन्नतीसाठी अर्ज मागविले जातात, हे योग्य नाही. सदर बाब अतिशय खेदजनक असून शासनाचे या सर्व बाबीसंदर्भात नियम आहेत. त्या नियमांच्या विरुध्द असणे हे बरोबर नाही. या संदर्भात संबंधित अधिकारी जबाबदार धरले पाहिजेत. महामंडळाच्या परिपत्रकांची प्रत सादर करावी. महामंडळ जर अशा प्रकारे कर्मचारी, अधिकारी यांच्यावर अन्याय, अत्याचार करीत असेल तर महामंडळाच्या अध्यक्षांना तसेच, व्यवस्थापकीय संचालक, प्रधान सचिव, परिवहन यांना देखील साक्षीसाठी बोलावू. शासनाच्या नियमांच्या विरुध्द आहे. पदोन्नतीसाठी कर्मचाऱ्यांना अर्ज करायला लावता हे बरोबर नाही. सर्व परिपत्रकांचा संच द्यावा. महामंडळाचे सर्व निर्णय शासनाच्या निर्णयांशी सुसंगत आहेत की नाहीत, हे समितीला तपासावे लागतील. सदरचा मुद्दा साक्षीसाठी घेणे फार गरजेचे आहे.

पदोन्नतीमध्ये देखील आरक्षण ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार अनुसूचित जातीमधील किती लोक उच्च पदावर आहेत, याची समितीला यादी देण्यात यावी. तसेच विभागीय निवड समिती झालेली आहे. त्या समितीमध्ये मागासवर्गीय अधिकाऱ्याची नियुक्ती सदस्य म्हणून केली आहे काय, अशी विचारणा केली असता प्रादेशिक व्यवस्थापकांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन यांनी सदर समिती मध्यवर्ती कार्यालयामध्ये आहे. समाज कल्याण विभाग यांचे प्रतिनिधी या समितीमध्ये आहेत. निवड समिती गठीत केली आहे. परंतु, ती फक्त भरतीच्या संदर्भात असते. जाहिरात निघाली की, तेवढ्या दिवसांपूरती ती असते. कायमस्वरुपी समिती नाही. ही सरळसेवेसाठीची निवड समिती आहे. जाहिरात निघाल्यावर त्या समितीची बैठक होते. सन २००९ मध्ये या समितीची बैठक झाली होती.

तसेच यासंदर्भात समितीने सुचविल्यानुसार या कक्षासाठी वरिष्ठ अधिकारी नियुक्त करण्याची कार्यवाही विभाग नियंत्रक यांच्या माध्यमातून करण्यात येईल, असे समितीला आश्वासित केले.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

समितीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांच्या पुणे येथील विभागीय कार्यालयास दिनांक २३ ऑगस्ट, २०१२ रोजी भेट देऊन तेथील अनुसूचित जातीच्या अधिकारी/कर्मचारी यांच्या पदोन्नती संदर्भात निवड समितीबाबत संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेताना समितीला आढळून आलेल्या त्रुटीची पुर्तता करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली, याची माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक ५ सप्टेंबर, २०१३ रोजी संबंधित विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

साक्षीच्या वेळी समितीने पदोन्नतीच्या जागा भरण्यासंदर्भातील निवड समितीमध्ये मागासवर्गीय प्रतिनिधी असणे आवश्यक असतांना शासनाचे निदेश न पाळणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे, अशी विचारणा केली असता व्यवस्थापकीय संचालक, म.रा.मा.प., महामंडळ यांनी वर्ग १ व वर्ग २ पदी अधिकाऱ्यांची खात्यामार्फत बढती पदी निवड करण्यासाठी महामंडळाने बढती समितीचे गठन केले आहे. सदर बढती समितीमध्ये महाराष्ट्र शासन नियुक्त उपसचिव दर्जाच्या मागासवर्गीय अधिकाऱ्यांचा प्रतिनिधी म्हणून समावेश करण्यात आलेला आहे, अशी समितीला माहिती दिली.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, सहाय्यक आयुक्त, मागासवर्ग कक्ष यांनी मागासवर्गीय कक्षाची स्थापना व पदोन्नतीबाबत निवड समिती स्थापन करण्याबाबत केलेल्या शिफारशीनुसार महामंडळाने कार्यवाही केली आहे किंवा असे याची पडताळणी शासनस्तरावरून करण्यात आली आहे काय, नसल्यास, यास कोण जबाबदार आहे, तसेच सहाय्यक आयुक्त, मागासवर्ग कक्ष यांनी केलेल्या शिफारसीनुसार संबंधित विभागीय कार्यालयाने कारवाई केली नसल्यास संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात येत आहे, याबाबत व्यवस्थापकीय संचालक, म.रा.मा.प. महामंडळ, पुणे यांनी राज्य परिवहन, पुणे विभागात मागासवर्ग कक्ष स्थापन करण्यात आला असून श्री.रमेश शंकर भंडलकर, विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी म्हणून मागासवर्ग कक्षासाठी नियुक्ती करण्यात आली होती. परंतु, श्री. भंडलकर यांची बदली झाल्यामुळे त्यांच्या जागेवर आता श्री. सचिन भुजबळ यांचे १५ दिवसापूर्वीच आदेश काढण्यात आलेले आहेत.

तसेच राज्य परिवहन महामंडळात वर्ग-३ घटक संवर्ग कर्मचाऱ्यांना पदोन्नती देतांना खात्यामार्फत बढती परीक्षा/व्यवसाय चाचणी आयोजित करण्यात येते. खात्यामार्फत बढतीच्या संबंधित पदाच्या रिक्त जागा, अनुशेष व आरक्षण विचारात घेऊन ज्येष्ठतेनुसार १:४ या प्रमाणात कर्मचाऱ्यांना खात्यामार्फत बढती परीक्षेसाठी/व्यवसाय चाचणीसाठी पात्र ठरविण्यात येते व सदर लेखी परीक्षेत/

व्यवसाय चाचणीत उत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना खात्यामार्फत संबंधित पदाच्या रिक्त जागा, अनुशेष व आरक्षण विचारात घेऊन त्यांना सेवा ज्येष्ठतेनुसार खात्यामार्फत बढती देण्यात येत असल्याचे स्पष्ट केले.

**अभिप्राय व शिफारशी :**

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ पुणे यांचे कार्यालयातील मागासवर्गीयांच्या राखीव पदावर सरळ सेवा व पदोन्नतीने भरण्यासाठी गठीत केलेल्या निवड समितीमध्ये मागासवर्गीय प्रतिनिधींचा समावेश करण्यात यावा व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात कळविण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

(३) **जातवैधता प्रमाणपत्र -**

समितीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पुणे येथील विभागीय कार्यालयास दिनांक २३ ऑगस्ट, २०१२ रोजी भेट देऊन तेथील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांची जात पडताळणी संदर्भात माहिती जाणून घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली. सदर साक्षीच्या वेळी समितीने विभागीय कार्यालयात अनुसूचित जाती प्रवर्गात ७१२ कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. यामध्ये १९९५ पूर्वीचे किती आणि १९९५ नंतरचे किती आहेत, त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे काय? अशी विचारणा केली असता प्रादेशिक व्यवस्थापक महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी, अनुसूचित जाती प्रवर्गातील २१२ कर्मचाऱ्यांचे जात पडताळणीचे प्रस्ताव समितीकडे पाठविले होते. त्यापैकी १८७ वैध झाले असून, २५ प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यामध्ये औरंगाबाद-९, लातूर-५, पुणे-८, नाशिक-३ अशा प्रकारे एकूण २५ प्रकरणे त्या-त्या जात पडताळणी समित्यांकडे प्रलंबित असल्याची माहिती दिली. त्यावर समितीने ज्या २५ कर्मचाऱ्यांची प्रकरणे जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत ते केव्हापासून कार्यरत आहेत अशी विचारणा केली असता, प्रादेशिक व्यवस्थापक यांनी सन २००९ पासून सेवेत कार्यरत आहेत त्यांच्यासोबत पाठपुरावा करुन वारंवार त्यांना नोटीसेस दिलेल्या आहेत. त्यांच्यासोबत पाठपुरावा करुन वारंवार त्यांना नोटीसेस दिलेल्या असल्याचे स्पष्ट केले असता समितीने सेवेत रुजू झाल्यापासून सहा महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही किंवा ते अवैध ठरले तर त्यांना अपात्र ठरविण्यात येऊन त्यांना सेवेतून काढून टाकण्याची तरतूद आहे. परंतु, हे कर्मचारी सन २००९ पासून जात वैधता प्रमाणपत्र सादर करीत नाहीत याचाच अर्थ ते बोगस आहेत. ज्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही त्यांच्यावर विभाग प्रमुख या नात्याने आपण काय कारवाई केली याबाबत समितीने पृच्छा केली असता प्रादेशिक व्यवस्थापकांनी

ज्या कर्मचाऱ्यांनी ६ महिन्यात जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही त्यांना विभाग नियंत्रकांनी आरोप पत्र देऊन बडतर्फ करावयास पाहिजे होते. येत्या महिन्याभरात या संदर्भातील कारवाई करण्यात येत असून औरंगाबादच्या जात पडताळणी समितीसोबत पत्रव्यवहार करीत आहेत. त्यांच्याकडून योग्य तो प्रतिसाद मिळत नसल्यामुळे ही प्रकरणे प्रलंबित असल्याचा खुलासा केला. सदरच्या खुलाशावरून समितीने पुढे असे मत व्यक्त केले की, संबंधित कार्यालयाचे काम प्रस्ताव पाठविण्याचे आहे. जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करून ते कार्यालयास सादर करण्याचे काम संबंधित कर्मचाऱ्याचे आहे.

अनुसूचित जाती प्रवर्गातील कर्मचाऱ्याचा प्रस्ताव जात पडताळणी समितीकडे पाठविताना १९५०-५२ पूर्वीचा जातीचा प्रवर्गातील कर्मचाऱ्याचा प्रस्ताव जात पडताळणी समितीकडे कोणकोणती कागदपत्रे पाठवावीत याचे टिप्पण करून त्यानुसार परिपूर्ण कागदांसह जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव पाठवावयास पाहिजे होता. त्यानंतर समितीने, ज्या २५ कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही त्यांना बडतर्फ करण्याबाबतची नोटीस किती दिवसांत देणार आहात अशी विचारणा केली असता प्रादेशिक व्यवस्थापकांनी एक महिन्याचा आत या कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही तर त्यांना बडतर्फ करण्यात येईल, असे आश्वासित केले. तदनंतर समितीने पुरविण्यात आलेल्या माहितीनुसार हुलन गौडा नरसन गौडा पाटील वरिष्ठ सांख्यिकी असे असून जातीच्या ठिकाणी इकिगेर (खुला) असे लिहिले आहे. ते खुल्या प्रवर्गातील आहेत, हे कशावरुन समजले, ते मागासवर्गीय समाजाचे देखील असू शकतात. अशी जात कधी खुल्या प्रवर्गात पहायला मिळाली नाही. यासंदर्भात खुलासा करण्यास सांगितले असता प्रादेशिक व्यवस्थापक यांनी कार्यालयात जी सेवाज्येष्ठता यादी आहे त्यामध्ये ते खुल्या प्रवर्गात दाखविले आहेत. त्यांच्या संदर्भातील कागदपत्रे नाहीत. या संदर्भात खात्री करून समितीला माहिती देतो असे आश्वासित केले. त्यावर समितीने आक्षेप घेऊन यासंदर्भात असा खुलासा केला की, मागासवर्गीयांच्या संदर्भात प्रत्येक राज्याचा वेगवेगळ्या जातीचा तक्ता आहे. एखादी जात दोन्ही राज्यात असू शकते किंवा एखादी जात त्या राज्यात असेल तर येथे नसते. येथे ती जात मागासवर्गीयांमध्ये असेल तर त्यांना त्याचा फायदा मिळू शकेल. परंतु, इतर राज्यांमध्ये त्या जातीचा समावेश मागासवर्गीयांमध्ये नसेल तर त्यांना तेथे फायदा मिळू शकणार नाही. तो कर्मचारी कोणत्या राज्याच्या रहिवासी आहे हे अगोदर पहायचे असते. राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पुणे अंतर्गत पुणे विभागात महामंडळाच्या कारभारासंदर्भात समितीला आढळून आलेल्या त्रुटीसंदर्भात समितीने नाराजी व्यक्त केली.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या पुणे येथील विभागीय कार्यालयातील अधिकाऱ्यांची दिनांक २२ ऑगस्ट, २०१२ रोजी घेतलेल्या साक्षीच्या वेळी उपस्थित झालेले मुद्दे व समितीने आश्वासित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची समितीला लेखी स्वरुपात प्राप्त झालेली माहिती पुढीलप्रमाणे आहे.

सन २००९ मध्ये सेवेत रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांपैकी २५ कर्मचाऱ्यांनी, समितीने भेट दिली त्यावेळी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नव्हते. त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे, या संदर्भात महामंडळाने दिलेली माहिती पुढीलप्रमाणे आहे. अनुसूचित जातीच्या कर्मचाऱ्यांनी जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय त्यांना पदोन्नती देण्यात येऊ नये, असे शासनाचे आदेश आहेत. त्यानुसार अनुसूचित जातीच्या कर्मचाऱ्यांना जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय पदोन्नती देण्यात येत नाही. परंतु, जात पडताळणी समितीकडे जातीचे दावे प्रलंबित असणाऱ्या कर्मचाऱ्यांना रा.प. सेवेतून बडतर्फ करण्याबाबत शासनाच्या कोणत्याही सूचना नाहीत. त्यामुळे जात पडताळणी समितीकडे जातीचे दावे प्रलंबित असणाऱ्या सदर २५ कर्मचाऱ्यांना रा.प. सेवेतून बडतर्फ करण्यात आलेले नाही. परंतु, संबंधित जात पडताळणी समितीकडून सदर २५ कर्मचाऱ्यांपैकी १६ कर्मचाऱ्यांची वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाली आहेत. तसेच, संबंधित जात पडताळणी समितीकडे उर्वरित ०९ कर्मचाऱ्यांचे जातीचे प्रलंबित दावे निकाली काढण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांच्या पुणे येथील विभागीय कार्यालयाच्या महाराष्ट्र राज्य अखत्यारीतील विभागात अनुसूचित जातीच्या अधिकारी/कर्मचारी यांच्या जात प्रमाणपत्राची जात पडताळणी करुन घेण्यात आली आहे की नाही यासंदर्भात उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने दिनांक ५ सप्टेंबर, २०१३ रोजी संबंधित विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली.

सदर साक्षीच्या वेळी समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी उपस्थित झालेल्या मुद्यासंदर्भात समितीने अशी विचारणा केली की, सन २००९ मध्ये सेवेत रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांपैकी २५ कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नव्हते. त्यामुळे संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे, यासंदर्भात व्यवस्थापकीय संचालक, म.रा.मा.प. महामंडळ, पुणे यांनी अनुसूचित जातीच्या कर्मचाऱ्यांनी जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय त्यांना पदोन्नती देण्यात येऊ नये असे शासनाचे स्पष्ट आदेश आहेत. परंतु दावे जर प्रलंबित असेल तर कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्यात येत नाही. जातपडताळणी समितीने प्रमाणपत्र वेळेवर देण्याची आवश्यकता आहे. जोपर्यंत

जातपडताळणी समिती जातपडताळणी प्रमाणपत्र देत नाही तोपर्यंत कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्यात येत नाही. कर्मचाऱ्यांच्या विरोधात जातपडताळणी प्रमाणपत्राचा निकाल आला तर कर्मचाऱ्याला बडतर्फ करण्याची कारवाई केली जाते.

आतापर्यंत १६ कर्मचाऱ्यांकडून वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाले असून ९ कर्मचाऱ्यांचे जातीचे प्रलंबित दावे निकाली काढण्याबाबत पाठपुरावा सुरु असल्यामुळे ९ कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आलेली नाही. ९ कर्मचाऱ्यांच्या संदर्भात पाठपुरावा केला असून प्रतिसाद मिळाला नाही. एक वर्षापासून ९ प्रकरणे प्रलंबित आहेत. कर्मचाऱ्यांची नितांत आवश्यकता असल्याची वस्तुस्थिती स्पष्ट केली या एकंदरीत स्पष्टीकरणासंदर्भात समितीने असे मत मांडले की, नोकरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना जातपडताळणीचे प्रमाणपत्र विहित वेळेमध्येच उपलब्ध करुन दिले गेले पाहिजे. काही कर्मचाऱ्यांचे जातपडताळणीचे प्रस्ताव वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. त्यामुळे नोकरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना लवकरात लवकर जातपडताळणी प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात काय कार्यवाही केलेली आहे, अशी विचारणा केली. त्यावर सामाजिक न्याय विभागाचे सचिव यांनी जातपडताळणी प्रमाणपत्राच्या संदर्भात दर महिन्याला आढावा घेतला जातो.  तसेच मुख्य सचिव सुध्दा यासंदर्भात आढावा घेत असतात. राज्यात एकंदर १५ जात पडताळणी समित्या आहेत. जातपडताळणी समित्यांवर सह सचिव दर्जाचा अध्यक्ष असावा असे उच्च न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. आता अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांना जातपडताळणी समितीचे अध्यक्षपद देण्यात आलेले आहे. एकंदरीत १५ जातपडताळणी समितीपैकी १२ जातपडताळणी समितीला अधिकारी मिळाले असल्यामुळे आता कामाला गती मिळालेली आहे. पूर्ण राज्यात जवळपास ८० हजार जात पडताळणीची प्रकरणे प्रलंबित आहेत. महसूल विभागाने प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक या प्रमाणे २४ जातपडताळणी समित्या निर्माण करण्यात याव्यात अशी शिफारस शासनाला केलेली आहे. २४ समित्या झाल्या तर राज्याची गरज पूर्ण होऊ शकेल. राज्यातील एकंदर १५ समित्यांपैकी केवळ १२ समित्या कार्यरत आहेत. ३ समित्यांवर अद्यापपावेतो नियुक्ती करण्यात आलेली नाही. राज्यामध्ये बऱ्याच दिवसापासून फक्त ९ समित्याच कार्यरत होत्या. २४ समित्या झाल्या तर जातपडताळणी प्रमाणपत्राचा बँकलॉग राहणार नाही. जिल्ह्यातील समितीवर सिलेक्शन ग्रेडच्या जॉईट कमिशनरांची नेमणूक करण्यात यावी असा प्रस्ताव महसूल खात्याने शासनास पाठविला असून तो शासनाच्या विचाराधीन असल्याचे स्पष्ट केले.

उपरोक्त माहितीच्या आधारे समितीने जातपडताळणी समित्या २४ करण्याबाबतचा शासनास दिलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा करण्यात यावा तसेच दिनांक ३० सप्टेंबर पर्यंत कर्मचाऱ्यांना जातपडताळणी करण्यास सांगण्यात आले होते. आता पुन्हा सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आलेली

आहे. वेळेत जातपडताळणी प्रमाणपत्र दिले गेले नाही तरी अडचणी निर्माण होतील. महार, मांग, हरिजन, चांभार या जातीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांकडे जातीचे प्रमाणपत्र असेल तर अशा विद्यार्थ्यांना जातपडताळणी प्रमाणपत्र ताबडतोबीने दिले गेले पाहिजे. यासंदर्भात समितीने, जातपडताळणीचे प्रमाणपत्र वेळेत देण्याच्या संदर्भात आढावा घेण्यात यावा असे निर्देश दिले. त्यावर सामजिक न्याय विभागाचे सचिवांनी मेडीकल आणि इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांच्या जातपडताळणीचे अर्ज येत आहेत, महानगरपालिका, ग्रामपंचायतीच्या निवडणुकीच्या उमेदवारांचेही जातपडताळणीचे अर्ज येत आहेत तसेच सेवेतील भरती, बढतीच्या संदर्भातील अर्ज येत आहेत. त्यामुळे महसूल विभागाने जिल्हावार समित्या करण्याचा प्रस्ताव दिला आहे त्याबाबत अनुसूचित जाती कल्याण समितीने शासनास शिफारस करावी, अशी विनंती केली.

त्यावर समितीने प्रत्येक जिल्ह्यात जातपडताळणी समिती निर्माण झाली तर साधारण प्रकरणात नोकरी करणाऱ्या कर्मचाऱ्याला २ महिन्यात जातपडताळणी प्रमाणपत्र मिळू शकेल व संदिग्ध प्रकरण असेल तर ६ महिन्यात जातपडताळणी प्रमाण मिळू शकेल. प्रत्येक जिल्ह्यात कायमस्वरुपी जातपडताळणी समिती करण्यासंदर्भात शासनास शिफारस करण्यात येईल, असे स्पष्ट केले.

**अभिप्राय व शिफारशी:-**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, पुणे येथील विभागीय कार्यालयाच्या अखत्यारितील विभागात कार्यरत असलेल्या अनुसूचित जातीच्या अधिकारी / कर्मचारी यांच्या जात प्रमाणपत्र पडताळणीचे प्रस्ताव वर्षानुवर्ष प्रलंबित आहेत. यात बनावट जात प्रमाणपत्राच्या आधारे महामंडळात सेवेत लाभ घेत असल्याचे निदर्शनास येत नाही. तसेच जातपडताळणी प्रमाणपत्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती मिळण्याच्या दृष्टीने लवकरात लवकर उपलब्ध होणे आवश्यक आहे.

सद्य:स्थितीत महामंडळातील ९ कर्मचाऱ्यांची प्रलंबित असलेल्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करून घेण्याची कार्यवाही तातडीने करण्यात यावी तसेच **साधारण प्रकरणात नोकरी करणाऱ्या कर्मचाऱ्याला दोन महिन्यात व संदिग्ध प्रकरणात सहा महिन्यात जातपडताळणी प्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे जातपडताळणी प्रमाणपत्र, नोकरी करणाऱ्या अनुसूचित जातीच्या अथवा इतर जातीच्या कर्मचाऱ्यांना लवकरात लवकर मिळण्याच्या दृष्टीने शासनाने प्रत्येक जिल्ह्यात जातपडताळणी समिती कायम स्वरुपी निर्माण करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करण्यात यावा अशी समिती शासनास शिफारस करीत आहे.**

## (क) पुणे विद्यापीठ, पुणे

**पुणे विद्यापीठातील प्रशासकीय तसेच शैक्षणिक विभागातील अधिकारी, अधिव्याख्याता, तांत्रिक व अतांत्रिक पदावरील अनुसूचित जातीच्या कर्मचाऱ्यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष.**

समितीने पुणे विद्यापीठातील प्रशासकीय तसेच शैक्षणिक विभागातील अधिकारी/कर्मचारी तसेच तांत्रिक/अतांत्रिक पदांवर अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी राखीव असलेली वर्ग 'अ' ते 'ड' ची पदे सरळ सेवाभरतीद्वारे भरण्यासाठी अवलंबिण्यात येत असलेल्या कार्यपध्दती तसेच विद्यापीठामध्ये प्रशासकीय विभागाकडे काम करीत असलेल्या वर्ग 'अ' ते 'ड' मधील अधिकारी व कर्मचाऱ्यांची मागील तीन वर्षांत (सन २००९-२०१०, २०१०-२०११ व २०११ ते मार्च २०१२ पर्यंत) वर्गनिहाय एकूण संख्या किती आहे. त्यापैकी वर्ग 'अ' ते 'ड' मधील अनुसूचित जातीसाठी किती राखीव पदे आहेत व त्यापैकी किती पदे रिक्त आहेत. या मुद्दयांच्या अनुषंगाने पुणे विद्यापीठाकडून माहिती मागविण्यात आली होती त्यानुसार पुणे विद्यापीठाने समितीला लेखी स्वरुपात दिलेली माहिती पुढीलप्रमाणे आहे.

गट 'अ' ते 'ड' संवर्गातील सरळसेवा प्रवेशाने भरावयाच्या पदांची जाहिरात वर्तमानपत्रात व विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येते. तसेच गट 'क' व 'ड' या संवर्गातील पदांसाठी सेवायोजन कार्यालयाकडूनही उमेदवारांची नावे मागविण्यात येतात.

विद्यापीठाने सरळसेवा प्रवेशाने भरावयाच्या गट 'अ' ते 'ड' संवर्गासाठी स्वतंत्र निवड समिती गठित केलेल्या आहेत. गट 'क' व 'ड'मधील पदांसाठी निवड समितीत समाजकल्याण अधिकारी/ आदिवासी विकास अधिकारी/जिल्हा प्रकल्प अधिकारी यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

**वर्ग 'अ' ते 'ड' संवर्गातील पदांची माहिती खालीलप्रमाणे :-**

| संवर्ग | एकूण पदे (ससेप्र/विप) | अ. जा. मध्ये राखीव पदे | सन २००९-१० पर्यंत भरलेली पदसंख्या | सन २००९-१० पर्यंत रिक्त पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| गट अ | ८६ | १० | ०४ | ०६ |
| गट ब | ७५ | १२ | ०३ | ०९ |
| गट क | ६७९ | ९४ | ७९ | १५ |
| गट ड | ३९५ | ८३ | ७६ | ०७ |
| एकूण | १२३५ | १९९ | १६२ | ३७ |

| संवर्ग | एकूण पदे (ससेप्र/विप) | अ. जा. मध्ये राखीव पदे | सन २०१०-११ पर्यंत भरलेली पदसंख्या | सन २०१०-११ पर्यंत रिक्त पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| गट अ | ८६ | १० | ०४ | ०६ |
| गट ब | ७५ | १२ | ०२ | १० |
| गट क | ६७९ | ९५ | ७९ | १६ |
| गट ड | ३९५ | ७३ | ६८ | ०५ |
| एकूण | १२३५ | १९० | १५३ | ३७ |

| संवर्ग | एकूण पदे (ससेप्र/विप) | अ. जा. मध्ये राखीव पदे | सन २०११-१२ पर्यंत भरलेली पदसंख्या | सन २०११-१२ पर्यंत रिक्त पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| गट अ | ८६ | १० | ०५ | ०५ |
| गट ब | ७५ | १२ | ०५ | ०७ |
| गट क | ६७९ | ९२ | ७७ | १५ |
| गट ड | ३९५ | ७४ | ६६ | ०८ |
| एकूण | १२३५ | १८८ | १५३ | ३५ |

**पदे रिक्त राहण्याची कारणे :-**

वरील रिक्त पदे ही सेवानिवृत्तीने तसेच वरिष्ठ पदावरील पदोन्नतीने निर्माण झालेली आहेत. रिक्त पदे भरण्यासाठी दि.१४-०५-२०१०, दि.१२-१०-२०१० व दि.१८-१०-२०१२ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

शासन निर्णय क्र. असंक-१०१०-प्र.क्र.१-२०१०-वित्तीय सुधारणा-१, दि.५ जून, २०१० नुसार वर्ग ३ व ४ संवर्गातील पदे भरण्यास शासनाने निर्बंध घातलेले आहेत. जून, २०१२ मध्ये पद भरतीवरील निर्बंध संपुष्टात आल्याने शासनाने गट अ ते ड संवर्गातील सरळसेवा प्रवेशाची पदे भरण्यासंदर्भात शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१२-प्र.क्र.१८६-१२, दि. २५-०७-२०१२ अन्वये मार्गदर्शक सूचना दिलेल्या असून त्यानुसार पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त मुद्द्यासंदर्भातील माहितीच्या अनुषंगाने अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने समितीने दिनांक २३ ऑगस्ट, २०१२ रोजी पुणे विद्यापीठास भेट देऊन तेथील संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली. सदर साक्षीच्यावेळी कुलगुरु, पुणे विद्यापीठ यांनी समितीला विद्यापीठाच्या कार्यक्षेत्राविषयीची थोडक्यात दिलेली माहिती पुढीलप्रमाणे आहे.

पुणे विद्यापीठाशी संलग्नित ५५८ महाविद्यालये आहेत. विद्यापीठामध्ये ३७१ शिक्षक व १२३५ शिक्षकेतर पदे आहेत. पुणे विद्यापीठाचे राष्ट्रीय पातळीवर मुल्यांकन झालेले असून 'नॅक' संस्थेने विद्यापीठाला सतत 'ए' श्रेणी दिलेली आहे. यु.जी.सी.ने सुध्दा पुणे विद्यापीठास यु.पी.ई. योजनेंतर्गत श्रेणी दिलेली आहे. साधारणत: फार कमी विद्यापीठांना अशा श्रेणी मिळतात.

पुणे विद्यापीठाला निरनिराळे संशोधन करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर ग्रँट मिळते. पुणे विद्यापीठ हे असे विद्यापीठ आहे की, ज्या विद्यापीठाकडून स्वत:च्या निधीतून प्रत्येक कॉलेजला तीन लाख रुपयांपर्यंत रिसर्च फंड दिला जातो. विद्यापीठाने चांगल्याप्रकारे संगणकीकरणाचे काम केलेले आहे. प्रवेश अर्ज, परीक्षेचे अर्ज, शैक्षणिक शुल्क इ. बाबी ऑनलाईनच्या माध्यमातून केल्या जातात. काही परीक्षा ऑनलाईन सुध्दा घेण्यात येतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात त्या-त्या ठिकाणी यावे लागत नाही. विद्यापीठाने वन विंडो सिस्टीम सुरू केली आहे. विद्यापीठाचे संगणकीकरण करीत असताना स्पर्धा परीक्षा केंद्र सुध्दा सुरू केले आहे. त्याचा कामगिरी बऱ्यापैकी आहे. सर्व ठिकाणी जास्तीत जास्त मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो. त्यानुसार २२० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला आहे.

पुणे विद्यापीठामध्ये महाराष्ट्र आणि गोवा राज्याच्या संयुक्त विद्यमाने सेट परीक्षा विभाग हा कार्यक्रम राबविला जात आहे. तसेच यु.जी.सी.ची नेट परीक्षा सुध्दा विद्यापीठ आयोजित करते. विद्यापीठामध्ये इस्त्रो संघटनेचा सेल उभारण्यात आलेला आहे. या माध्यमातून २० ते ३० लाख रुपयांपर्यंतचे प्रोजेक्ट दिले जातात. कोठारी फेलोशीपसाठी संपूर्ण देशाचा प्रस्ताव एकत्रित करून तो यु.जी.सी.कडे पाठविला जातो. एकंदरित विद्यापीठाची चांगल्या प्रकारे पत निर्माण झाली आहे.

पुणे विद्यापीठातील ७ लाख विद्यार्थ्यांचा आरोग्य विमा उतरविलेला आहे. याबाबतचा अर्धा खर्च पुणे विद्यापीठ आणि उर्वरित अर्धा खर्च विमा कंपनी करते. एखादी अनुचित घटना घडल्यास विमा कंपनीकडून जितकी रक्कम दिली जाते तितकीच रक्कम विद्यापीठाच्या माध्यमातून दिली जाते. शिवाय विद्यापीठामध्ये सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना पैशाच्या अडचणीमुळे फेलोशीप करण्यात येत असेल तर त्याबाबतची सुध्दा व्यवस्था केलेली आहे. ज्याला पी.एच.डी. करावयाची आहे त्यांना फेलोशीप मिळत नाही असे होत नाही.

तसेच चार वर्षांचा एम.टेक.,पी.एच.डी. एकत्रित प्रकल्प सुरू केला आहे. या प्रकल्पास पूर्णत: निधी इंडस्ट्रीचा आहे. अकॅडमी आणि इंडस्ट्रीने एकत्र येऊन हा प्रकल्प तयार केला आहे. प्रकल्पाचा सर्व खर्च इंडस्ट्रीकडून केला जातो. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावयाचे असल्यास त्या ठिकाणी विद्यापीठाचा एक आणि इंडस्ट्रीचा एक गाईड असतो. विद्यापीठ आणि इंडस्ट्रीच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम सुरू आहे. अशा प्रकारचा कार्यक्रम अन्य विद्यापीठांमध्ये नाही. एकंदरीत या कार्यक्रमाने यशस्वीरित्या काम सुरु केलेले आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नोक-या सुध्दा मिळतात. अशाच प्रकारे इतरही अनेक कार्यक्रम विद्यापीठाच्या माध्यमातून सुरू करीत आहोत. वर्षभरापासून विद्यापीठाने ह्युमन राईट एज्युकेशन हा कोर्स सुरुकेला आहे. अशा प्रकारचा कोर्स सुरू करणारे पुणे विद्यापीठ हे एकमेव विद्यापीठ आहे. सर्व शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी हा कोर्स अनिवार्य आहे. या कोर्सचे विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी स्वागत केले आहे.

कुलगुरुयांनी समितीला दिलेल्या उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने, अनुसूचित जाती प्रवर्गाच्या उमेदवारांच्या गट-अ ते गट-ड पर्यंतच्या पदांवर नियुक्तीसाठी सरळसेवा प्रवेश नियम तयार केले आहेत काय, अशी विचारणा केली असता. समितीने गट-अ ते गट-ड ची २००९-२०१० मध्ये एकूण मंजूर पदसंख्या १२३५ असून प्रत्यक्षात ९३४ पदसंख्या कार्यरत आहे. यात अनुसूचित जाती प्रवर्गातील १६२ कर्मचारी कार्यरत आहेत. २०१०-२०११ मध्ये सुध्दा १२३५ पदे मंजूर असून, ९१५ पदे कार्यरत आहेत. त्यापैकी अनुसूचित जाती प्रवर्गातील १५३ पदे कार्यरत आहेत. तसेच २०११-२०१२ मध्ये मंजूर पदे १२३५ असून, प्रत्यक्षात कार्यरत ८७६ पदे आहेत. यामध्ये अनुसूचित जाती प्रवर्गातील १५३ कर्मचारी कार्यरत आहेत. दरवर्षी कार्यरत पदसंख्या कमी होण्याची

कारणे काय आहेत अशी विचारणा केली असता कुलसचिव यांनी ज्या ठिकाणी दोन पदे असतात त्या ठिकाणी १३ टक्के आरक्षण येणार नाही. तेथे थेट ५० टक्के आरक्षण येईल. त्यामुळेच कार्यरत कर्मचा-यांची संख्या कमी-जास्त दिसून येते.

विद्यापीठामध्ये मध्यंतरी शिक्षकेतर पदांची भरती प्रक्रिया बंद होती. या पदांच्या भरती प्रक्रियेवरील बंदी उठल्यानंतर स्टँडर्ड कोड रद्द झाले. पूर्वी विद्यापीठ पदांबाबत अर्हता निश्चित करायचे. परंतु आता सर्व अधिकार मॅनेजमेंट कौन्सिलला आहेत. त्यानुसार शासनाकडून कोड मंजूर करून घ्यावे लागतात. त्यानुसार शासनाकडून १२ जुलै, २०१२ रोजी स्टँडर्ड कोडला अंतिम मान्यता मिळाली आहे, अशी माहिती दिली.

समितीने सन २००९-१० मध्ये अनुसूचित जाती प्रवर्गातील कार्यरत कर्मचा-यांची संख्या ७६ आहे, सन २०१०-११ मध्ये अनुसूचित जाती प्रवर्गातील कार्यरत कर्मचा-यांची संख्या ६८ आहे आणि सन २०११-१२ मध्ये अनुसूचित जाती प्रवर्गातील कार्यरत कर्मचा-यांची संख्या ६६ अशी देण्यात आली आहे. अनुसूचित जाती प्रवर्गात अ, ब, क, ड गटांमध्ये पदसंख्या कमी झालेली दिसत आहे. त्याबाबत विचारणा केली त्यावर सहसंचालक यांनी रोस्टरप्रमाणे कॅटेगरी बदलत असते आणि त्यामुळे संख्येवरही त्याचा परिणाम होतो, अशी माहिती समितीला स्पष्ट केली.

तसेच यासंदर्भात कुलसचिव, पुणे विद्यापीठ यांनी विद्यापीठातील सरळसेवेची पदे भरण्यासाठी वर्तमानपत्रांत जाहिरात देण्यात येते. वर्ग-१ व २ च्या पदांची जाहिरात इंग्रजी व मराठी वर्तमानपत्रातून दिली जाते. शिवाय विद्यापीठाच्या संकेतस्थळावर सुध्दा प्रसिध्द केली जाते. वर्ग-३ व ४ च्या पदांची जाहिरात केवळ मराठी वर्तमानपत्रात दिली जाते. त्यानुसार उमेदवारांकडून अर्ज मागवितो. तसेच सेवायोजन कार्यालयाकडून सुध्दा पात्र उमेदवारांची यादी मागविली जाते. विद्यापीठाला एम.सी.एस.आर. लागू झाले आहे. त्यामुळे आता मॅनेजमेंट कौन्सिलला अधिकार आहेत. यापूर्वी निवड समिती गठित करीत होतो. आता शासन निर्णयानुसार गट-क व ड साठी लेखी परीक्षा बंधनकारक केली आहे. गट-क मध्ये जे उमेदवार परीक्षेमध्ये मेरीट येतात त्यांना नियुक्ती पत्र दिले जाते. गट-ड मध्ये जे उमेदवार मेरीटमध्ये येतात त्यांची मुलाखत घेतली जाते. मुलाखतीच्या वेळी समाजकल्याण अधिकारी, आदिवासी प्रकल्प अधिकारी यांना उपस्थित राहण्याबाबत कळविले जाते. विद्यापीठामध्ये गट-अ, गट-ब आणि गट-क व ड मधील सेवकांसाठी स्वतंत्र निवड समिती आहे. विद्यापीठाच्या निवड समित्यांमध्ये रजिस्ट्रारचे प्रतिनिधी,

महिलांचे प्रतिनिधी, शासनाचे प्रतिनिधी अशा प्रकारे निरनिराळे प्रतिनिधी असतात. अशा प्रकारे ८-९ सदस्यांची समिती कार्यरत आहे. विद्यापीठामध्ये वर्ग-१ ची मंजूर पदसंख्या ८६ आहे. शिक्षकेतर पदांसाठी नवीन पध्दतीनुसार परीक्षा घेण्यात सुरुवात केली आहे. ३०० गुणांची परीक्षा घेण्यात येते. १०० गुणांचे ३ पेपर घेऊन नंतर मुलाखती घेतली जातात. निवड समितीमध्ये मॅनेजमेंट कौन्सिलचे २ प्रतिनिधी, ८-९ फॅकल्टीमधील एक डीन, रजिस्ट्रार असतात. तसेच दुस-या विद्यापीठाचे दोन एक्स्पर्ट नेमले जातात. यामध्ये मागासवर्ग प्रवर्गातील एक प्रतिनिधी असावा हे ठरवूनच भरती प्रक्रिया राबविण्यात येत असल्याबाबतचा अधिक खुलासा केला.

विद्यापीठांची ५५८ महाविद्यालये आहेत. या महाविद्यालयांत रोस्टरनुसार अनुसूचित जाती प्रवर्गाच्या जागा भरल्या आहेत काय या संदर्भात समितीने खुलासा करण्यास सांगितले असता सह संचालक, पुणे विद्यापीठ यांनी ५५८ महाविद्यालयांपैकी १६५ महाविद्यालये अनुदानित आहेत. या महाविद्यालयांमध्ये गट-अ, ब, क व ड ची एकूण मंजूर पदे ६८३२ असून, अनुसूचित जातीसाठी ९४५ पदे राखीव आहेत. त्यापैकी ८४८ पदे भरली असून, ९७ पदे रिक्त आहेत, अशी माहिती दिली. समितीने पुढे अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या पदांपैकी ९७ पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत व रिक्त पदे भरण्याबाबत विद्यापीठामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली. सहसंचालक यांनी असे स्पष्ट केले की, याबाबत संबंधित महाविद्यालयांकडे विचारणा केली होती. त्यांच्याकडून पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु असल्याचे सांगितले आहे. संबंधितांवर कारवाई सुरु आहे.

अनुसूचित जाती उमेदवारांच्या ९७ जागा रिक्त आहेत. ज्या जागा भरल्या जात नाहीत, त्या जागा ओपन करून ओपनमध्ये भरल्या जातात, असे मत समितीने व्यक्त करून महाविद्यालयांना अनुसूचित जातीच्या रिक्त जागा लवकरात लवकर भरण्याबाबत काही सूचना केल्या आहेत काय, अशी विचारणा केली. त्यावर प्रशासकीय अधिकारी, उच्च शिक्षण संचालनालय यांनी सर्व महाविद्यालयांतील अनुसूचित जातीचा अनुशेष मार्च, २०१३ पर्यंत भरण्याबाबत त्यांना पत्र दिले आहे. शासनाचे देखील या संदर्भात पत्र आले आहे. माहे मार्च, २०१२ अखेर गट-अ मध्ये सरळसेवेमध्ये अनुसूचित जातीचे उमेदवार न मिळाल्यामुळे, एक वर्षासाठी स्थानिय समितीमार्फत खुला प्रवर्गातून नेमणूक केली जाते. त्या आधारे विद्यापीठाने १ वर्षासाठी मान्यता दिली होती.

विद्यापीठाकडून बिंदुनामावली तपासून घेण्यात आली आहे. शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांबाबत दिनांक ३१ मार्च, २०१३ पर्यंत शासनाने मुदतवाढ दिलेली आहे. तसेच याबाबत सहसंचालक यांनी महाविद्यालयांना १ वर्षाची मान्यता देतो अशी माहिती दिली. त्यावर समितीने नेटसेट झालेल्या उमेदवारांची मुलाखत झाली. परंतु त्यांचे सिलेक्शन झाले नाही आणि खुल्याप्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी मान्यता देण्यात आल्याच्या तक्रारी आल्या असल्याने महाविद्यालयांना अशाप्रकारे मान्यता देण्याची प्रथा बंद करावी असे निर्देश दिले असता सहसंचालक यांनी, प्राचार्य निवडीमध्ये समिती असते. उमेदवार उपलब्ध असेल तर असे होत नाही. राखीव पदावरील उमेदवार न मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, म्हणून १ वर्षाचे मान्यता देण्यात येत असल्याची माहिती समितीला दिली. सदरच्या माहितीसंदर्भात समितीने असे मत व्यक्त केले की, अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील व्यक्ती मिळत नाही, म्हणून अनुसूचित जातीच्या प्रवर्गामध्ये नसलेल्या उमेदवाराला नियुक्ती देता, हे योग्य नाही. नेटसेट पात्रता असताना देखील उमेदवार पात्र नाही असे सांगून त्यांना घेतले जात नाही. अनेक महाविद्यालयांमध्ये असे झालेले आहे. उमेदवार उपलब्ध नाही म्हणून दुस-यांदा जाहिरात काढून उमेदवार मागविणे. उमेदवार उपलब्ध झाले नाहीत म्हणून सेवायोजन कार्यालयातून माहिती मागविणे, समाजकल्याण विभाग यांच्याकडून यादी मागविण्यासंदर्भात काही प्रयत्न केले आहेत काय? जर का ही पद्वत स्वीकारुनही उमेदवार उपलब्ध झाला नसेल तर हे मान्य करु शकतो. बऱ्याचदा पात्र मागासवर्गीय उमेदवार नाकारले जातात, त्याला कमी गुण दिले जातात. त्यामुळे मागासवर्गीय नसलेल्या दुस-या उमेदवाराला नोकरी मिळते, याबाबत समितीने नाराजी व्यक्त करुन पुढे गट ‘क’ मध्ये कोणती पदे आहेत व त्यातील कोणती पदे रिक्त आहेत, अशी विचारणा केली असता. यासंदर्भात संचालक म.वि.वि.मं. यांनी असा खुलासा केला की, जॉईंट डायरेक्टर ऑफिसने या संदर्भातील एनओसी दिल्यानंतर विद्यापीठाकडे ते कॉलेज आपल्या रिक्त जागांसंदर्भातील माहिती देते. सदर माहिती आरक्षण सेलकडून चेक आऊट केली जाते आणि नंतर ते महाविद्यालय जाहिरात काढते. लोकल व स्टेट लेव्हलवर ३ वर्तमानपत्रांमध्ये जाहिरात दिली जाते. जाहिरातीप्रमाणे ते अर्ज तपासले जातात. नेटसेट उत्तीर्ण उमेदवार असेल तर कोणत्याही परिस्थितीत त्याला डावलता येत नाही. युजीसीने नेटसेटला पर्याय म्हणून पीएचडी ही पात्रता दिलेली आहे. नेटसेट पात्र उमेदवार मिळत नसल्यामुळे जवळपास ९७ पदे रिक्त आहेत. मागासवर्गीय उमेदवाराचे सिलेक्शन झाले नाही तर खुल्या प्रवर्गातील उमेदवाराचा प्रस्ताव तयार केला जातो.

संचालकांनी केलेल्या खुलाशावरुन समितीने या विषयासंदर्भात असे स्पष्ट केले की, कॅटेगरीमध्ये नेटसेट पात्र उमेदवार नसेल, पीएचडी झालेला उमेदवार नसेल आणि तसा ओपनमध्ये देखील उमेदवार मिळाला नाही तर क्लॉक हवर नुसार नियुक्ती देण्यात येते. त्यानुसार अनुशेषांतर्गत व्यक्ती नेटसेट नसताना त्याची नियुक्ती तशी का करीत नाही. मागासवर्गीयांमधून नेटसेट, पीएचडी, एमफिल उमेदवार मिळाला नाही तर क्लॉक हवर वर उमेदवार मिळतात. मग तसे उमेदवार मागासवर्गीयांमधून देखील घेतले पाहिजेत. एखाद्या उमेदवाराला तोंडी परीक्षेमध्ये काही विशिष्ट मार्क्स दिल्यानंतर तो पास होतो, असे काही निकष आहेत का ? शासनाचे या संदर्भात सन २००४ चे परिपत्रक आहे. मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवार नेटसेट नसला तरी त्याला क्लॉक हवर ठेवावे लागते. मागासवर्गीयांची जागा असेल तर ओपनचे उमेदवार घेण्याऐवजी आरक्षणाच्या जागेवर मागासवर्गीय उमेदवारच घेतला पाहिजे. अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील उमेदवारांवर होणारा अन्याय दूर केला पाहिजे.

समितीने पुढे एकूण ५५८ महाविद्यालयांपैकी १६५ अनुदानित महाविद्यालयांमध्ये मागासवर्गीय प्राचार्य किती आहेत. अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये भरतीची प्रोसेस कशी आहे अशी विचारणा केली असता, सहसंचालक यांनी अनुदानित व विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये भरतीची प्रोसेस सारखीच आहे. जाहिरात देणे, मुलाखत देणे हीच प्रोसेस सर्व ठिकाणी असते. विद्यापीठाकडूनच त्यांना या संदर्भात मान्यता देण्यात येत असल्याची माहिती दिली.

पुणे विद्यापीठास भेट देऊन संबंधितांच्या घेतलेल्या साक्षीच्या वेळेला रिक्त असलेली ९७ पदे भरण्यासाठी कार्यवाही पूर्ण झाली आहे काय, नसल्यास विलंबाची कारणे काय तसेच ‘अ’ वर्गाच्या पदांकरिता नियमान्वये असलेल्या पात्रतेअभावी अनुसूचित जातीच्या उमेदवारांची निवड न करता खुल्या प्रवर्गाच्या उमेदवाराची नियुक्ती करण्यात येते व त्यास विद्यापीठाची मान्यता घेण्यात येते अशी किती पदे भरण्यात आली आहेत. सदरच्या राखीव पदांसाठी अनुसूचित जातीच्या उमेदवारांच्या निवडीसाठी पुन्हा त्यानंतर कोणत्या प्रकारचे प्रयत्न करण्यात आले यासंदर्भात उपस्थित झालेल्या मुद्यासंदर्भात विद्यापीठाने लेखी स्वरुपात समितीला दिलेली माहिती पुढीलप्रमाणे आहे.

उल्लेख केलेल्या ९७ पदांचा अनुशेष संलग्नित महाविद्यालयातील असून सदर पदे भरण्याची कार्यवाही संबंधित महाविद्यालय स्तरावर सुरु आहे. या कार्यालयाने तपासून दिलेल्या आरक्षणानुसार महाविद्यालय स्तरावर संवर्गातील पदे भरण्याची कार्यवाही झाल्यानंतर विद्यापीठाकडून शिक्षक मान्यता देण्यात येते व त्यानुसार सन २०१२-१३ मध्ये रिक्त असलेल्या ९७ अनुसूचित जातीच्या पदांपैकी ५३ पदांस मान्यता देण्यात आलेल्या आहेत. तसेच उर्वरित पदांबाबत विहित कार्यपध्दतीने महाविद्यालय स्तरावर प्रक्रिया चालू आहे. महाविद्यालय/ संस्थेतील शिक्षक संवर्गातील पदांचे आरक्षण विद्यापीठाच्या आरक्षण कक्षाकडून ठरवून देण्यात येते. संबंधित महाविद्यालय / संस्थांनी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदावर इतर प्रवर्गातील उमेदवारांची फक्त एका शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेवून विद्यापीठ परिनियमातील तरतुदीनुसार महाविद्यालय स्तरावर तात्पुरती नियुक्ती करण्यात येते. अशा नेमणुकीस विद्यापीठाकडून कोणत्याही प्रकारची कायमस्वरुपी मान्यता दिली जात नाही. दरवर्षी महाविद्यालयातील पदांचा आढावा घेवून नव्याने पुन्हा जाहिरात प्रसिध्द करून महाविद्यालय स्तरावर पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येते.

**विभागीय सचिवांची साक्ष :-**

समितीने पुणे विद्यापीठ येथे दिनांक २३ ऑगस्ट, २०१२ रोजी भेट देऊन संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली होती सदर साक्षीच्या वेळी उपस्थित झालेल्या मुद्दयाच्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबत समितीला प्राप्त झालेल्या वरील माहितीच्या अनुषंगाने अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक ५ सप्टेंबर, २०१३ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

साक्षीच्या वेळी रिक्त असलेल्या ९७ पदांपैकी ५३ पदांस मान्यता दिली असून उर्वरित पदे भरण्यासाठी कार्यवाही पूर्ण झाली आहे काय नसल्यास विलंबाची कारणे काय अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिव यांनी ९७ पदांपैकी ५३ पदे भरली आहेत. हा अनुशेष ९७ पदांचा होता, आता अनुशेष ४४ पदांचा आहे. 'क' आणि 'ड' वर्गवारीतील पदे भरण्यासाठी शासनाची बंदी नव्हती. ही पदे भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. 'अ', 'ब', 'क' आणि 'ड' अशी पदांची वर्गवारी आहे. 'क' आणि 'ड' वर्गवारीतील पदे भरायला फारशी अडचण येत नाही परंतु 'अ' आणि 'ब' वर्गवारीतील

पदे भरतांना त्यांची शैक्षणिक पात्रता तपासावी लागते. 'क' आणि 'ड' वर्गवारीतील पदे भरण्यासाठी दोन महिन्याचा कालावधी दिलेला आहे, अशी माहिती दिली.

त्यावर समितीने, 'अ' वर्गाच्या पदांकरिता नियमान्वये असलेल्या पात्रतेअभावी अनुसूचित जातीच्या उमेदवारांची निवड न करता खुल्या प्रवर्गाच्या उमेदवाराची नियुक्ती करण्यात येते व त्यास विद्यापीठाची मान्यता घेण्यात येते. अशी किती पदे भरण्यात आली आहेत. सदरच्या राखीव पदांसाठी अनुसूचित जातीच्या उमेदवारांच्या निवडीसाठी पुन्हा त्यानंतर कोणत्या प्रकारचे प्रयत्न करण्यात आले, अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी संबंधित महाविद्यालय / संस्थांनी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार अनुसूचित जाती/ अनुसूचित जमातीचे पाच उमेदवार उपलब्ध झाले नव्हते म्हणून एक वर्षाकरिता सदरहू जागेवर खुल्या वर्गातील उमेदवाराची तात्पुरती नेमणूक करण्यात येते, परंतु त्यांना कोणत्याही प्रकारची कायमस्वरुपी मान्यता दिली जात नाही. सन २०१०-२०११ मध्ये आरक्षणासंबंधीचा आढावा घेतलेला आहे. एकंदरीत मंजूर पदे ८९८ होती. त्यानंतर रोस्टर तपासून २६६ पदांपैकी ३१ पदे भरलेली आहेत. उर्वरित २४६ पदांसाठी पात्र उमेदवार न मिळाल्यामुळे सदर पदे रिक्त आहेत, असे स्पष्ट केले.

समितीने पुढे अशी पृच्छा केली की, २४६ पदांसाठी पात्र उमेदवार मिळण्यासाठी आपण कोणते प्रयत्न केले. त्यावर कुलगुरु यांनी या पदांसाठी पात्रता नेट-सेटची परीक्षा पास असणे आवश्यक आहे. या पदांसाठी पात्र उमेदवार मिळण्यासाठी पाच, सहा ठिकाणी कार्यशाळा घेण्यात आल्या होत्या. या एका सेमिस्टरमध्ये दोन तीन जणांना घेण्यात येते. पूर्वी नेट सेटची परीक्षा पास असण्याचे प्रमाण .८ टक्के, .९ टक्के राहत असे. गेल्या दोन तीन वर्षात हे प्रमाण ३ टक्के झाले आहे. यापुढेही पात्रतेची अडचण येणार नाही, अशी माहिती दिली या संदर्भात अप्पर मुख्य सचिव यांनी अशी सूचना केली की, २४६ पदे रिक्त आहेत, याचा कुलगुरु यांनी विषयानिहाय आढावा घ्यावा. त्यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, उमेदवार मिळण्यासाठी केव्हा कार्यशाळा घेतल्या आणि त्याला किती उमेदवार उपस्थित होते. त्यावर कुलगुरु यांनी याबाबतची माहिती नंतर देतो, असे सांगून पुढे असे स्पष्ट केले की, या कार्यशाळेसाठी एक्सपर्ट आणि बाहेरच्या तज्ज्ञांना बोलाविण्यात आले होते. त्यासंदर्भात अधिक माहितीच्या अनुषंगाने विभागीय सचिवांनी एकूण पात्र उमेदवार सहा हजाराच्या आसपास आहेत. त्याचे ऑनलाईन नोंदणी करण्याची गरज आहे. ६ हजार पात्र उमेदवारांचे ऑनलाईन नोंदणी

केले तर त्यामध्ये अनुसूचित जाती, जमातीचे किती उमेदवार आहेत आणि त्यांचा विषयावार कोट करण्यास मदत होणार आहे. सन २०१०-२०११ मध्ये तपासणी करण्यात आली होती. तेव्हा पासून ते प्रलंबित असल्याचे समितीला सांगितले.

याच संदर्भात अप्पर मुख्य सचिवांनी असे विचार व्यक्त केले की, यामध्ये दोन कॅटेगिरी करण्याची गरज आहे. अनुदानीत महाविद्यालय आणि शासकीय महाविद्यालय अशा आपण दोन कॅटेगरीज करण्याची गरज आहे. यामध्ये आरक्षण वेगळे करण्याची गरज आहे आणि विनाअनुदानीत महाविद्यालयाचे आरक्षण वेगळे करण्याची गरज आहे. त्यांना भविष्यात शासनाची अनुदान हवे असेल तर त्यामधील कर्मचाऱ्यांची रोस्टरची तपासणी करुन घेतली पाहिजे. ज्यांना शासनाच्या अनुदानाची गरज नाही, त्यांना आरक्षण बंधनकारक नाही. ज्यांनी शासनाकडून सवलतीच्या दरात जमिनी घेतल्या त्यांनाच आरक्षण लागू होणार आहे. जमीन खरेदी केल्यानंतर विनाअनुदानीत तत्वावर इमारत उभी केली तर त्या ठिकाणी कार्यरत असणाऱ्या कर्मचारी वर्गासाठी आरक्षण लागू होणार नाही. आरक्षणाच्या अगेन्स्ट जनरल कॅटेगरीची भरती केली तर अशा लोकांना नंतर काढता येत नाही. सदरच्या माहितीच्या अनुषंगाने समितीने यासंदर्भात जो नियम आहे त्याचे परिपत्रक आहे काय? अशी विचारणा केली असता विभागीय सचिव यांनी, या कॅटेगरीमध्ये पात्र उमेदवार उपलब्ध होत नसल्यामुळे हा प्रश्न कायमस्वरुपी निर्माण झालेला आहे. पात्र उमेदवार उपलब्ध होण्यासाठी अनुसूचित जातीचे जे पदव्युत्तर विद्यार्थी आहेत अशा विद्यार्थ्यांना क्लॉकवाईज घेण्याची गरज आहे, असे सांगितले असता त्याप्रमाण् कार्यवाही करायला कोणतीच हरकत नसावी असे समितीला वाटते आणि अशा प्रकारची समिती अहवालात निश्चितपणे शिफारस करण्यात येईल असे मत समितीने व्यक्त केले असता कुलगुरु यांनी समितीला असा खुलासा केला की, विद्यापीठामार्फत योजना राबविली जाते. विद्यार्थी उच्चशिक्षित असेल तर त्यांचे रजिस्ट्रेशन केले जाते. त्यानंतर त्याची यादी तयार केली जाते. ती यादी महाविद्यालयांकडे पाठविली जाते आणि संबंधित विद्यार्थ्यांनाच मुलाखतीसाठी आमंत्रित करण्याचा आग्रह धरला जातो, अशी विभागाची योजना असल्याचे सांगितले.

नेट-सेटच्या संदर्भात एसीएसची होमची कमिटी आहे. विभागाचे अप्पर मुख्य सचिव यांनी त्यासंबंधीची अधिक माहिती संदर्भात पुढील खुलासा केला की, मंजुर पदांपैकी १३ टक्के प्रमाणे एससीचे रिझर्व्हेशन आहे. ५ हजार पदे असतील तर १३ टक्के प्रमाणे

६५० पदे ही एससीसाठी येतात. यामध्ये ५६० पदे भरलीतर जी उर्वरित पदे राहतात तो अनुशेष असतो आणि जास्त पदे भरली तर अनुशेष शुन्य येतो.

ऑनलाईन पध्दतीने बिंदू नामावलीची तपासणी करणार आहोत. त्याचे डेमोस्ट्रेशन झालेले आहे. त्यामुळे आता या प्रक्रियेला फार वेळ लागणार नाही. यामध्ये ॲक्सुरिसी ही ९९ टक्के असणार आहे. यासंदर्भात संबंधित संस्था चालकांना योग्य ते अधिकार दिले जाणार आहेत. त्यानंतर बिंदु नामावलीची तपासणी ऑन लाईन पध्दतीने करण्यावर विभागाचा प्रयत्न असणार आहे. सदरच्या खुलाशास समितीने सहमती दर्शवून बिंदु नामावली ऑन लाईन पध्दतीने करण्याबाबत समितीच्या अहवालात शिफारस करण्यात येईल असे स्पष्ट केले.

**अभिप्राय व शिफारशी :-**

समितीने, पुणे विद्यापीठातील प्रशासकीय तसेच शैक्षणिक विभागातील अधिकारी/ कर्मचारी तसेच तांत्रिक/अतांत्रिक पदांवर अनुसूचित जातीच्या उमेदवारांच्या भरतीसंदर्भात विभागीय सचिवांनी असे निदर्शनास आणले की प्रवर्गामध्ये पात्र उमेदवार उपलब्ध होत नसल्यामुळे आरक्षणाच्या अगेन्स्ट जनरल कॅटगरीतील उमेदवारांची भरती विनाअनुदानीत महाविद्यालयात केली जाते व त्यामुळे उमेदवार न मिळणे हा प्रश्न कायमस्वरुपी निर्माण झालेला आहे.

**विद्यापीठाअंतर्गत अनुदानित व विना अनुदानित महाविद्यालयामध्ये अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना योग्य प्रतिनिधित्व मिळण्याकरिता जे विद्यार्थी पदव्युत्तर शिक्षण घेत आहेत त्यांना उक्त महाविद्यालयामध्ये क्लॉकवाईज प्राध्यापक पदावर नियुक्ती देण्यासंदर्भात शासनाने योग्य ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

**विद्यापीठाने बिंदू नामावलीची ऑनलाईन पध्दतीने तपासणी करण्यासंदर्भात अशी माहिती दिली की, बिंदू नामावलीची तपासणी ऑनलाईन केल्यास त्यामध्ये ९९ टक्के अचूकता असणार आहे. त्यामुळे संबंधित संस्था चालकांना योग्य ते अधिकार देऊन बिंदू नामावली ऑनलाईन पध्दतीने करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

## (ड) वसतिगृह, पुणे

समितीने, पुणे येथील महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या महिला वसतिगृहास दिनांक २२ ऑगस्ट, २०१२ रोजी भेट देऊन तेथील प्रत्यक्ष पाहणी केली. त्यावेळी वसतीगृहाच्या अधिक्षिका यांनी समितीला अशी माहिती दिली की, महर्षी कर्वे यांनी १८९६ साली सदरहू संस्था सुरु केली. सद्य:स्थितीत वसतिगृहात ११५० विद्यार्थीनी राहतात. ६०० मुलींना संस्था वेगवेगळया प्रकारची मदत करते. वसतिगृहाची ३५०० विद्यार्थीनी राहतील इतकी क्षमता आहे. विद्यार्थीनींना सकाळी चहा-बिस्कीट, दुपारी व संध्याकाळी चौरस आहाराचे भोजन दिले जाते. विद्यार्थीनींची गुणवत्ता आणि कौटुंबिक परिस्थिती पाहून त्यांना संस्थेमध्ये प्रवेश दिला जातो. संस्थेने माजी विद्यार्थीनींचा संघ स्थापन केला असून, माजी विद्यार्थीनीपैकी जवळजवळ ५० टक्के विद्यार्थीनी संस्थेला भेट देतात.

पुणे येथील महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या महिला वसतिगृहाच्या अधिक्षिका यांनी उपरोक्त दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने संस्थेसाठी कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे अशी विचारणा केली असता, संस्थेच्या अधिक्षिका यांच्या वतीने असे सांगण्यात आले की, निवासी स्त्री अधिक्षीकांची आवश्यकता असून, पहारेकऱ्यांची व्यवस्था करणे गरजेचे आहे. सध्या २००-२२५ विद्यार्थीनींमागे दोन महिला कर्मचारी कार्यरत आहेत. विद्यार्थीनींना खेळण्यासाठी प्रशस्त मैदान आहे. एकंदरीत संस्थेचा कॅम्पस ६० एकरचा असून, ६५ युनिटस् आहेत. संस्थेत २५ हजार विद्यार्थीनी शिकत असून, शिक्षक कर्मचारी ५०० व शिक्षकेतर कर्मचारी ६०० आहेत. संस्थेतील विद्यार्थीनी सुट्टीच्या काळात भाऊबीज निधी जमा करतात. साधारणत: ४० लाख रुपये भाऊबीज निधी जमा होतो. या निधीतून मुलींना शिक्षण दिले जाते. ही योजना गेल्या ९५ वर्षांपासून सुरू आहे. संस्थेने ७ लाख रुपये खर्च करून उपहार गृहासाठी भाजीपाल्याच्या टाकाऊ वस्तुंपासून गॅसनिर्मिती करण्याचा प्रकल्प उभारलेला आहे. या प्रकल्पामुळे संस्थेचा गॅस सिलेंडरवरील लाखो रुपयांचा खर्च वाचतो.

समितीने, संस्थेचे कार्यालय, स्वयंपाक गृह, वसतिगृहातील खोल्या व परिसराला भेट दिली असता सर्वत्र स्वच्छता व टापटीपपणा आढळून आला. यासंदर्भात समितीने उपरोक्त संस्थेच्या वसतिगृहाच्या एकंदरीत व्यवस्था व कामकाजासंदर्भात समाधान व्यक्त केले.

समितीने,तद्नंतर पुणे येथील गंगाई मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, फुरसुंगी या वसतीगृहास भेट देऊन वसतिगृहाची पाहणी केली असता समितीला पुढीलप्रमाणे त्रुटी आढळल्या.

(१) हजेरीपटावरील २४ विद्यार्थ्यांपैकी काही विद्यार्थी उपस्थित नव्हते.

(२) विद्यार्थ्यांना फक्त पुस्तके देण्यात येतात. बाकीचे साहित्य त्यांना स्वत: आणावे लागते.

(३) स्वयंपाकघरात २४ विद्यार्थ्यांना पुरेल एवढे अन्न शिजविलेले नव्हते.

(४) इमारतीमध्ये पहिली ते पाचवी इयत्तांच्या वर्ग खोल्या नव्हत्या.

(५) वसतिगृहाच्या इमारतीमध्येच प्राथमिक विद्यालय चालविण्यात येत होते.

(६) खोल्यांमध्ये पंख्याची सोय नव्हती, लाईटची सोय नव्हती.

(७) विद्यार्थ्यांसाठी असलेले शौचालय खराब होते.

(८) संध्याकाळच्या वेळी वर्गखोल्यांचा वापर सामान ठेवण्यासाठी होतो.

(९) विद्यार्थ्यांना आंघोळ करण्यासाठी वेगळी सोय नाही. शौचालयाच्या समोरच त्यांना आंघोळ करावी लागते.

(१०) वसतीगृहाची तपासणी करण्यास आलेले समाज कल्याण अधिकारी श्री.मस्के, श्री.कवटे व श्री.भोसले यांनी वसतिगृहासंबंधीचा अहवाल योग्यप्रकारे लिहिलेला नव्हता.

तसेच समितीने पुढे अनुजा मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, लोणी काळभोर या वसतीगृहास भेट देऊन वसतिगृहाची पाहणी केली असता समितीला पुढीलप्रमाणे त्रुटी आढळल्या.

(१) हजेरीपटावरील २४ विद्यार्थ्यांपैकी काही विद्यार्थी उपस्थित नव्हते.

(२) विद्यार्थ्यांना फक्त पुस्तके देण्यात येतात. बाकीचे साहित्य त्यांना स्वत: आणावे लागते.

(३) खोल्यांमध्ये पंख्याची सोय नव्हती. लाईटची सोय नव्हती.

(४) विद्यार्थ्यांसाठी असलेले शौचालय खराब होते.

(५) विद्यार्थ्यांच्या आंघोळीसाठी व्यवस्थित सोय नाही.

(६) वसतिगृहाची तपासणी करण्यात आलेल्या तपासणी समाजकल्याण अधिकारी श्री.मस्के, श्री.कवटे व श्री.भोसले यांनी वसतिगृहासंबंधिचा अहवाल योग्यप्रकारे लिहिलेला नव्हता. संबंधितांच्या अभिप्राय लिहिण्याच्या पध्दतीबाबत समितीने खेद व्यक्त केला.

उपरोक्त दोन्ही वसतिगृहाच्या एकंदरित व्यवस्थेबाबत समितीला आढळून आलेल्या त्रुटी बाबत समितीने नाराजी व्यक्त केली व या संदर्भात संबंधितांकडून खुलासा मागविण्याबाबतच्या सूचना केल्या.

समितीने दिनांक २२ ऑगस्ट, २०१२ रोजी पुणे येथील समाजकल्याण विभागाच्या अंतर्गत असलेल्या गंगाई मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, फुरसुंगी व अनुजा मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, लोणी काळभोर यांची पाहणी केली असता समितीला आढळून आलेल्या त्रुटीसंदर्भात संबंधितांकडून खुलासा मागविण्याबाबत केलेल्या सूचनेनुसार संबंधित सामाजिक न्याय विभागाकडे मुद्दे कळविण्यात आले होते.

मुद्दा क्रमांक (१) पुणे येथील समाजकल्याण विभागाच्या अंतर्गत असलेल्या गंगाई मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, फुरसुंगी व अनुजा मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह लोणीकाळभोर, पुणे येथील वसतीगृहाची पाहणी केली असता समितीला वसतिगृहामध्ये १०० टक्के विद्यार्थी उपस्थित नसणे, विद्यार्थ्यांना स्वत: साहित्य आणावे लागणे, विद्यार्थ्यांना पुरेल एवढे अन्न शिजविलेले नसणे, इमारतीमध्ये पहिली ते पाचवी इयत्तांच्या वर्ग खोल्या नसणे, खोल्यांमध्ये लाईटची व पख्यांची सोय नसणे, शौचालय खराब असणे व त्या समोरच त्यांना आंघोळ करावी लागणे, इत्यादी त्रुटी आढळून आल्या असून संबंधित अधिकाऱ्यांनी वसतीगृहातील वस्तुस्थिती शासनाच्या निदर्शनास आणलेली नाही. याबाबत संबंधितांवर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे.

(२) मागासवर्गीयांच्या वसतिगृहाची तपासणी शासनामार्फत कोणकोणत्या स्तरावरील अधिकाऱ्यामार्फत करण्यात येते. सदर प्रकरणी समाजकल्याण अधिकारी यांच्या व्यतिरिक्त आणखी कोण वसतिगृहाच्या व त्यातील विद्यार्थ्यांच्या दुरावस्थेस जबाबदार आहे व त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे.

(३) अशा प्रकारच्या त्रुटी टाळून सदर घटकातील विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत तसेच सदर सुविधा पुरविणाऱ्या यंत्रणेवर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी शासनस्तरावर कोणत्या उपाययोजना करणे आवश्यक आहे व त्याबाबत शासनाची भूमिका काय आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :-**

उपरोक्त मुद्द्यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला प्राप्त न झाल्याने समितीने संबंधित सामाजिक न्याय विभागाच्या सचिवांची दिनांक ५ सप्टेंबर, २०१३ रोजी साक्ष आयोजित केली. सदरच्या साक्षीच्या वेळी समितीला सामाजिक न्याय विभागाकडून लेखी स्वरुपात पुरविण्यात आलेली माहिती पुढीलप्रमाणे आहे.

याबाबतची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे आहे

**(अ) गंगाई मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, सर्वे नं. २१५, कॅनॉल लगत, गंगाई नगर, फुरसुंगी, ता. हवेली, जि. पुणे.**

| अ. क्र. | समितीने निदर्शनास आणलेल्या त्रुटी | शासन निर्णया नुसार आवश्यक बाबी | संस्थेने त्रुटीची केलेली पुर्तता |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | १००% उपस्थिती नसणे. | ७५ टक्के उपस्थिती आवश्यक | दिनांक ०३..०९.२०१३ रोजी वसतिगृहात भेट दिली असता २४ मान्य संख्येपैकी २३ विद्यार्थी हजर होते. |
| २ | विद्यार्थ्याना स्वत: साहित्य आणावे लागणे. | प्रवेशित विद्यार्थ्याना अंथरूण पांघरूणाची सोय पुरेशा प्रमाणात संस्थेने केलेली असावी. | दिनांक ०३-०९-२०१३ रोजी वसतिगृहात भेट दिली असता विद्यार्थ्याना दंतमंजन, साबण, तेल, गाद्या संतरंजी, ब्लॅकेट पुरविण्यात आल्याचे दिसून आले. |

**माहिती**---चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ३ | विद्यार्थ्यांना पुरेल एवढे अन्न शिजवलेले नसणे. | पोटभर सकस अन्न पुरविणे आवश्यक | दिनांक ०३-०९-२०१३ रोजी वसतिगृहात भेट दिली असता विद्यार्थ्यांना नाश्ता व पोटभर सकस जेवण मिळत असल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. |
| ४ | इमारतीमध्ये १ ली ते ५ वी इयत्ता वर्ग खोल्या नसणे, खोल्यामध्ये लाईटची व पंख्याची सोय नसणे. | प्रत्येक निवासी छात्रास किमान २४ चौ. फुट ते कमाल ४० चौ. फुट या प्रमाणात शयन व भोजनासाठी जागा उपलब्ध असणे आवश्यक तसेच इमारतीमध्ये शौचालय व स्नानगृहे पुरेशा प्रमाणात उपलब्ध असावीत. | संस्थेने विद्यार्थ्यासाठी अन्य ठिकाणी नवीन इमारत उपलब्ध करून दिलेली आहे. तसेच नवीन इमारती मधील सर्व खोल्यामध्ये विजेची व पंख्याची सोय करण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांना निवासासाठी सोय करण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांच्या निवासायाठी १२x१२ फुटाच्या ४ खोल्या असून त्या प्रत्येक खोलीमध्ये ६ विद्यार्थ्यांची सोय केलेली आहे. एक खोली स्वयंपाक घर व धान्यकोठीसाठी वापरण्यात येते तसेच ४ शौचालय व ५ स्नानगृह (न्हाणी घर) उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. |

**(ब) अनुजा मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, सर्वे नं. ९, कदम वाकवस्ती (घोरपडे मळा), लोणीकाळभोर, ता. हवेली, जि.पुणे.**

| अ. क्र. | समितीने निदर्शनास आणलेल्या त्रुटी | शासन निर्णयानुसार आवश्यक बाब | संस्थेने त्रुटीची केलेली पूर्तता |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | १००% उपस्थिती नसणे. | ७५ टक्के उपस्थिती आवश्यक. | दिनांक ०३..०९.२०१३ रोजी वसतिगृहात भेट दिली असता २४ मान्य संख्येपैकी १८ विद्यार्थी हजर होते. |
| २ | विद्यार्थ्यांनी स्वत: साहित्य आणावे लागणे. | प्रवेशित विद्यार्थ्यांना अंथरूण पांघरूणाची पुरेशा प्रमाणात संस्थेने केलेली असावी. | दिनांक ०३-०९-२०१३ रोजी वसतिगृहात भेट दिली असता विद्यार्थ्यांना दंतमंजन, साबण, तेल, गादया स्तरंजी, ब्लँकेट पुरविण्यात आल्याचे दिसून येते व ग्रंथालयासाठी पुस्तके उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. |
| ३ | विद्यार्थ्यांना पुरेल एवढे अन्न शिजवलेले नसणे. | पोटभर सकस अन्न पुरविणे आवश्यक | दिनांक ०३-०९-२०१३ रोजी वसतिगृहात भेट दिली असता विद्यार्थ्यांना नाश्ता व पोटभर सकस जेवण मिळत असल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. |
| ४ | इमारतीमध्ये १ ली ते ५ वी इयत्ता वर्ग खोल्या नसणे, खोल्यामध्ये लाईटची व पंख्याची सोय नसणे. | प्रत्येक निवासी छात्रास किमान २४ चौ. फूट ते कमाल ४० चौ. फूट या प्रमाणात शयन व भोजनासाठी जागा उपलब्ध असणे आवश्यक आहे. | अनुजा वसतिगृहातच्या इमारतीमध्ये फक्त वसतिगृह सुरू आहे. त्या ठिकाणी शाळा नाही. त्यामुळे तेथे वर्ग खोल्या नाहीत. |

**माहिती**---चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ५ | समोरच विद्यार्थ्यांना आंघोळ करावी लागणे. | इमारतीमध्ये शौचालय व स्नानगृहे पुरेशा प्रमाणात उपलब्ध असावीत. सध्या १० विद्यार्थ्यांना एक स्नानगृह व एक शौचालय असणे अपेक्षित आहे. | इमारती मधील सर्व खोल्यामध्ये विजेची व पंख्याची सोय करण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांच्या निवासासाठी १०X११ फुटाच्या ६ खोल्या असून ४ शौचालय व ५ स्नानगृह (न्हाणी घर) उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. व १ खोलीमध्ये स्वयंपाक घर व १ खोली धान्यकोठीसाठी वापरण्यात येते. |

मागासवर्गीय अनुदानित वसतिगृहांची तपासणी जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद व त्यांच्या कार्यालयांतर्गत येणाऱ्या समाजकल्याण निरीक्षक यांच्याकडून केली जाते. तसेच विशेष मोहिमेअंतर्गत सुद्धा सदर वसतीगृहांची तपासणी केली जाते. यापूर्वी सन २००९-१० मध्ये अनुदानित वसतिगृहांची विशेष तपासणी मोहिम घेण्यात आली होती. यामध्ये विविध त्रुट्या आढळल्यामुळे 'ड' वर्गात समाविष्ट झालेल्या २८ वसतीगृहांची मान्यता रद्द करण्यात आलेली आहे.

वरील दोन्ही वसतिगृहांना सन २००८ ते २०११-१२ या कालावधीत श्री.पी.एस.कवटे, तत्कालीन जिल्हा समाज कल्याण अधिकारी, श्री.प्रमोद फडणवीस, समाज कल्याण निरीक्षक, श्री.एस.एफ. आळंकुटे, समाजकल्याण निरीक्षक व श्री.बी.आर.म्हस्के, वरिष्ठ सहाय्यक यांनी भेटी दिलेल्या आहेत. सदर तपासणी अधिकाऱ्यांनी भेटी दरम्यान सदर वसतीगृहांच्या व्हिजीट बुक मध्ये त्रुटी न दाखविल्यामुळे त्यांना दिनांक १-९-२०१२ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. याबाबतचा संबंधितांकडून खुलासा न आल्याने त्यांना पुन:श्च दिनांक ३१-१२-२०१२ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या. सदर कर्मचाऱ्यांकडून याबाबत योग्य प्रतिसाद मिळत नसल्याने त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्यासंदर्भातील प्रस्ताव प्रादेशिक उपायुक्त, पुणे यांच्याकडे प्रलंबित आहे.

मागासवर्गीय अनुदानीत वसतीगृहात त्रुटी आढळुन आल्याने संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडून संस्थेस कारणे दाखवा नोटीस दिली जाते. त्यास अनुसरु?न संस्थेने त्रुटीची पुर्तता न केल्यास सदर वसतीगृहाची मान्यता रद्द करण्यासाठी पूर्व परवानगी घेण्याकरीता आयुक्त समाजकल्याण, पुणे यांच्याकडे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडून प्रस्ताव सादर केला जातो. आयुक्त समाजकल्याण पुणे यांनी परवानगी दिल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडून वसतीगृहाची मान्यता रद्द करण्यात येते. मागासवर्गीय अनुदानीत वसतीगृहांवर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे नियंत्रण असते.

अनुदानित वसतीगृहातील विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारची सुविधा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर विद्यार्थ्यांना गाद्या, उशा, चादर, ब्लँकेट, नाईट ड्रेस, पत्र्याच्या पेट्या, संगणक, प्रिंटर, जीवनसत्व युक्त औषधे् इत्यादी बाबींचा पुरवठा करण्यात आलेला आहे. सदर सुविधा वसतीगृहातील प्रवेशितांना मिळत असल्याबाबत जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडून नियंत्रण ठेवले जाते.

विभागीय साक्षीच्या वेळी  समितीला पुरविण्यात  आलेल्या उपरोक्त माहितीच्या अनुषंगानेसमितीने पुणे येथील समाजकल्याण विभागाच्या अंतर्गत असलेल्या गंगाई मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, फुरसंगी, पुणे व अनुजा मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह, लोणी काळभोर, पुणे येथील वसतिगृहाची पाहणी केली असता समितीला वसतिगृहामध्ये १०० टक्के विद्यार्थी उपस्थित नसणे, विद्यार्थ्यांना स्वत: साहित्य आणावे लागणे, विद्यार्थ्यांना पुरेल एवढे अन्न शिजवलेले नसणे, इमारतीमध्ये पहिली ते पाचवी इयत्तांच्या वर्गखोल्या नसणे, खोल्यांमध्ये लाईटची व पंख्यांची सोय नसणे, शौचालय खराब असणे व त्यासमोरच त्यांना आंघोळ करावी लागणे इ.त्रुटी समितीला आढळून आल्या होत्या.  त्या सर्व त्रुटींचे आता निराकरण झाले आहे काय अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी समितीला ज्या त्रुटी आढळून आल्या होत्या त्या त्रुटींचे निराकरण करण्यात आले असून वसतिगृहांची तपासणी करण्यात आली असून वसतिगृहाची इमारत बदलण्यात आलेली आहे. वसतिगृहासाठी भाड्याने दुसरी इमारत घेण्यात आली असून त्या ठिकाणी वसतिगृह सुरू करण्यात आलेले आहे. अनुजा वसतिगृहाचे रिनोव्हेशनचे काम पूर्ण झाले असून आता वसतिगृहाच्या संदर्भातील कोणतीही तक्रार शिल्लक नसल्याचे समितीला स्पष्ट केले.

**अभिप्राय व शिफारशी :-**

अनुसूचित जाती कल्याण समितीने दिनांक २२ ऑगस्ट, २०१२ रोजी शासकीय अनुदानित वसतिगृहांपैकी पुणे येथील (१) महर्षि कर्वे स्त्री शिक्षणसंस्थेचे महिला वसतिगृह, (२) गंगाई मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, सर्व्हे नं.२१५, कॅनॉललगत, गंगाईनगर, फुरसुंगी, ता.हवेली व (३) अनुजा मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, सर्व्हे नं.९, कदम वाकवसी (घोरपडेमळा), लोणीकाळभोर, ता.हवेली या तीन वसतिगृहास भेट देऊन पाहणी केली.

समितीला पाहणी करताना असे निदर्शनास आले की, महर्षि कर्वे स्त्री-शिक्षण संस्थेच्या महिला वसतिगृहात विद्यार्थीनीची गुणवत्ता व कौटुंबिक परिस्थिती पाहून संस्थेत प्रवेश दिला जातो. विद्यार्थिनींना सकाळची न्याहारी तसेच दोन वेळा चौरस आहाराचे भोजन दिले जाते. संस्थेमध्ये शिक्षण घेतलेल्या अनेक माजी विद्यार्थीनी संस्थेस भेट देऊन मदत करतात. तसेच संस्थेतील विद्यार्थीनी दिवाळी सुट्टी दरम्यान भाऊबीज निधी इतरांकडून जमा करतात, भाजीपाल्यांच्या टाकाऊ वस्तूंपासून गॅसनिर्मिती करून त्याच गॅसवर संस्थेतील सर्वांचे जेवण तयार करण्यात येत असल्याने एक उत्कृष्ट असा कौतुकास्पद उपक्रम राबविल्याबद्दल संस्थेच्या एकूण कार्यक्रमाबद्दल समिती समाधान व्यक्त करीत आहे.

**महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या महिला वसतिगृहास सद्य:स्थितीत निवासी स्त्री अधिक्षिकांची व पहारेकऱ्यांची आवश्यकता असल्याने त्यानुषंगाने शासनाने लक्ष देऊन तातडीने उपाययोजना करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

तसेच समितीने दिनांक २२ ऑगस्ट, २०१२ रोजी गंगाई मागासवर्गीय वसतिगृह व अनुजा मागासवर्गीय वसतिगृहास दिलेल्या भेटीच्या वेळी समितीला आढळून आलेल्या त्रुटी विभागाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर समाजकल्याण विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून दिनांक ३ सप्टेंबर, २०१३ रोजी वसतिगृहास भेट देऊन पाहणी करणे ही बाब अत्यंत गंभीर आहे. सदर अधिकाऱ्यांनी यापूर्वीच भेट देऊन कार्यवाही करण्याची आवश्यकता होती. वसतिगृहाच्या व्हिजीट बुक मध्ये त्रुटी न दाखविल्याने त्यांना दिनांक १ सप्टेंबर, २०१२ रोजी कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात येणे, त्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून खुलासा न आल्याने त्यांना पुन:श्च दिनांक ३१ डिसेंबर, २०१२ रोजी

कारणे दाखवा नोटीस बजावून देखील अशा अधिकाऱ्यांकडून योग्य प्रतिसाद न मिळाल्याने त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्यासंदर्भात प्रस्ताव प्रादेशिक उपायुक्त, पुणे यांच्याकडे प्रलंबित असणे. समिती याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे. समितीने वसतिगृहांना भेट देऊन पाहणी केली असता आढळून आलेल्या त्रुटी विभागाच्या निदर्शनास आणल्यानंतर त्यावर समाजकल्याण विभागाचे संबंधित अधिकाऱ्यांनी एक वर्षानंतर त्या वसतिगृहाची पाहणी करून त्या वसतिगृहातील त्रुटीसंदर्भात व्हिजीट बुकात नोंद न करणे उलटपक्षी समितीने उपस्थित केलेल्या त्रुटी निरर्थक असल्याची माहिती समितीला देणे म्हणजे समितीने निदर्शनास आणलेल्या त्रुटी ह्या खोट्या असल्याचे सिद्ध होते. सदर बाब योग्य नसून समितीने निदर्शनास आणलेल्या बाबीनुसार संबंधित वसतिगृह चालकांविरुध्द विभागामार्फत दंडात्मक कार्यवाही करण्यात येऊन अशा वसतिगृहाची मान्यता रद्द होण्याची गरज असल्याचे समितीचे मत आहे.

तरी याबाबत सामाजिक न्याय विभागामार्फत उपरोक्त **दोन्ही वसतिगृहासंबंधी समितीला आढळून आलेल्या त्रुटीसंदर्भात वसतिगृहातील विद्यार्थ्यांना सोयी-सुविधा मिळण्याच्या दृष्टीने त्रुटीची पूर्तता करणे व वसतिगृहाच्या चालकावर दंडात्मक कार्यवाही करून त्या वसतीगृहाची मान्यता रद्द करणे. तसेच याप्रकरणी संबंधित असलेले समाज कल्याण विभागाचे तपासणी अधिकारी व समाजकल्याण निरीक्षक आणि वरिष्ठ सहाय्यक यांच्या विरुध्द कारवाई करण्यासंदर्भातील प्रादेशिक उपायुक्त, पुणे यांच्याकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावावर निर्णय घेऊन त्याची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

# परिशिष्ट - एक

## सहकार आयुक्तालय, पुणे यांचेकडून समितीला प्राप्त झालेली माहिती

## परिशिष्ट - ७

| गट | मंजुर पदे | भरलेली पदे | | | अनुसूचित जातीसाठी आवश्यक आरक्षण(१३%) | | | पैकी अनुसूचित जातीची भरलेली पदे | | | अनुसूचतीत जातीची पदे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सरळ | पदोन्नती | एकूण | सरळ | पदोन्नती | एकूण | सरळ | पदोन्नती | एकूण | सरळ | पदोन्नती | सरळ |
| गट-अ | ३२३ | ८२ | १८७ | २६९ | १७ | २७ | ४४ | १२ | २६ | ३८ | ५ | १ | ६ |
| गट-ब | ६३६ | २३४ | ३१८ | ५५२ | ४२ | ४३ | ८५ | २८ | ४३ | ७१ | १४ | ० | १४ |
| गट-क | ६६८३ | २०१४ | ३२४० | ५२५४ | ३४५ | ५२७ | ८७२ | २६९ | ४२१ | ६९० | ७६ | १०६ | १८२ |
| गट-ड | १५४१ | १३१७ | ६६ | १३८३ | १८९ | ९ | १९८ | १७५ | ९ | १८४ | १४ | ०० | १४ |
| एकूण | ९१८३ | ३६४७ | ३८११ | ७४५८ | ५९३ | ६०६ | ११९९ | ४८४ | ४९९ | ९८३ | १०९ | १०७ | २१६ |

**अ) सहकार खात्यातील प्रशासन व लेखापरीक्षण विभागातील गट अ चे अधिका-यांची अ.जाती बाबतची एकत्रित सन२००९ ते २०१२ पर्यंतची माहिती खालीलप्रमाणे-**

| गट | मंजूर पदे | भरलेली पदे | | | अनु.जातीसाठी आवश्यक आरक्षण (१३%) | | | पैकी अनु.जातीची भरलेली पदे | | | अनु जातीची रिक्त पदे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सरळ | पदो | एकूण | सरळ | पदो | एकूण | सरळ | पदो | एकूण | सरळ | पदो | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| प्रशासन गट अ | १६७ | ५८ | १०० | १५८ | ०८ | १५ | २३ | ०८ | १४ | २२ | -- | ०१ | ०१ |

**प्रशासन विभाग- गट अ मध्ये १) अपर आयुक्त /पणन संचालक, २) अपर निबंधक, ३) सहनिबंधक ४) उपनिबंधक या संवर्गाचा समावेश होतो.**

**सहकार खात्याचा आकृतीबंध शा नि क्र राजस १००८/प्र.क्र.५३८/५स दि.५/५/२०११ अन्वये मंजूर झालेला आहे. त्यानुसार प्रशासन गट अ मध्ये एकूण मंजूर पदे १६७ आहेत.**

**१. अपर आयुक्त /पणन संचालक या संवर्गात अ.जातीचा १ पदाचा अनुशेष बाकी आहे. सदरचा अनुशेष पदोन्नती कोटयातील आहे.**

**पदोन्नती कोटा-** गट अ मध्ये अपर आयुक्त /अपर निबंधक /सहनिबंधक या संवर्गातील सर्व पदे सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार गुणवत्तेनुसार व सेवाजेष्ठतेनुसार आरक्षण धोरण लागू करण्यापूर्वी भरण्यात येत होती. सा.प्र.वि शा.नि.क्र.बीसीसी २००१/१८८७/प्र.क्र.६४/०१, १६ब दि.२५/५/२००४ अन्वये या संवर्गाना दि २९/१/२००४ पासून पदोन्नतीच्या सर्व टप्यांना /संवर्गाना आरक्षण लागू करण्यात आलेले आहे. त्यानुसार सहकार खात्यातील प्रशासन विभागातील रिक्त झालेली सर्व पदे शासनाचे आरक्षणाचे धोरणानुसार भरण्यात आलेली आहेत.

**गट अ मध्ये अपर आयुक्त व विशेष निबंधक/पणन संचालक मंजुर पदे २ (वेतनश्रेणी रु ३७४००-६७०००(ग्रे पे ८८००)/**

या संवर्गात अ.जातीच्या १ पदाचा अनुशेष बाकी आहे. याबाबतचा पदोन्नती प्रस्ताव या कार्यालयाचे दि.१८/१०/११ अन्वये शासनास सादर करण्यात आलेला आहे. याबाबतची अंतीम कार्यवाही शासन पातळीवर चालू आहे.

**२. अपर निबंधक सह संस्था मंजुर पदे ५ (वेतनश्रेणी रु ३७४००-६७०००(ग्रे पे ८७००)/**

या संवर्गातील सर्व पदे सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार पदोन्नतीने भरली जातात. या संवर्गातील सर्व पदे पदोन्नतीने भरण्यात आलेली आहेत.अपर निबंधक संवर्गात आरक्षणाच्या धोरणानुसार अ.जातीसाठी एक पद येते. श्री.बी.के.त्रिभुवन , एस बी पाटील हे दोन अधिकारी अ.जातीचे कार्यरत आहेत.

**३. सहनिबंधक सह संस्था- मंजुर पदे २८(वेतनश्रेणी रु १५६००-३९१००(ग्रे पे ६६००)/**संवर्गात आरक्षणाच्या धोरणानुसार एम आर मोरे सी जी कर्डक, ए व्ही गाडे, एम व्ही भालेराव हे ४ अधिकारी कार्यरत आहेत.

**४. उपनिबंधक सह संस्था- मंजुर पदे १३२ (वेतनश्रेणी रु १५६००-३९१००(ग्रे पे ६६००)/**

संवर्गात आरक्षणाच्या धोरणानुसार १३% प्रमाणे ९ पदे आवश्यक. सर्व पदे पदोन्नतीने भरण्यात आलेली आहेत.

**सरळसेवा कोटा-**सेवाप्रवेश नियमानुसार उपनिबंधक संवर्गात सरळसेवा प्रमाण ५०% व पदोन्नती प्रमाण ५०% असे विहीत केलेले आहे. या संवर्गातील सरळसेवा कोटयातील अनु.जातीची १३% प्रमाणे ८ पदे येतात. सरळसेवेच्या कोटयातील अ.जातीची सर्व पदे भरण्यात आलेली आहे.

| गट | मंजूर पदे | भरलेली पदे | | | अनु.जातीसाठी आवश्यक आरक्षण (१३%) | | | पैकी अनु.जातीची भरलेली पदे | | | अनु जातीची रिक्त पदे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सरळ | पदो | एकूण | सरळ | पदो | एकूण | सरळ | पदो | एकूण | सरळ | पदो | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| लेखापरीक्षण गट अ | १५६ | २४ | ८७ | १११ | ०९ | १२ | २१ | ०४ | १२ | १६ | ०५ | -- | ०५ |

लेखापरीक्षण विभाग गट अ मध्ये १) अपर निबंधक,(ले.प) २) सहनिबंधक (ले प) ३)विशेष लेखापरीक्षक वर्ग १ या संवर्गाचा समावेश होतो.

सहकार खात्याचा आकृतीबंध शा नि क्र राजस १००८/प्र.क्र.५३८/५स दि.५/५/२०११ अन्वये मंजूर झालेला आहे. त्यानुसार प्रशासन गट अ मध्ये एकूण मंजूर पदे १५६ आहेत. पदोन्नती कोटयात अ.जातीच्या पदाचा सर्व अनुशेष भरण्यात आला आहे.

**पदोन्नती कोटा-** गट अ मध्ये अपर निबंधक /सहनिबंधक या संवर्गातील सर्व पदे सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार गुणवत्तेनुसार व सेवाजेष्ठतेनुसार आरक्षण धोरण लागू करण्यापूर्वी भरण्यात येत होती. सा.प्र.वि शा.नि.क्र.बीसीसी २००१/१८८७/प्र.क्र.६४/०१, १६ब दि.२५/५/२००४ अन्वये या संवर्गांना दि २९/१/२००४ पासून पदोन्नतीच्या सर्व टप्यांना /संवर्गांना आरक्षण लागू करण्यात आलेले आहे. त्यानुसार सहकार खात्यातील लेखापरीक्षण विभागातील रिक्त झालेली सर्व पदे शासनाचे आरक्षणाचे धोरणानुसार भरण्यात आलेली आहेत

**अपर निबंधक (ले.प) -) मंजुर पदे २ , (वेतनश्रेणी रु ३७४००-६७०००(ग्रे पे ८७००)/**
संवर्गात श्री.एस बी उमेश हेअधिकारी अ.जातीचे कार्यरत आहेत.

**सहनिबंधक (ले.प) मंजुर पदे १५ (वेतनश्रेणी रु १५६००-३९१००(ग्रे पे ६६००)**/संवर्गात डी एन कांबळे, त्रिमुखे अ.जातीचे हे दोन अधिकारी कार्यरत आहेत.

**विशेष लेखापरीक्षक वर्ग १- मंजुर पदे १३९ (वेतनश्रेणी रु १५६००-३९१००(ग्रे पे ६६००)-** संवर्गात पदोन्नती कोटयातील अ.जातीची १३ % प्रमाणे येणारी ९ पदे पदोन्नतीने भरण्यात आलेली आहेत. सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार या संवर्गातील ५०%पदे सरळसेवा व ५०% पदे पदोन्नतीने भरली जातात.

**सरळसेवा कोटा- विशेष लेखापरीक्षक वर्ग १ मध्ये सरळसेवेच्या कोटयात ५ पदांचा अनुशेष /आरक्षण आहे.** विशेष लेखापरीक्षक वर्ग १ चे सन २०११चे २८ पदांचे लोकसेवा आयोगाचे व अति संवर्ग कक्षाचे ८ पदांचे मागणीपत्र या कार्यालयाचे पत्र जा.क्र.आस्था/कक्षर/विलेपवर्ग १/सुधामा.पत्र/११, दि ३/२/२०११ अन्वये शासनास सादर करण्यात आलेले आहे. सदर मागणीपत्रामध्ये **अ.जातीचे ३ पदांचा** समावेश आहे. सदरचे मागणीपत्र शासन प.क्र.राजस १५१०/प्र.क्र.३८७/५स दि ३१/३/२०११ अन्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला पाठविलेले आहे. त्यापुढील सन २०१२ चे १० पदांचे व अति संवर्ग कक्षाचे ३ पदांचे मागणीपत्र या कार्यालयाचे जा क्र आस्था/कक्षर/विलेपवर्ग१/सुधामापत्र१२/दि १७/१०/२०१२ अन्वये शासनास सादर करण्यात आलेले आहे. त्यामध्ये **अ.जातीचे २ पदांचा** समावेश आहे. अशी सरळसेवा कोटयात अ.जातीची ५ पदे रिक्त आहेत याबाबत पुढील कार्यवाही शासन पातळीवर चालू आहे.

१)वैदयनाथन समितीने केलेल्या शिफारशी केंद्र शासनाने स्विकृत केलेल्या आहेत. त्या शिफारशी अंमलात आल्या नंतर राज्यातील सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व विविध कार्यकारी सहकारी संस्था, या संस्थांचे लेखापरीक्षण सहकार खात्याच्या लेखापरीक्षकांऐवजी सनदी लेखापाल व प्रमाणित लेखापरीक्षण यांनी करावयाचे आहे. त्यानुसार सहकार खात्याच्या लेखापरीक्षकांची राज्यातील सहकारी बँका,यांची लेखापरीक्षणातील पदे कमी करण्यात आलेली आहेत.

२)राज्य घटनेतील (Constitution) ९७ व्या दुरुस्तीनुसार सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण शासनाने निर्माण केलेल्या सनदी व प्रमाणित लेखापरीक्षकांच्या पॅनेलमधील लेखापरीक्षकांचेकडून संस्थांनी लेखापरीक्षण करुन घ्यावयाचे आहे. त्यामुळे सहकार खात्यातील लेखापरीक्षणाकडील कामकाज हळूहळू कमी करणे अपेक्षीत आहे.

वर नमूद केलेल्या बाबीमुळे सहकार खात्यातील लेखापरीक्षण विभागाकडील विशेष लेखापरीक्षक वर्ग १ व विशेष लेखापरीक्षक वर्ग २ मधील सरळसेवा कोटयातील सर्वच पदे भरण्याबाबत अडचणी निर्माण झालेल्या आहेत.

**गट ब**

| गट | मंजूर पदे | भरलेली पदे | | | अनु.जातीसाठी आवश्यक आरक्षण (१३%) | | | पैकी अनु.जातीची भरलेली पदे | | | अनु जातीची रिक्त पदे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सरळ | पदो | एकुण | सरळ | पदो | एकुण | सरळ | पदो | एकुण | सरळ | पदो | एकुण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| प्रशासन गट ब | ४५० | २०६ | २२५ | ४३१ | ३० | ३१ | ६१ | २६ | ३१ | ५७ | ०४ | --- | ०४ सरळसेवा कोटयातील रिक्त पदे |

**प्रशासन विभाग गट ब- मध्ये सहा.निबंधक सह संस्था** (वेतनश्रेणी रु ९३००-३४८००(ग्रे पे ४४००)/ **या एकाच संवर्गाचा समावेश आहे.**

**सहकार खात्याचा आकृतीबंध शा नि क्र राजस १००८/प्र.क्र.५३८/५स दि.५/५/२०११ अन्वये मंजूर झालेला आहे. त्यानुसार प्रशासन गट ब मध्ये एकुण मंजूर पदे ४५० आहेत. पदोन्नती कोटयात अ.जातीच्या पदाचा सर्व अनुशेष भरण्यात आला आहे.**

सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार सरळसेवा कोटा ५० %व पदोन्नती कोटा ५० % असे प्रमाण आहे. पदोन्नती कोटयातील सहाय्यक निबंधक संवर्गातील अनु.जातीची १३% प्रमाणे येणारे आरक्षण पुर्णपणे भरण्यात आलेले आहे.

**सरळसेवा कोटा- सरळसेवेत अ.जातीची ४ पदांचा अनुशेष/आरक्षण बाकी आहे.**

सन २०१२ चे लोकसेवा आयोगाचे १० पदांचे मागणीपत्र आहे. त्यामध्ये **अ.जातीचे १** पदाचा समावेश आहे. अतिरिक्त संवर्ग कक्षाचे ४ पदांचे मागणीपत्र आहे त्यामध्ये **अ.जातीचे १** पदाचा समावेश आहे. सदरचे मागणीपत्र या कार्यालयाचे जा.क्र.आस्था/कक्ष१/सहनि/मा.पत्र-१२/११, दि.१३/१०/११ अन्वये शासनास सादर करण्यात आलेला आहे.

सहाय्यक निबंधकांमध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून /शासनामार्फत सन २००९ ते २०१२ या कालावधीत १७ अ.जातीचे उमेदवार उपलब्ध झालेले आहेत. त्यापैकी श्री.केशव राऊत हे दि ८/९/११ व श्री.गजभिये हे दि २३/११/११ हे **अ.जातीचे दोन उमेदवार खाते सोडून गेल्याने** अ.जातीची दोन पदे रिक्त झालेली आहेत. या रिक्त झालेल्या पदांचा समावेश सन २०१३ चे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे मागणीपत्रात करण्यात आलेला आहे. सन २०१३ चे लोकसेवा आयोगाचे १२ पदांचे मागणीपत्रात **अ.जातीचे १ पद** व अति संवर्ग कक्षाचे २ पदांचे मागणी पत्रात **अ.जातीचे १ पद** असे एकूण अ.जातीच्या २ पदांची मागणी शासनास या कार्यालयाचे जा.क्र.आस्था/कक्ष१/सह.नि/मा.पत्र-१३/१२, दि १८/६/२०१२ अन्वये शासनास सादर करण्यात आलेले आहे.

**लेखापरीक्षण**

| गट | मंजूर पदे | भरलेली पदे | | | अनु.जातीसाठी आवश्यक आरक्षण (१३%) | | | पैकी अनु.जातीची भरलेली पदे | | | अनु जातीची रिक्त पदे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सरळ | पदो | एकूण | सरळ | पदो | एकूण | सरळ | पदो | एकूण | सरळ | पदो | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| लेखापरीक्षण गट ब | १८६ | २८ | ९३ | १२२ | १२ | १२ | २४ | ०२ | १२ | १४ | १० | -- | १० सरळसेवा कोटयातील रिक्त पदे |

**लेखापरीक्षण विभाग गट ब- मध्ये विशेष लेखापरीक्षक वर्ग २(वेतनश्रेणी रु ९३००-३४८००(ग्रे पे ४४००)/ या एकाच संवर्गाचा समावेश आहे. सहकार खात्याचा आकृतीबंध शा नि क्र राजस १००८/प्र.क्र.५३८/५स दि.५/५/२०११ अन्वये मंजूर झालेला आहे. त्यानुसार लेखापरीक्षण गट ब मध्ये एकूण मंजूर पदे १८६ आहेत. पदोन्नती कोटयात अ.जातीच्या पदाचा सर्व अनुशेष भरण्यात आला आहे.**

**विशेष लेखापरीक्षक वर्ग २ गट ब-** सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार सरळसेवा कोटा ५०% व पदोन्नती कोटा ५०% असे प्रमाण आहे. पदोन्नती कोटयातील विशेष लेखापरीक्षक वर्ग २ संवर्गातील अनु.जातीची १३% प्रमाणे येणारे आरक्षण पुर्णपणे भरण्यात आलेले आहे.

**सरळसेवा कोटा- विशेष लेखापरीक्षक वर्ग २ गट ब १० पदांचा अनुशेष बाकी आहे.**

सन २०११ चे ६० पदांचे लोकसेवा आयोगाचे मागणीपत्र या कार्यालयाचे जा.क्र.आस्था/कक्ष१/विलेपवर्ग२/मा.पत्र-११/१०, दि२३/१२/१०अन्वये शासनास सादर करण्यात आलेले आहे. त्यामध्ये अ.जातीचे ८ पदांचा समावेश आहे. तर पुढील सन २०१२ चे ४ पदांचे लोकसेवा आयोगाचे व अति संवर्ग कक्षाचे १ पदांचे मागणीपत्र या कार्यालयाचे जा.क्र.आस्था/ कक्ष१ /विलेपवर्ग२ /मा. पत्र-१२/११, दि २०/१०/११अन्वये शासनास सादर करण्यात आलेले आहे. त्यात अ.जातीचे २ पदांचा समावेश आहे. याबाबतची कार्यवाही शासन पातळीवर चालू आहे

१)वैदयनाथन समितीने केलेल्या शिफारशी केंद्र शासनाने स्विकृत केलेल्या आहेत. त्या शिफारशी अंमलात आल्या नंतर राज्यातील सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व विविध कार्यकारी सहकारी संस्था, या संस्थांचे लेखापरीक्षण सहकार खात्याच्या लेखापरीक्षकांऐवजी सनदी लेखापाल व प्रमाणित लेखापरीक्षण यांनी करावयाचे आहे. त्यानुसार सहकार खात्याच्या लेखापरीक्षकांची राज्यातील सहकारी बँका,यांची लेखापरीक्षणातील पदे कमी करण्यात आलेली आहेत.

२)राज्य घटनेतील (Constitution) ९७ व्या दुरुस्तीनुसार सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण शासनाने निर्माण केलेल्या सनदी व प्रमाणित लेखापरीक्षकांच्या पॅनेलमधील लेखापरीक्षकांचेकडून संस्थांनी लेखापरीक्षण करुन घ्यावयाचे आहे. त्यामुळे सहकार खात्यातील लेखापरीक्षणाकडील कामकाज हळुहळू कमी करणे अपेक्षीत आहे.

वर नमूद केलेल्या बाबींमुळे सहकार खात्यातील लेखापरीक्षण विभागाकडील विशेष लेखापरीक्षक वर्ग १ व विशेष लेखापरीक्षक वर्ग २ मधील सरळसेवा कोटयातील सर्वच पदे भरण्याबाबत अडचणी निर्माण झालेल्या आहेत.

**गट-क** संवर्गातील पदे सहकार आयुक्त कार्यालय व क्षेत्रिय १६ विभागीय कार्यालयांकडून नियुक्ती, पदोन्नती इत्यादी कामकाज होत असल्याने स्वतंत्र विभागवार तक्ता खालील प्रमाणे :-

**गट- क**

| अ. क्र. | विभाग | विभागातील एकुण मंजूर पदे | | त्यापैकी अनु. जातीसाठी राखीव असलेली पदे | | त्यापैकी अनु. जातीची भरलेली पदे | | त्यापैकी अनु. जातीची रिक्त पदे | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सरळ सेवा | पदो न्नती | सरळ सेवा | पदोन्नती | सरळ सेवा | पदोन्नती | सरळ सेवा | पदोन्नती |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | **प्रशासन कक्ष** | | | | | | | | |
| १ | मुंबई | ९८ | १५७ | १२ | २१ | १२ | १९ | १ | २ |
| २ | कोकण | ९७ | १७७ | १३ | २४ | ११ | १५ | २ | ९ |
| ३ | नाशिक | २११ | ३२० | २७ | ४२ | २० | ३९ | ७ | ३ |
| ४ | पुणे | १२८ | १९३ | १७ | २६ | १३ | २२ | ४ | ४ |
| ५ | कोल्हापूर | १२६ | २१९ | १० | ३५ | ७ | २७ | ३ | ८ |
| ६ | औरंगाबाद | ११९ | १८८ | १६ | २४ | १४ | १५ | २ | ९ |
| ७ | लातूर | १४७ | २६३ | २० | ३६ | १४ | १७ | ६ | १९ |
| ८ | अमरावती | १४२ | २४५ | १९ | ३२ | १४ | २२ | ५ | १० |
| ९ | नागपूर | १६९ | ३११ | २३ | ४१ | २१ | ३६ | २ | ५ |
| १० | मुख्यालय | ११८ | १९५ | १४ | २५ | ११ | १६ | ३ | ९ |
| **एकुण - प्रशा** | | **१३५५** | **२२६८** | **१७२** | **३०६** | **१३७** | **२२८** | **३५** | **७८** |
| | **लेखा परिक्षण** | | | | | | | | |
| १ | मुंबई | २३१ | २०८ | ३० | २७ | २५ | २७ | ५ | ० |
| २ | नाशिक | ३०२ | ३७६ | ४० | ४८ | २७ | ४० | १३ | ८ |
| ३ | पुणे | ३२८ | ४६५ | ४४ | ६० | ३१ | ५६ | १३ | ४ |
| ४ | औरंगाबाद | १९२ | २९० | २५ | ३८ | १७ | २७ | ८ | ११ |
| ५ | अमरावती | १४५ | २०१ | १९ | २५ | १७ | २१ | २ | ४ |
| ६ | नागपूर | १३० | १८२ | १५ | २३ | १५ | २२ | ० | १ |
| **एकुण- लेप** | | **१३३८** | **१७२२** | **१७३** | **२२१** | **१३२** | **१९३** | **४१** | **२८** |
| **एकुण प्रशा+लेप** | | **२६९३** | **३९९०** | **३४५** | **५२७** | **२६९** | **४२१** | **७६** | **१०६** |

गट-क :-

**सरळसेवा -** शासन निर्णय वित्त विभाग दिनांक ५.६.२०१० च्या शासन निर्णयानुसार गट - क व गट - ड संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरिता एक वर्षाच्या कालावधीसाठी शासनाने निर्बंध घातले होते. शासन निर्णय दिनांक ३०.६.२०११ अन्वये सदरचे निर्बंध एक वर्षासाठी वाढविण्यात आले. त्यानंतर शासनाने शासन निर्णय वित्त विभाग दिनांक २९.११.२०१० नुसार ज्या संवर्गामध्ये रिक्त पदांचा अनुशेष मोठ्या प्रमाणावर आहे किंवा गट क व ड संवर्गाची पदे भरण्याची तातडीची गरज आहे अशा बाबतीत रिक्त पदे भरण्यास मान्यतेसाठी प्रस्ताव संबंधीत प्रशासकीय विभागाने पूर्ण समर्थनासह सादर करावा अशा सूचना दिल्या असल्याने या कार्यालयाने दिनांक २६.९.२०११ च्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. याबाबत दिनांक १०.१०.२०११ रोजी शासन स्तरावर बैठक होऊन त्यानुसार शासनाने दिनांक १८.१०.२०११ चे पत्रान्वये सहकार विभागातील प्रशासन व लेखापरिक्षण विभागातील गट क व ड संवर्गातील एकत्रित सन २०११ मध्ये ७४५ इतकी व २०१२ मध्ये ३४९ इतकी अशी एकुण १०९४ इतकी रिक्त पदे भरण्यास मान्यता दिलेली होती. त्यानुसार दिनांक २६.१२.२०११ रोजी वर्ग -३ संवर्गातील एकुण ७७८ इतकी रिक्त पदे भरण्यासाठी जाहीरात विभाग स्तरावरुन देण्यात येऊन एकत्रित सरळसेवा भरती प्रक्रीया सन २०११-१२ मध्ये राबविण्यात आली होती. त्यानुसार गट-क संवर्गातील एकुण ७४ अनुसूचित जाती प्रवर्गातील आणि वर्ग-ड संवर्गातील एकुण २४ अनुसूचित जाती प्रवर्गातील रिक्त पदांची जाहीरात देण्यात येऊन पदे भरण्यात आलेली आहेत.

**गट-क** संवर्गातील अनुसूचित जाती प्रवर्गातील **सरळसेवा कोटयातील** दिनांक ३१.३.२०१२ अखेर रिक्त पदे राहण्याची कारणे खालील प्रमाणे :-

| अ. क्र. | विभाग | दि.३१.३.१२ रोजीची अनुसूचित जाती प्रवर्गातील सरळसेवेची रिक्त पदे | त्यापैकी १.४.१२ ते १५.८.१२ पर्यंत भरलेली पदे | MPSC कडे मागणी केलेली पदे | सन २०११-१२ च्या सरळसेवा भरती प्रक्रियेत उपलब्ध न झालेली पदे | सन २०११-१२ च्या सरळसेवा भरतीच्या जाहिराती नंतर रिक्त झालेली पदे | सन २०११-१२ च्या सरळसेवा भरती प्रक्रिये अंतर्गत कागदपत्रे तपासणी साठी पाठविलेली पदे | सरळसेवा भरती प्रक्रिये अंतर्गत उमेदवारांना नियुक्ती आदेश देऊनही हजर झालेले नाहीत अशी पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | **प्रशासन** | | | | |
| १ | मुंबई | ०१ | - | ०१ | - | - | - | - |
| २ | कोकण | ०२ | ०१ | - | ०१ | - | - | - |
| ३ | नाशिक | ०७ | - | - | - | ६ | १ | - |
| ४ | पुणे | ०४ | - | - | १ मा.से. | ०३ | - | - |
| ५ | कोल्हापूर | ०३ | - | - | - | - | - | ३* |
| ६ | औरंगाबाद | ०२ | ० | ० | ० | ०२ | - | - |
| ७ | लातूर | ०६ | - | - | ०१ | ०५ | - | - |
| ८ | अमरावती | ०५ | - | - | ०१ मा.से. | ०४ | - | - |
| ९ | नागपूर | ०२ | - | - | - | २ | - | - |
| १० | मुख्यालय | ०३ | ०१ | - | ०२ | - | - | - |
| | एकुण (प्रशा) | ३५ | ०२ | ०१ | ६ | २२ | ०१ | ०३ |
| | | | | **लेखापरिक्षण** | | | | |
| १ | मुंबई | ०५ | - | - | - | ६ | - | ० |
| २ | नाशिक | १३ | - | - | ५ | ४ | २ | २ |
| ३ | पुणे | १३ | - | - | ५ | ७ | - | १ न्याय प्रविष्ठ |
| ४ | औरंगाबाद | ६ | - | - | - | ६ | - | - |
| ५ | अमरावती | २ | - | - | - | १ | - | १ |
| ६ | नागपूर | २ | २ | - | - | - | - | - |
| | एकुण(लेप) | ४१ | २ | - | १० | २४ | २ | ४ |
| ७ | एकुण प्र.+ले | ७६ | ४ | १ | १६ | ४६ | ३ | ७ |

* कोल्हापूर (प्रशा) - अन्य खात्यात नियुक्ती झाल्याने स्वेच्छा राजीनामा दिला आहे .

**पदोन्नती गट-क** :- संवर्गातील अनुसूचित जाती प्रवर्गातील पदोन्नती कोटयातील दिनांक ३१.३.२०१२ अखेर रिक्त पदे राहण्याची कारणे खालील प्रमाणे :-

| अ. क्र | विभाग | दि.३१.३.१२ रोजीची अनुसूचित जाती प्रवर्गातील पदोन्नतीची रिक्त पदे | त्यापैकी दिनांक १.४.२०१२ ते १६.८.२०१२ पर्यन्त पदोन्नतीने भरलेली पदे | पदांच्या सेवा प्रवेश नियमातील तरतुदीनुसार खाते परिक्षा/GDC&A परिक्षा/एस.एस.सी. परीक्षा/टंकलेखन परीक्षा/ संगणक अर्हता व निम्न संवर्गात सेवेची तीन वर्ष पुर्ण नाही या कारणामुळे पदे भरता येत नाही अशी पदे | इतर कारणे |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | **प्रशासन** | | | |
| १ | मुंबई | २ | - | २ | - |
| २ | कोकण | ९ | - | ९ | - |
| ३ | नाशिक | ३ | - | ३ | - |
| ४ | पुणे | ४ | - | ३ | १ से.नि. |
| ५ | कोल्हापूर | ८ | - | ८ | - |
| ६ | औरंगाबाद | ९ | - | ९ | |
| ७ | लातूर | १९ | - | १६ | १राजी.,२सेनि |
| ८ | अमरावती | १० | - | १० | |
| ९ | नागपूर | ५ | - | ५ | |
| १० | मुख्यालय | ९ | ५ | ४ (३ व.लि.व १ नि.लले) | |
| | **एकुण (प्रशा)** | **७८** | **५** | **६९** | **४** |
| | | **लेखापरिक्षण** | | | |
| १ | मुंबई | ० | - | | |
| २ | नाशिक | ८ | - | ६ | २-सेनि |
| ३ | पुणे | ४ | - | ४ | |
| ४ | औरंगाबाद | ११ | - | ११ | |
| ५ | अमरावती | ४ | - | ० | ४ न्यायप्रविष्ट |
| ६ | नागपूर | १ | - | १ | |
| | **एकुण (लेप)** | **२८** | **-** | **२२** | **६** |
| | **एकुण (प्रशा+ लेप)** | **१०६** | **५** | **९१** | **१०** |

**गट-ड** संवर्गातील पदे सहकार आयुक्त कार्यालय व क्षेत्रिय १६ विभागीय कार्यालयांकडून नियुक्ती, पदोन्नती इत्यादी कामकाज होत असल्याने स्वतंत्र विभागवार तक्ता खालील प्रमाणे :-

| अ. क्र. | विभाग | विभागातील एकूण मंजूर पदे | | त्यापैकी अनु. जाती ची राखीव पदे | | त्यापैकी अनु.जाती ची भरलेली पदे | | त्यापैकी अनु. जातीची रिक्त पदे | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सरळसेवा | पदोन्नती | सरळसेवा | पदोन्नती | सरळसेवा | पदोन्नती | सरळसेवा | पदोन्नती |
| | | | | | **प्रशासन कक्ष** | | | | |
| १ | मुंबई | ५२ | ४ | ७ | १ | ७ | १ | ० | ० |
| २ | कोकण | ७१ | ३ | ९ | ० | ९ | ० | ० | ० |
| ३ | नाशिक | १४४ | ५ | १८ | ० | १८ | ० | ० | ० |
| ४ | पुणे | ८४ | ४ | ११ | १ | ११ | १ | ० | ० |
| ५ | कोल्हापूर | ७९ | ४ | ११ | ० | १० | ० | १ | ० |
| ६ | औरंगाबाद | ७२ | ३ | १० | ० | ७ | ० | ३ | ० |
| ७ | लातूर | ९२ | ३ | १२ | ० | १२ | ० | ० | ० |
| ८ | अमरावती | १०९ | ११ | १४ | ३ | १४ | ३ | ० | ० |
| ९ | नागपूर | ११७ | ५ | १५ | १ | १५ | १ | ० | ० |
| १० | मुख्यालय | ७२ | १९ | ९ | २ | ८ | २ | १ | ० |
| **एकुण - प्रशा** | | **८९२** | **६१** | **११६** | **८** | **१११** | **८** | **५** | **०** |
| | | | | | **लेखापरिक्षण** | | | | |
| १ | मुंबई | ६३ | ० | ८ | ० | ८ | ० | ० | ० |
| २ | नाशिक | १३८ | ० | १८ | ० | १७ | ० | १ | ० |
| ३ | पुणे | १२६ | १४ | १६ | १ | १६ | १ | ० | ० |
| ४ | औरंगाबाद | ९९ | ० | १३ | ० | १० | ० | ३ | ० |
| ५ | अमरावती | ५८ | ० | ८ | ० | ८ | ० | ० | ० |
| ६ | नागपूर | ८० | ० | १० | ० | ५ | ० | ५ | ० |
| **एकुण- लेप** | | **५६४** | **२४** | **७३** | **१** | **६४** | **१** | **९** | **०** |
| **एकुण प्रशा+लेप** | | **१४५६** | **८५** | **१८९** | **९** | **१७५** | **९** | **१४** | **०** |

**गट-ड सरळसेवा कोटयातील रिक्त पदांची कारणे.**

| अ. क्र. | विभाग | दि.३१.३.१२ रोजीची अनुसूचित जाती प्रवर्गातील सरळसेवेची रिक्त पदे | त्यापैकी १.४.१२ ते १७.८.१२ पर्यन्त भरलेली पदे | रिक्त पदे | कारणे |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | मुंबई | ० | ० | ० | |
| २ | कोकण | ० | ० | ० | |
| ३ | नाशिक | ० | ० | ० | |
| ४ | पुणे | ० | ० | ० | |
| ५ | कोल्हापूर | १ | ० | १ | से.नि.मुळे |
| ६ | औरंगाबाद | ३ | ० | ३ | १-मार्से, १-राजीनामा, १-पदोन्नती. |
| ७ | लातूर | ० | ० | ० | |
| ८ | अमरावती | ० | ० | ० | |
| ९ | नागपूर | ० | ० | ० | |
| १० | मुख्यालय | १ | ० | १ | सेवानिवृत्तीमुळे |
| | **एकुण (प्रशा)** | **५** | **०** | **५** | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | मुंबई | ० | ० | ० | |
| २ | नाशिक | १ | ० | १ | पदोन्नतीमुळे |
| ३ | पुणे | ० | ० | ० | |
| ४ | औरंगाबाद | ३ | ० | ३ | २-से.नि., १-मयत |
| ५ | अमरावती | ० | ० | ० | |
| ६ | नागपूर | ५ | ० | ५ | भरती प्रक्रिया प्रलंबीत आहे. |
| | एकूण(लेप) | ९ | ० | ९ | |
| | एकूण प्र.+ले | १४ | ० | १४ | |

# परिशिष्ट - दोन

## समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त

## पहिली बैठक

अनुसूचित जाती कल्याण समितीची बैठक दिनांक २२ ऑगस्ट, २०१२ रोजी सहकार आयुक्तालय, पुणे येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

**उपस्थिती :**

(१) श्री. रमेश बागवे, वि.स.स. तथा समितीप्रमुख
(२) श्री. आनंदराव गेडाम, वि.स.स.
(३) श्री. योगेंद्र भोये, वि.स.स.
(४) श्री. मिलिंद (अण्णा) कांबळे, वि.स.स.
(५) श्री. विष्णु सवरा, वि.स.स.
(६) श्री. लखन मलिक, वि.स.स.
(७) श्री. सुजित मिणचेकर, वि.स.स.
(८) श्री. ज्ञानराज चौगुले, वि.स.स.
(९) श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स.
(१०) श्री. एम.एम. शेख, वि.प.स.
(११) श्री. नागो गाणार, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. भा. नां.कांबळे, सह सचिव.
(२) श्री. सुभाष नलावडे, अवरसचिव.

**सहकार आयुक्तालय, पुणे :**

(१) श्री. मधुकर चौधरी, सहकार आयुक्त.
(२) श्री. सुनिल मुकेश, अप्पर निबंधक.
(३) श्री. डॉ.पी.एल.खंडागळे, अपर निबंधक.

सदर बैठकीत समितीने सहकार आयुक्तालय, पुणे यांच्या सेवेतील अनुसूचित जाती प्रवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांचेसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

## दुसरी बैठक

अनुसूचित जाती कल्याण समितीची बैठक दिनांक २३ ऑगस्ट, २०१२ रोजी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पुणे व पुणे विद्यापीठ, पुणे येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहु बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

**उपस्थिती :**

(१) श्री. रमेश बागवे, वि.स.स. तथा समितीप्रमुख
(२) श्री. आनंदराव गेडाम, वि.स.स.
(३) श्री. योगेंद्र भोये, वि.स.स.
(४) श्री. मिलिंद (अण्णा) कांबळे, वि.स.स.
(५) श्री. विष्णु सवरा, वि.स.स.
(६) श्री. लखन मलिक, वि.स.स.
(७) श्री. सुजित मिणचेकर, वि.स.स.
(८) श्री. ज्ञानराज चौगुले, वि.स.स.
(९) श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स.
(१०) श्री. एम.एम. शेख, वि.प.स.
(११) श्री. नागो गाणार, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. भा.नां.कांबळे, सह सचिव.
(२) श्री. सुभाष नलावडे, अवरसचिव.

**पुणे विद्यापीठ, पुणे**

(१) डॉ.वासुदे गाडे, कुलगुरू
(२) डॉ.माणिक जाधव, कुलसचिव
(३) श्री.पी.के. कोळी, उप कुलसचिव

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पुणे**

(१) श्री. राजेंद्र पाटील, प्रादेशिक व्यवस्थापक, पुणे प्रदेश, पुणे.
(२) श्री. अशोक जाधव, विभाग नियंत्रक, पुणे विभाग.

**सहाय्यक आयुक्त, मागासवर्गीय कक्ष, पुणे :**

(१) श्रीमती वर्षा लड्ढा, सहायक आयुक्त.

सदर बैठकीत समितीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पुणे व पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या सेवेतील अनुसूचित जाती प्रवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांचेसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

## तिसरी बैठक

अनुसूचित जाती कल्याण समितीची बैठक दिनांक ४सप्टेंबर, २०१३विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहु बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

**उपस्थिती :**

(१) श्री. रमेश बागवे, वि.स.स. तथा समितीप्रमुख

(२) श्री. आनंदराव गेडाम, वि.स.स.

(३) श्री. मिलिंद (अण्णा) कांबळे, वि.स.स.

(४) श्री. विष्णु सवरा, वि.स.स.

(५) श्री. लखन मलिक, वि.स.स.

(६) श्री. नागो गाणार, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. सुभाष नलावडे, अवरसचिव.

**उपस्थित अधिकारी :**

(१) श्री.राजगोपाल देवरा, सचिव, सहकार विभाग.

(२) श्री.डि शिंदे सचिव, सामाजिकन्याय व विशेषसहाय्य विभाग.

(३) श्री.मधुकर चौधरी,सहकार आयुक्त.

(४) श्रीमती वर्षा लड्डा, सहा.आयुक्त मागासवर्ग कक्ष पुणे विभाग.

सदर बैठकीत समितीने सहकार विभाग व समाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांच्या सचिवांची साक्ष घेतली.

## चौथी बैठक

अनुसूचित जाती कलयाण समितीची बैठक दिनांक ५सप्टेंबर, २०१३ रोजी विधान भवन मुंबई येथे आयोजीत करण्यात आली होती. सदरहु बैठकिस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

**उपस्थिती :**

(१) श्री. रमेश बागवे, वि.स.स. तथा समितीप्रमुख

(२) श्री. रावसाहेब अंतापुरकर, वि.स.स.

(३) श्री. मिलिंद (अण्णा) कांबळे, वि.स.स.

(४) श्री. विष्णु सवरा, वि.स.स.

(५) श्री. लखन सहदेव मलिक, वि.स.स.

(६) श्री. ज्ञानराज चौगुले, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. सुभाष नलावडे, अवरसचिव.

**विभागीय प्रतिनिधी :**

(१) श्री.पी.एस.मिना, अप्पर मुख्य सचिव, विशेष चौकशी अधि (२).

(२) श्री.संजय कुमार, प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग.

(३) श्री.वासुदेव गाडे, कुलगुरू, पुणे विद्यापीठ.

(४) श्री.सुनिल शेटे, सहसंचालक, पुणे.

(५) श्री.के.पी.वदाते, अपर सचिव, सामाजिक न्याय विभाग.

(६) श्रीमती वर्षा लड्डा, सहाय्यक आयुक्त मागासवर्ग कक्ष, पुणे.

सदर बैठकीत समितीने उच्च व तंत्रशिक्षण विभाग व समाजिक न्याय विभागांच्या सचिवांची साक्ष घेतली.

## पाचवी बैठक

अनुसूचित जाती कलयाण समितीची बैठक दिनांक १५ डिसेंबर, २०१५ रोजी विधान भवन नागपूर, येथे आयोजीत करण्यात आली होती. सदरहु बैठकिस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

**उपस्थिती :**

(१) श्री. रमेश बागवे, वि.स.स. तथा समितीप्रमुख

(२) श्री.नखन मलिक, वि.स.स.

(३) श्री. हरीष पिंपळे, वि.स.स

(४) डॉ.सुधाकर भालेराव, वि.स.स.

(५) श्री.सुधीर पारवे, वि.स.स.

(६) श्री. रमेश बुंदीले, वि.स.स.

(७) श्री.सुभाष साबणे, वि.स.स.

(८) डॉ.सुजित मिणचेकर, वि.स.स.

(९) प्रा.वर्षा गायकवाड, वि.स.स.

(१०) श्री.नरहरी झिरवळ वि.स.स.

(११) श्री.इम्तीयाज जलील सय्यद, वि.स.स.

(१२) श्री.विजय उर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(१३) ॲड जयदेव गायकवाड, वि.प.स.

(१४) श्री.प्रकाश गजभिये, वि.प.स.

(१५) श्री.जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. आनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले अवर सचिव

(४) श्री. सिमा तांबे कक्ष अधिकारी

शामुना---एचबी-२३६०--मविसना--१२-२०१५---७५० प्रति--पीए५*